# जुनें ठेवणें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ११२८



REFBK-0009288

— बाळकृष्ण रामचंद्र प्रभु

२२९९३ दि.
क्रमांक ११२५० नों. दि. ६/३/५८

# जुनें ठेवणें

बाळकृष्ण रामचंद्र प्रभु, बी. ए., बी. टी.
Alfred Scholar
दादर–मुंबई.

REFBK-0009288

१ डिसेंबर, १९५७

पुष्पा प्रकाशन, दादर, मुंबई.

: प्रकाशक :
**बाळकृष्ण रामचंद्र प्रभु.**
बी. ए.; बी. टी.
व्यवस्थापक : 'पुष्पा प्रकाशन,'
८ काशीनाथ धुरू रोड,
पोस्टः–भवानीशंकर, दादर, मुंबई २८.

: मुद्रक :
**कृष्णाजी नारायण सापळे.**
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

: विक्रेते :
**आयडियल बुक कंपनी;**
छबिलदास रोड, दादर, मुंबई २८.

: मुखपृष्ठचित्र :
**जयंत रामचंद्र दातार.**

प्रथम प्रकाशन
**१ डिसेंबर, १९५७**

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

**किंमत पावणे दोन रुपये.**

★

★

## — आगामी प्रकाशनें —

लेख : कोंकणचे पडसाद
कथा : ललितप्रभा
निबंध : बहुमोल बोल
काव्य : चिमुकलीं फुलें
पत्रें : पत्रें, नव्हे व्यक्तिचित्रें
नाट्य : विविध नाट्यछटा
एकांकिका
दोन नाटकें
चरित्र : रामभक्त रामतनू
लोकोक्ति : कुडाळी म्हणी
आणि कथा
अध्यापन : भूमितीचें अध्यापन
आदर्श पाठ

# : आरंभीचे दोन शब्द :

विविध नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांचीं कात्रणें अनेक वर्षें 'दप्तरीं' पडून होतीं. ईश्वरी कृपेनें ते लेख प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे. यांतील 'दक्षिण कोंकणची साहित्यसेवा', यांत साहित्यिकांचा अल्प परिचय आहे. 'महाकाव्याचे दिवस संपले,' यांत प्रस्तुत काळीं महाकाव्य लिहिणें अशक्यप्राय कां, हें दाखविलें आहे. 'वाग्देवीचीं वन्य भूषणें' यांत गोपगीतांची चर्चा आहे. भाषा-शुद्धिकरणावरील विचार, 'भाषाभिमानाचें तारतम्य' यांत आहेत. 'मराठीच्या उपभाषा' यांत बोलींविषयीं विचार मांडले आहेत. 'जिवंत वाङ्मयाचा झरा' यांत 'नाविन्य, तपस्या व राष्ट्रीयत्व' हीं वाङ्मयाचें अधिष्ठान असल्याचें सुचविलें आहे. 'जुळया बहिणी' यांत 'कला व नीति' यांवरील विचार आहेत. 'जीवित आणि कला' यांत साहित्यिकांच्या जबाबदारीचें दिग्दर्शन केलें आहे. 'मेघदूतांतील सुभाषितें' हा लेख संस्कृतांतील सुभाषितें मराठींत कशीं आणावीं हें दाखवितो; रसिकांचे विविध प्रकार 'साहित्याचा आस्वाद' यांत चर्चिले; तर 'इंदु काळे व सरला भोळे' यांत एका कादंबरीचें रसग्रहण आहे. अशा तऱ्हेचे हे लेख, सह्याद्रि, समीक्षक, भरारी, झारापकर, प्रमोद, रागिणी, ज्ञानमंदिर, केसरी या नियतकालिकांत येऊन गेले होते. कांहीं अंक आज दुर्मिळ आहेत. या लेखांस प्रथम प्रसिद्धी दिल्याबद्दल, त्या त्या संपादकांचा मी आभारी आहें. सह्याद्रिकडून 'इंदू काळे व सरला भोळे' ह्या लेखाचा मोबदला मिळाला होता, तोही लेख मुद्रित करण्याची परवानगी दिल्याबद्दल केसरी संस्थेचा मी आभारी आहें. प्रस्तुत पुस्तकाचीं मुद्रितें तपासतांना चि. **मोहन बाळकृष्ण प्रभु**, टी.डी. आणि लेखक व कवि श्री. **गजानन लक्ष्मण पेंडसे** यांचें साहाय्य झालें. प्रस्तुत प्रकाशनास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ज्यांचें साहाय्य झालें, त्यांचा मी आभारी आहें. प्रस्तुत प्रयत्नास यश दिल्याबद्दल जगन्नियंत्या परमेश्वराची नम्र प्रार्थना करून, हे दोन शब्द संपवितों.

दादर–मुंबई.
ता. २० नोव्हेंबर, १९५७

मराठी भाषिकांचा नम्र,
**बाळकृष्ण रामचंद्र प्रभु.**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | लेखाचें शीर्षक | प्रथम प्रसिद्धी | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | दक्षिण कोंकणची साहित्यसेवा | समीक्षक; १ मे, १९४० | ५ |
| २ | महाकाव्याचे दिवस संपले | प्रमोद; ८ नोव्हेंबर, १९३६ | १४ |
| ३ | वाग्देवीचीं वन्य भूषणें | प्रमोद; ३० ऑगस्ट, १९३६ | १९ |
| ४ | भाषाभिमानाचें तारतम्य | प्रमोद; १० मे, १९३६ | २४ |
| ५ | मराठीच्या उपभाषा | प्रमोद; ऑगस्ट, १९३९ | २९ |
| ६ | जुनें वाङ्मय त्याज्य आहे काय ? | प्रमोद; ९ ऑगस्ट, १९३६ | ३५ |
| ७ | जिवंत वाङ्मयाचा झरा | प्रमोद; ७ जून, १९३६ | ४१ |
| ८ | जुळया बहिणी | प्रमोद; २७ सप्टेंबर, १९३६ | ४६ |
| ९ | वितळणारे ढग | समीक्षक; १ जुलै, १९४० | ५२ |
| १० | साहित्याचा आस्वाद | प्रमोद; २४ जानेवारी, १९३७ | ५७ |
| ११ | जीवित आणि कला | ज्ञानमंदिर; वर्ष १, पान ४७८ | ६३ |
| १२ | चिरंतन बोल | रागिणी; पुष्प ४ थें | ६७ |
| १३ | मेघदूतांतील सुभाषितें | रागिणी; पुष्प २ रें | ७१ |
| १४ | दिल्ली तो बहोत दूर है | समीक्षक; १५ मार्च, १९४१ | ७५ |
| १५ | इन्दु काळे व सरला भोळे | सह्याद्रि; जून, १९३५ | ७९ |
| १६ | नाट्यगीताचा आत्मा | सह्याद्रि; नोव्हेंबर, १९३५ | ८७ |
| १७ | वस्तुत्वाची उपासना | शिक्षक; नोव्हेंबर, १९४२ | ९० |
| १८ | बोलका ढलपा | झारापकर; जून, १९४४ | ९३ |
| १९ | नवीं क्षितिजें | भरारी; २० जून, १९४४ | ९६ |
| २० | बहुभाषाकोविद ठाकूर | केसरी; ७ जून, १९३८ | ९९ |

२२६९

# जुनें ठेवणें

## १ : दक्षिण कोंकणची साहित्यसेवा

### बुद्धीचें आगर

कोंकणची भूमि नेहमीं बुद्धीचें आगर समजली जाते. देशावर जाऊन मर्दुमकी गाजवणारें " भट " घराणें कोंकणांतच निपजलें. तसेंच आधुनिक साहित्यिकांत सम्राटाचा मान मिळवणारे केळकर, किंवा नाट्यकलेंत यश संपादणारे देवल मुळचे कोंकणचेच. कोंकणांतील सर्व विद्यमान् अगर दिवंगत अशा साहित्यिकांचा परिचय करून द्यावयाचा, तर एक स्वतंत्र पुस्तकच, त्या विषयावर लिहावें लागेल; म्हणून रत्नागिरी जिल्हा व सावंतवाडी संस्थान ह्यांच्या जीवनाशीं ज्यांनीं निकट संबंध ठेवला आहे व होता अशाच कांहीं साहित्यसेवकांच्या कार्याचा परिचय येथें करून देण्याचें योजिलें आहे.

### पद्मनाभतीर्थ

कोंकणची साहित्यसेवा चौरस आहे. त्यांत आध्यात्मिक व धार्मिक वाङ्मयाचाहि समावेश होतो. अर्वाचीन काळांत श्रीपद्मनाभतीर्थ म्हणून एक साधू होऊन गेले. त्यांचा जन्म इ. स. १८७१ सालीं सावंतवाडी संस्थानांतील पाट गांवीं झाला. त्यांचें नांव सखाराम नारायण पाटकर. ते संन्यस्त वृत्तीनें राहत. ते कानडा जिल्ह्यांत ' बोधभानु ' पाक्षिक काढीत असत. ' बाढ ' येथें त्यांनीं मठ स्थापला असून ' अखंड समाधान ' या नांवाचें मासिक त्यांनीं चालविलें होतें. मांडुक्य-उपनिषदावर, शांकरतत्त्वज्ञानावर व इतर आध्यात्मिक विषयांवर त्यांनीं २२ ग्रंथ रचिले आहेत. त्यांपैकीं 'मांडुक्योपनिषद्भावार्थदीपिका' याची ओवीसंख्या २६९१ आहे. त्यांचे ग्रंथ रसाळ व बोधप्रद आहेत.

## खंदे लेखक भागवत

विद्वानांतील पहिल्या पिढीचे खंदे लेखक राजारामशास्त्री भागवत हेहि दक्षिण कोंकणांतीलच. 'शिवछत्रपतींचें चरित्र,' 'मराठ्याविषयीं चार शब्द,' 'शिवचरित्रांतील कांहीं मुद्दे,' 'सिधोजी निपाणकर' वगैरे पुस्तकें, त्यांचें इतिहासाचें गाढ ज्ञान दर्शवितात. 'उपनिषदांची मीमांसा,' 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु,' 'धर्माची फोड,' 'ब्राह्मण व ब्राह्मणी धर्म' वगैरे पुस्तकांवरून त्यांच्या धर्मविषयक व समाजशास्त्रविषयक अभ्यासाची कल्पना येते. 'प्राकृत भाषेची विचिकित्सा' हें पुस्तक त्यांच्या भाषापरिज्ञानाचें द्योतक आहे. आमची देशभाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी आहे कीं नाहीं या प्रश्नाचीहि त्यांनीं चर्चा केली आहे. त्या काळीं कोणत्याहि विषयांत त्यांची बुद्धि चालत होती व त्यांनीं आपलीं स्पष्ट व चिकित्सक बुद्धीनें पारखलेलीं विद्वत्तापूर्ण मतें मांडलीं होतीं यांत संशय नाहीं. त्या काळचे ते डॉक्टर केतकर होत असेंहि कित्येक जण त्यांना म्हणतात.

## एक गाढ विद्वान्

राजारामशास्त्री भागवतांप्रमाणेंच आपल्या गाढ पांडित्याबद्दल व तत्त्वज्ञानविषयक तौलनिक अभ्यासाबद्दल गेल्या पिढींत गाजलेले एक तत्त्वज्ञ प्रो. शांताराम अनंत देसाई यांचाहि प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. इंदूरच्या होळकर कॉलेजांत हे २० वर्षें तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. यांचें गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील कुंभवडें. यांचे 'युरोपीय नीतिमीमांसेचा इतिहास;' 'गहन विषयावर अल्प विचार;' 'तुकारामाच्या अभंगरत्नांचा हार;' 'वैदिक तत्त्वमीमांसा;' 'सृष्टीची यांत्रिक उत्पत्ति;' 'वैदिक धर्माचें परम-रहस्य;' 'उपनिषदांतील वचनांचा संग्रह' वगैरे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'विद्यार्थी' या नांवाचें तत्त्वज्ञान विषयाला वाहिलेलें एक त्रैमासिक ते बरींच वर्षें चालवीत असत.

प्रो. देसाई यांचेप्रमाणेंच जुन्या पिढींतील, वेंगुर्लें येथील एक विद्वान् रहिवासी शिवराम सीताराम वागळे यांचा उल्लेख करावयास हवा. 'बेकनचे निबंध' हा यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

## महाराष्ट्र-भाषा-भूषण

जुन्या मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांतहि दक्षिण कोंकणांतील लेखकांनीं कीर्ति संपादन केली आहे. जुन्या संतवाङ्मयावर व संतचरित्रांवर अधिकारवाणीनें बोलणारे व लिहिणारे महाराष्ट्रभाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर हेही दक्षिण कोंक

गांतील होत. त्यांचा जन्म १८७९ (इ.स.) सालीं झाला. त्यांचें वाङ्मयकार्य पुणें व मुंबई येथें झालें आहे. सध्यां ते मुंबईसच असतात. चित्रमयजगत् व इंदुप्रकाश यांचे संपादक म्हणून त्यांनीं काम केलें आहे. ते विशेषतः महाराष्ट्रकविचरित्रकार म्हणून प्रसिद्ध आहेत. कविचरित्राचे ११ भाग असून पृष्ठसंख्या सुमारें ११ हजार आहे. त्यांनीं एकंदर लहानमोठीं ३५ पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांची भाषा रसाळ, सुश्लिष्ट, व भक्तिरसपूर्ण असते. त्यांनीं संतवाङ्मयावर अनेक ठिकाणीं व्याख्यानेंहि दिलीं आहेत.

## परिवर्तनवादी पंडित काणे

सुप्रसिद्ध परिवर्तनवादी पंडित पांडुरंग वामन काणे हेहि मुळचे कोंकणांतीलच. त्यांचें शालेय शिक्षण दापोली येथें झालें. त्यांनीं संस्कृत वाङ्मयाचें गाढ परिशीलन केलें आहे. हिंदुधर्मशास्त्रावर ते एक अधिकारी पंडित मानले जातात. त्यांनीं अनेक संस्कृत पुस्तकांवर टीका लिहिल्या आहेत. 'धर्मशास्त्रविचार,' 'हिंदुधर्म-शास्त्राचा इतिहास' हीं त्यांच्या संशोधनाच्या परिणतावस्थेंतील फलें होत. त्यांनीं विलायतेचा प्रवास केला असून, 'युरोपचा प्रवास' म्हणूनहि एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. भारत व रामायणकालीन परिस्थितीवर त्यांनीं एक ग्रंथ लिहिला आहे. संस्कृत वाङ्मयावर त्यांचीं व्याख्यानें होत असतात.

## रावबहादूर बांबर्डेकर

संशोधक म्हणून प्रसिद्ध असलेले रावबहादूर वासुदेव अनंत बांबर्डेकर हे सावंतवाडी संस्थानांतील बांबर्डें गांवचे. त्यांनीं राजवाड्यांनंतर मठगांवच्या शिलालेखाचें स्वतंत्रदृष्ट्या वाचन केलें. भट्टप्रभु, चित्पावन, माध्यंदिन वगैरे समाजांच्या इतिहासलेखकांना त्यांच्या संशोधनाची मदत झाली. त्यांनीं कोंकणच्या इतिहासाचीं अनेक साधनें जमविलीं असून, त्यांपैकीं कांहीं प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांनीं भारत–इतिहास-संशोधक–मंडळाच्या त्रैमासिकांत व इतरत्र अनेक संशोधनपर लेख लिहिले आहेत. आध्यात्मिक वाङ्मयावरहि त्यांनीं निरनिराळ्या नियतकालिकांतून अनेक लेख लिहिले आहेत. त्यांचा 'भट्टोजी दीक्षिता' वरील एक संशोधनात्मक ग्रंथ अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे.

## नाटककारांचे अग्रणी

दक्षिण कोंकणांत जन्मलेले लेखक ललित वाङ्मयांतहि नांवाजलेले आहेत. ललित लेखकांपैकीं श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर हे नाटककारांचे अग्रणी होत. त्यांचें

बालपण मालवण येथें गेलें. कोंकणप्रांतीय जीवनाविषयीं त्यांना अत्यंत जिव्हाळा आहे. त्यांची लहानपणापासूनची इच्छा नाटककार म्हणूनच पुढें येण्याची होती. पण त्यांनीं नाटकाच्याच क्षेत्रांत नव्हे, तर लघुकथा, कादंबरी, निबंध, वर्तमानपत्रीय लेखन, इत्यादि सर्व शाखांत मर्दुमकी गाजविली आहे. त्यांचें ध्येय शृंगारिक प्रेमकथा रंगविण्याचें नसून, समाजापुढील महत्त्वाचे प्रश्नच मार्मिकपणें सोडवावे हें आहे. त्यांनीं प्रथम 'वैश्य' या मासिकासाठीं 'संसार कीं संन्यास' ही कादंबरी लिहिली. 'महाराष्ट्र–कुटुंबमालें'त त्यांची 'चिमणी' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. त्यांच्या 'विधवा कुमारी' ह्या कादंबरीनें समाजांत अत्यंत खळबळ उडवून दिली. 'कुलदैवत,' 'धांवता धोटा,' 'गोदू गोखले,' 'पुनर्भेट,' 'मलबारहिल,' 'पेटतें पाणी' ह्या त्यांच्या इतर कादंबऱ्या होत. '१९१४ नंतर' ही त्यांची कादंबरी अजून अप्रसिद्ध आहे. हें त्यांच्या कादंबरी–लेखनाविषयीं झालें. त्यांनीं श्रीकृष्णचरित्रावर 'कुंज-विहारी' हें नाटक प्रथम लिहिलें. 'सत्तेचे गुलाम' हें नाटक लिहून त्यांनीं रंग-भूमीच्या सजावटीची वास्तववादी अशी नवीन प्रथा पाडली. 'तुरुंगाच्या दारांत' हें नाटक अस्पृश्यतानिवारणावर त्यांनीं लिहिलें. 'पापी पुण्य' या नाटकांत त्यांनीं एका पतित मुलीचा वैवाहिक पुनरुद्धार दाखविलेला आहे. 'स्वयंसेवक,' 'हाच मुलाचा बाप,' 'सोन्याचा कळस,' 'संन्याशाचा संसार' हीं त्यांचीं विशेष लोकप्रिय नाटकें होत. हुंडा, मालक व मजूर यांचा झगडा, स्वदेशी, दारूबंदी, अस्पृश्यता वगैरे अनेक विषय त्यांच्या नाटकांत आले आहेत. त्यांच्या लघुकथाहि त्यांच्या नाटकांप्रमाणें वास्तववादी आहेत. पुरोगामी लेखकसंघाची स्थापना, रेडियोवर देशी भाषेला महत्त्व आणून देण्याची खटपट, हीं त्यांचीं इतर कार्यें होत. अशा तऱ्हेनें निरनिराळ्या क्षेत्रांत मौलिक वाङ्मय निर्माण करून त्यांनीं आपलें नांव सर्वतोमुखीं केलें आहे.

## सव्यसाची खांडेकर

मामा वरेरकरांप्रमाणें विपुल वाङ्मय निर्माण करणारे व आपल्या पुरोगामी वाङ्मयानें तरुण पिढीच्या गळ्यांतील ताईत झालेले लेखक श्री. विष्णु सखाराम खांडेकर हे शिरोडें येथें बरींच वर्षे इंग्रजी शाळेचे हेडमास्तर होते. ललित व गंभीर अशा दोन्ही वाङ्मयांत त्यांनीं सव्यसाचित्वानें लेखणी चालविली आहे. हे कोल्हटकर सांप्रदायाचे अनुयायी आहेत. कोल्हटकरांप्रमाणेंच ध्येयवाद, कल्पना-वैपुल्य, विनोद, भाषाप्रभुत्व हें त्यांच्या वाङ्मयाचें वैशिष्ट्य आहे. पण अलिकडचें त्यांचें वाङ्मय रस व प्रसाद या गुणांनीं भरलेलें दिसतें. प्रथम ते टीकाकार म्हणून

प्रसिद्धि पावले. नंतर ते लघुकथा–लेखक म्हणून नांवाजले. ' नवमालिका, ' ' नवचंद्रिका, ' ' दत्तक व इतर गोष्टी, ' ' जीवन व कला ' वगैरे त्यांचे लघुकथा-संग्रह प्रसिद्ध आहेत. ' हृदयाची हांक, ' ' कांचनमृग, ' ' दोन ध्रुव, ' ' उल्का, ' ' दोन मनें, ' ' पांढरे ढग ' वगैरे त्यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत. ' सुखाचा शोध, ' ' रिकामा देव्हारा' वगैरे कादंबऱ्या, सिनेमासृष्टींतून प्रेक्षकांच्या मनःपटलावर चितारल्या गेल्या आहेत. ' वायुलहरी, ' 'चांदण्यांत' वगैरे त्यांचे लघुनिबंधसंग्रह वाचकांच्या मनाला चटका लावणारे आहेत. आगरकर, गडकरी वगैरे ज्येष्ठ ग्रंथ-कारांच्या चरित्रावर व वाङ्मयावर त्यांनीं परिचयात्मक व परिशीलनात्मक निबंध लिहिले आहेत. सध्यां ते ' ज्योत्स्ना ' या मासिकाचे संपादक आहेत. चित्रपटकथा लिहिण्याकडे त्यांचें अलिकडे विशेष लक्ष वेधलें आहे. एका आडखेड्यांत राहूनहि एखादा लेखक किती विविध व विपुल वाङ्मय निर्माण करूं शकतो, हें पाहिलें कीं त्यांच्या प्रतिभेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच असें वाटूं लागतें.

## नेरूरकर

कोंकणांतच राहून वाङ्मयनिर्मिति करणारे दुसरे लेखक श्री. विठ्ठल कृष्ण नेरू-रकर हे होत. ते सध्यां सावंतवाडी येथें एज्युकेशनल इन्स्पेक्टर आहेत. त्यांनीं मालवण येथें 'प्रमोद' नांवाचें एक मासिक चालविलें होतें. त्यांनीं मनोरंजन, नवयुग वगैरे मासिकांतून अनेक कविता प्रसिद्ध केल्या आहेत. 'राधाकृष्ण–रहस्य,' 'सिंहगडदर्शन', 'पर्वती', 'श्रीक्षेम राज्याधिरोहण,' 'उत्कंठा' वगैरे त्यांचीं काव्यें प्रसिद्ध आहेत. स्थानिक बोलींतून त्यांनीं ग्रामजीवन मार्मिकपणें चित्रित करणारीं गेय गीतें लिहिलीं आहेत. त्यांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या असून, त्या लोकप्रिय झाल्या आहेत. 'शीलाचें मोल', 'दुधारी सुरी', 'तो क्षण', 'अकबराचें वेदसाधन' वगैरे कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या आहेत. 'साधना' या कादंबरींत त्यांनीं प्रादेशिक वातावरण यथार्थतेनें रेखाटलें आहे. 'मराठीचा संसार', व 'टॉलस्टॉयचें तत्त्वज्ञान', हे त्यांचे प्रबंध होत. त्यांनीं लहान मुलांकरितांहि कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत.

## गुर्जर पितापुत्र

वरील लेखकांप्रमाणेंच विपुल वाङ्मयनिर्मिति करणारे लेखक विठ्ठल सीताराम गुर्जर हे राजापूर तालुक्यांतील कशेळी गांवचे होत. ' संसार असार ', ' पौर्णि-मेचा चंद्र ', ' कुलकलंक ', ' पति–पत्नी', ' गुणगौरव ', ' संगम ', ' देवदास ', ' अंजन ', ' स्वप्नभंग ' वगैरे १०।१२ कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या आहेत. बहुतेक

कादंबऱ्या भाषांतरित आहेत. ‘ नंदकुमार ’, ‘ गौप्यगोपन ’, ‘ प्रणयी मुद्रा ’, ‘ भ्रमनिरसन ’, ‘ राजलक्ष्मी ’ वगैरे ६।७ नाटकें त्यांनीं लिहिलीं आहेत. त्यांतलीं ‘ नंदकुमार ’ व ‘ राजलक्ष्मी ’ हीं रंगभूमीवर आलीं असून, ‘नंदकुमार’ हें विशेष प्रसिद्ध आहे. ‘ द्राक्षांचे घोंस ’ हा त्यांचा लघुकथा संग्रह होय. “ सूक्ष्म निरीक्षण, रसानुकूल भाषा, परिणामकारक व मोहक वर्णनशैली, वास्तव व स्वाभाविक व्यक्तिदर्शन आणि जिव्हाळा, ” हे त्यांच्या लघुकथांचे विशेष आहेत. त्यांचे वडील सीताराम बाबाजी गुर्जर हेहि उत्तम कवि व लेखक होऊन गेले. ‘ आर्या-रत्नमाला ’ हें काव्याचें पुस्तक व ‘ उदार दामोदर नाटक ’ हीं त्यांचीं पुस्तकें होत.

## कशेळीचे लेखक

मुळचे कशेळीचे व नंतर बाहेर जाऊन प्रसिद्धि पावलेले दुसरे लेखक श्री. शेजवलकर व तिसरे प्रो. वि. ह. कुळकर्णी हे होत. श्री. त्र्यं. शं. शेजवलकर हे मुंबईत ‘ प्रगति ’ पत्र चालवीत असत. त्या पत्रांत “ तरुणांत वृद्ध व वृद्धांत तरुण ” अशी भूमिका त्यांनीं स्वीकारली होती. राजवाडे, केतकर वगैरे संशोधकांवर त्यांनीं लेख लिहिले आहेत. तसेंच ब्राह्मणकन्या, माझें रामायण वगैरे पुस्तकांवर त्यांनीं परीक्षणें लिहिलीं आहेत. ते एक चिकित्सक टीकाकार असून इतिहास हा त्यांचा आवडता विषय आहे. “ शेजवलकरांचे लेख ” हा त्यांचा लेखसंग्रह श्री. ह. वि. मोटे यांनीं प्रसिद्ध केला आहे. दुसरे प्रो. कुळकर्णी हे मार्मिक टीकाकार व बहुश्रुत व नर्मविनोदी वक्ते आहेत. त्यांनीं निरनिराळ्या मासिकांतून वाङ्मयावर लेख लिहिले आहेत ते ‘ प्रतिभा ’ व ‘ ज्योत्स्ना ’ ह्या नियतकालिकांचेहि संपादक होते.

## काळे आणि बरवे

‘ महाराष्ट्र-साहित्य-पत्रिके’चे नवीन संपादक श्री. के. नारायण काळे हे खेड जवळील दह्याळ या गांवचे. त्यांनीं अनेक मासिकांतून लेख लिहिले असून, ‘ सहकारमंजरी ’ हा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला आहे. त्यांनीं अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. नाट्यमन्वंतर ह्या नवीन धर्तीच्या नाट्यसंस्थेच्या स्थापनेंत त्यांचें महत्त्वाचें अंग होतें.

‘ आनंद ’ या टोपण नांवानें कविता लिहिणारे श्री. विनायक लक्ष्मण बरवे हे चिपळूण येथें वकिली करीत असतात. त्यांनीं बऱ्याच कविता लिहिल्या असून, त्यांत कोंकणचें वातावरण चित्रित केलें आहे. ‘ विजा व मेघ ’, ‘ कलमी आंबे ’,

'कोंवळीं पोफळें' हे त्यांचे लघुकथासंग्रह होत. 'कोंकणगीत', 'नाविकगीत', 'झरोके' वगैरे पुस्तकें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत. त्यांचे कविमित्र पेंडसे बंधु हे मुळचे आयनीमेटें या गांवचे असून ते सध्यां मुंबई नगरपालिकेंत नोकर आहेत. उभय बंधूंनीं बऱ्याच कविता व लघुकथा निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध केल्या आहेत. ह्या उभय बंधूंचीं संपूर्ण नांवें वैजनाथ लक्ष्मण व गजानन लक्ष्मण पेंडसे अशीं आहेत. वैजनाथरावांनीं आपल्या काव्याचा "तीस तीन फुलें" नांवाचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. त्यांची कविता मुग्ध असून, सौंदर्य व प्रसाद या गुणांनीं भरलेली आहे. वैजनाथरावांचे 'बहुरंगी बुडबुडे' नांवाचें, लघुकथांचें पुस्तक लवकरच बाहेर पडणार आहे.

### कवि माधव

नामवंत कवि माधव केशव काटदरे हे दक्षिण कोंकणांतीलच होत. त्यांनीं ऐतिहासिक विषयांवर भावमधुर व कल्पनारम्य कविता रचल्या आहेत त्यांचा 'कवि माधव यांची कविता' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांनीं जुन्या कथांचें संशोधनहि केलें आहे. प्रादेशिक समजुती व वातावरण ह्यांचें हुबेहूब, चित्र त्यांच्या कवितेंत पाहावयास सांपडतें.

आवक 22883 दि: ... 99200 नों: दि: ...

### नेने व सीताराम महाराज

या पूर्वी विष्णु गणेश नेने (१८६[illegible]१९२४) नांवांचें एक कवि या प्रान्तांत होऊन गेले. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील वाडेपटेल या गांवीं झाला. त्यांनीं प्रियमातृनिधन, पितृनिधन, शोच्यमृत्यु, लोकवास, हीं काव्यें व कांहीं स्तोत्रें रचिलीं आहेत. त्यांनीं घोपेश्वर येथील सत्पुरुष काका पुराणिक यांचा अनुग्रह घेतला होता. आपल्या गुरुजींचें ११ हजार ओव्यांचें चरित्र त्यांनीं लिहिलें आहे. आध्यात्मिक विषयावर काव्यरचना करणारे दुसरे विद्यमान कवि सीताराम महाराज हे होत. त्यांचें बालपण सावंतवाडी येथें गेलें. बालपणांतच ते कीर्तन करीत व कीर्तनांतच काव्यरचना अभंगरूपानें करीत. त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें हजारों अभंग रचले असून, त्यांचीं कांहीं पुस्तकें मालवण येथील कै. कृष्णराव सीताराम देसाई यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत.

### शेटे व गोगटे

रत्नागिरी येथील साहित्य-सम्मेलनाचे उत्साही कार्यकर्ते रा. वि. गो. शेटे हे रत्नागिरी येथें वकील आहेत. त्यांनीं रक्षाबंधन, रामरहीम, जुगारी जग, लोकशासन

वगैरे नाटकें लिहिलीं आहेत. नवाकाळचे सहसंपादक श्री. केशव रावजी पुरोहित हे सुद्धां मुळचे संगमेश्वर तालुक्यांतील कडवई गांवचे. त्यांनीं 'शून्य जगत्,' 'आकाशपुष्प,' 'मी कोण' वगैरे कादंबऱ्या व अनेक लघुकथा लिहिल्या आहेत. आकाशपुष्प व शून्य जगत् हीं भाषांतरें आहेत. ते ध्वनिमुद्रणासाठीं पदें व संवाद देत असतात. विवेकानंदांच्या समग्र ग्रंथांचें भाषांतर करणारे कै. गणेश वामन गोगटे हेहि मुळचे रत्नागिरी जिल्ह्यांतील गोळप या गांवचे होत. त्यांना समकालीन असे कै. पांडुरंग बाळकृष्ण दडकर (१८७३–१९२३) यांचा जन्म सावंतवाडी येथें झाला. इंग्रजी व फ्रेंच भाषांवर त्यांचें प्रभुत्व होतें. ते काव्यरचनाहि करीत. मासिक मनोरंजन, नवयुग, काव्यरत्नावली यांतून त्यांची स्फुट कविता प्रसिद्ध झाली आहे. त्यांच्या 'रजपूत कन्या तारा' या काव्याविषयीं अनेकांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत.

### बालसन्मित्र

सरस्वतिमंदिराच्या अनेक दालनांपैकीं 'बालवाङ्मया'चें दालन ज्यांनीं समृद्ध केलें अशा लेखकांत ज्यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला जातो ते रा. पारूजी नारायण मिसाळ रत्नागिरी जिल्ह्यांतील होत. मालवणसारख्या ठिकाणीं गेलीं तीस वर्षें ते निष्ठेनें बालवाङ्मयनिर्मितीचें काम करीत आहेत. मुलांसाठीं त्यांनीं अनेक पुस्तकें लिहिलीं असून, अलिकडे पांच–सहा वर्षें ते मुलांसाठीं '**बालसन्मित्र**' नांवाचें पाक्षिक चालवीत असतात.

### प्रकाशक

प्रकाशक या नात्यानें सरस्वतीमंदिराच्या उभारणीला हातभार लावणारेहि या प्रान्तांत होऊन गेले आहेत. त्यांपैकीं पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी (१८४४ ते १९००) यांचा जन्म सावंतवाडी संस्थानांतील कसाल या गांवीं झाला. इ. स. १८७४ सालीं विविधज्ञानविस्तार हें मासिक त्यांच्या मालकीचें झालें व अतिशय प्रतिकूल परिस्थितीतहि त्यांनीं तें ३० वर्षें चालविलें; व त्याला वरिष्ठ दर्जा प्राप्त करून दिला. त्यांच्या प्रमाणेंच कै. बाबाजी अनंत तेंडोलकर यांनीं वाङ्मयप्रकाशनास जोराचा हातभार लावला. हे मुळचे सावंतवाडी संस्थानांतील तेंडोली गांवचे. त्यांनीं भागवताच्या दशम स्कंधावरील कृष्णदयार्णवाच्या 'हरिवरदा' टीकेचें प्रकाशन केलें. त्याची ओवीसंख्या ४२००० आहे ! याशिवाय मोरोपंतांचे समग्र ग्रंथ, वामनपंडितांची कविता, रामदासी कविता, व इतर कांहीं ग्रंथ प्रकाशित केले व त्यांसाठीं हजारों रुपयांची झीज सोसली. प्रकाशक व संपादक या नात्यांनीं काशीनाथ रघुनाथ मित्र

( १८७१ ते १९२० ) यांनींहि अप्रतिम कामगिरी केली आहे. त्यांचें मूळ गांव सावंतवाडी संस्थानांतील आजगांव हें होय. प्रथम त्यांनीं प्रभाकर दैनिकाच्या वार्ताहराचें काम केलें. १८९५ सालीं त्यांनीं मुंबईत ' मासिक मनोरंजन ' सुरू केलें. प्रथम कांहीं वर्षें ते स्वतःच सर्व मजकूर लिहीत. मासिक मनोरंजनांतून पहिल्या पिढीचे बहुतेक लेखक व कवि उदयास आले. त्यांनीं मनोरंजक–ग्रंथ प्रसारक मंडळीहि चालविली होती. कै. मित्रांप्रमाणेंच, त्यांच्या पश्चात् ' मनोरंजना ' चे बरींच वर्षें संपादक असलेले बहुश्रुत लेखक रा. विठ्ठल जिवाजी नाडकर्णी यांचाहि येथें उल्लेख केला पाहिजे. सावंतवाडी हें यांचें गांव. त्यांचें आयुष्य 'नवयुग', ' मनोरंजन ', ' विविधज्ञानविस्तार ', ' इंदुप्रकाश ', ' शिवाजी ' वगैरे नियतकालिकांच्या संपादनांत गेलें.

### नियतकालिकें

नियतकालिकें चालविण्यांतहि हा प्रांत मागें नाहीं. रत्नागिरी येथें श्री. मोरेश्वर दिनकर देसाई हे ' बलवंत ' चालवीत असतात. हें कॉंग्रेसपक्षाचें वर्तमानपत्र आहे. रत्नागिरी येथें ' सत्यशोधक ' हें वर्तमानपत्र गेलीं पाऊणशें वर्षें चालू आहे. त्याचे संपादक श्री. लिमये हे आहेत. श्री. द. ग. काळे हे ' रत्नागिरी ' या नांवाचें एक वर्तमानपत्र चालवीत असतात. वेंगुर्लें येथें श्री. मराठे यांच्या संचालकत्वाखालीं ' किरात–टणत्कार ' हें साप्ताहिक प्रसिद्ध होत असतें. तें हिंदु महासभेच्या मताचा पुरस्कार करीत असतें. मालवण येथें पूर्वी श्री. प. स. देसाई हे ' रामकृष्णनिकेतन ' हें साप्ताहिक चालवीत असत. सध्यां तेथें रा. श्रीपाद सदाशिव महाजन हे ' हिंदसेवक ' नांवाचें साप्ताहिक चालवितात. सावंतवाडीस सध्यां श्री. मेघःश्याम दत्तात्रेय शिरोडकर हे ' वैनतेय ' चालवीत असतात. हें वर्तमानपत्र केसरीच्या धोरणावर चालविलें जातें.

प्रस्तुत लेखांत फक्त विहंगमदृष्टीनें ह्या प्रान्ताच्या वाङ्मयसेवेचें निरीक्षण केलें आहे. त्यावरून या प्रान्ताकडून उत्तरोत्तर मराठी भाषेची जास्त भरीव सेवा होईल अशी आशा वाटते.

—मे १९४०

## २ : महाकाव्याचे दिवस संपले !

### कवींचीं सुखस्वप्नें

मनुष्य नाविन्याचा भोक्ता असतो; नवी विटी नवें राज्य नेहमीं असावें असें त्याला वाटतें. आज रेशमी कोट, उद्यां चेकचा, तर तिसऱ्या दिवशीं नुसता नेहरू शर्ट ही जशी पेहेरावपालट कित्येकांना प्रिय असते; तशीच वाङ्मयामध्यें आज कथा, तर उद्यां निबंध, परवां 'तो आणि ती' सारखे शून्यांत विहार करणारे प्रबंध, यांत लेखकाचें मन रमतें. वाचक बापडा काय जें पुढ्यांत पडेल तें घशांत लोटणारा; त्यांत थोडासा चुरचुरीतपणा आहे ना? ठीक. तळलेले पदार्थ परिणामीं अपायकारक खरे पण शेगडीवर कढई चढली व तेलांत 'चळळ' आवाज झाला कीं जिव्हा माउली चळवळ करूं लागते, अशा रीतीनें जनसंमर्दाची अभिरुचि मोकाट मैदानांत सैरावैरा धांवून वाङ्मयकृतीचा आस्वाद घेऊं लागली आहे. दुनिया झुकती आहे हें कळतांच, कांहीं कलमबहाद्दरसुद्धां पूर्वसूरींच्यावर ताण करायला निघाले आहेत. आपल्या गायनाच्या आटोक्यांत रसिकवृंद आलेला पाहतांच कित्येकांना असा आत्मविश्वास वाटूं लागतो कीं आतां हीं छोटेखानी गीतें पुरे झालीं. यांची मातब्बरी ती कितीशी? कालाचा ओघ अपार! त्या अपार कालौघामध्यें त्रिकालाबाधित असें कांहीं तरी पाहिजे. लगेच त्यांना स्मरतें कीं हीं लघुगीतें कितीसे दिवस पुरणार? आपण एखादें महाकाव्यच लिहूं. तशांत ही प्रवृत्ति बलवत्तर व्हावयाला दुसरींही कारणें आहेत. आजपर्यंत आपण जीं महाकाव्यें वाचलीं तीं तर अनार्यांची. संशोधकांनीं आतां छातीठोकपणानें प्रमेयें शोधून काढलीं आहेत कीं सीतामाईच्या पायांवर आतां 'माते' म्हणून डोकें ठेवायला नको. ह्या नव्या संशोधनानें डोळ्यांत झणझणीत अंजन पडून जनता तीं जुनीं काव्यें खास टाकून देणार व तीं जुनींपुराणीं महाकाव्यें अशीं विस्मृतीच्या उदरांत गडप झालीं कीं जनतेला काळ घालवायला नवीन कांहीं तरी जाडजूड असें पाहिजे. निदान कित्येक माणसांचीं कपाटें, कधींच वाचावयाचीं नाहींत व विनियोग करून नष्ट करावयाचीं नाहींत, अशा पुस्तकांनीं सुशोभित करण्यासाठीं नवीन महाकाव्यें पाहिजेत म्हणून कित्येक टीकाकारानीं आशा प्रदर्शित केली आहे व कित्येक कवींनीं सुखस्वप्नें पाहिलीं आहेत कीं येत्या ८–१० वर्षांत एक तरी महाकाव्य जन्मास येणार; व तें वाचण्याचें भाग्य महाराष्ट्रास मिळणार!

## मार्गांतली धोंड

हें भाग्य पुरेपूर उपभोगण्याएवढे चोखंदळ रसिक महाराष्ट्रांत आहेत कीं नाहींत याची वानवा आहे. असें नवीन महाकाव्य निघणार म्हणून कोणींही जुनीं वाचण्याचें सोडून दिलेलें नाहीं. खेड्यांतले लोक आपला जुनापुराणा राम घेऊन बसले आहेत. त्यांत, त्याचे वेडे भक्त त्याचींच कीर्तनें करतात. संशोधकांनीं नवीं सत्यें पुढें आणलीं तरी वार्षिक उत्सव कांहीं बंद होत नाहींत; तसेंच कांहीं लोक कृष्णाच्या आणि पांडवांच्या नादीं लागले आहेत. कृष्ण जाणून बुजून मदनाचा बाप, चोर, जार, शंभर टक्के मुत्सद्दी, वाटेल त्या वेळीं वेष पालटणारा, अन्तर्बाह्य काळा !! पण काय ? लोक त्याच्याच मागें, त्याचींच गीता वाचतात. कृष्ण एक नव्हे तीन होते असेंही कित्येकांनीं सांगून पाहिलें. पण हे आपले जुन्या मताला अनुसरणारे लोक, नवमताला वाट देतच नाहींत. यामुळें नव्या कवींचीं शक्ति मध्येंच खचते; त्यांच्या उत्साहाला खीळ पडते. आधींच हिंदुस्थानचे लोक गरीब, त्यांत हीं जुनीं महाकाव्यें विकत घेऊन बसलेले; ते नव्या महाकाव्यांचें कुठलें गिऱ्हाईक व्हावयाचे ? जुनीं महाकाव्यें हे तर नव्या महाकाव्याचे मोठे शत्रू. त्यांची उचलबांगडी केल्याशिवाय नव्या महाकाव्याची प्राणप्रतिष्ठा कशी व्हायची ? म्हणून नवीन महाकाव्य लिहूं इच्छिणारांनीं ही आपल्या मार्गांतली धोंड एखाद्या नवमतवादी टीकाकाराच्या हातांपायां पडून अगोदर दूर केली पाहिजे.

## निव्वळ आत्मवंचना

जुने व जुन्याचे भोक्ते सोडून फुलपांखराप्रमाणें नव्या वस्तूवर झडप घालणारे तरी महाकाव्याला कितीसे अनुकूल आहेत तें पाहूं ! नवज्ञानानें परिणत-प्रज्ञ झालेले बहुतेक सुवर्णशृंखलांनीं बद्ध असतात. चौवीस तासांपैकीं पोटापाण्याच्या उद्योगांत, निद्रादेवीच्या आराधनेंत व दैनिक शरीरयात्रा उरकण्यांत बावीस तास जातात, त्यांतून दोन तास कसून वाचण्याचा भोक्ता असला तर तो सार्वजनिक वाचनालयांत मोफतच्या ज्ञानसत्रांत अगर स्वार्जित धनांतील एकदोन वर्तुलाकृति ताम्रनाणीं खर्चून घेतलेल्या वार्ताविहारांत घालवावयाचा. ज्ञानाचीं मासिक, साप्ताहिक, दैनिक, प्राहरिक वगैरे अष्टौप्रहर उघडीं अशीं सदावर्तें असतांना, सर्वसंग्रहासारख्या, कालान्तरानें अवतरणाऱ्या, बहुमोली व प्रवास करतांना बरोबर न्यावयाचा म्हटल्यास बरोबर एखादा भारवाहक पाहिजे, अशा ग्रंथाचा ज्ञानवाहक होण्याचें कोणाच्याहि मनांत येत नाहीं. वाचकांची अभिरुचि अशी पालटल्यावर

महाकाव्य प्रसवण्याची एखाद्या कवीनें इच्छा धरणें म्हणजे निव्वळ आत्मवंचना करणें होय; तसेंच एकाद्या रसिकानें हल्लींच्या काळांत महाकाव्याच्या प्रसिद्धीची अपेक्षा करणें म्हणजे मृगजलाचें पाणी पिऊन ग्रीष्मपीडित शरिराचा दाह शांत करण्यासारखेंच होय!!

## अलौकिक उदात्तता

आतां विषयाच्या दृष्टीनें महाकाव्याची निष्पत्ति होणें शक्य आहे कीं काय तें पाहूं. वरवर पाहिल्यास महाकाव्याचा विषय त्रोटक दिसतो. सीतेचें रावणानें केलेलें हरण व त्याचें रामाकडून शासन एवढाच, रामायण या महाकाव्याचा विषय आहे. अशा घटनांचीं उदाहरणें प्रत्यहीं घडतात. कोर्टाची पायरी चढून एक दिवस न्यायासनापुढें चालणाऱ्या फौजदाऱ्या पाहिल्या तर त्यांत बरेच स्त्रीहरणाचे खटले ऐकूं येतील. रामाचा खटला व हे सोम्या गोम्याचे खटले यांच्यांत विषयाच्या दृष्टीनें व कायद्याच्या चौकटींत बसण्याएवढें तंतोतंत साम्य आहे. या आजकालच्या गोष्टी कशाला! रामाच्या वेळची व स्वतः रामाला जीमुळें उद्वेग झाला अशी एक परिटाच्या जोडप्याच्या भांडणाची गोष्ट ऐकूं येते. पण महाकाव्य त्या परिटाच्या कथेवर न होतां रामावरच रचलें गेलें. परीट आपल्या बायकोला ताडण करतो व पतित स्त्रीचा उद्धार केल्याबद्दल रामाला आपल्या ग्राम्यभाषेंत दोष देतो. त्याचा निर्धार पाहिला तर रामालाही मागें हटविणारा आहे. पण रामचरित्र गाऊनच वाल्या कोळ्याचा वाल्मिक ऋषि झाला. रामाला जें महाकाव्याचें नायकत्व प्राप्त झालें तें त्याच्या उदात्ततेवरूनच! रामाचा सीतात्यागसुद्धां किम्वदन्तीवरूनच केलेला दिसतो. वेदाध्ययन करणाऱ्या शूद्राचें निर्दालन करण्यामध्यें किंवा वालीचें निर्दालन करण्यामध्यें किंवा ताटिका हननामध्यें आधुनिक दृष्टीनें दोष दिसला तरी त्याची पितृभक्ति, त्याचा वानरादिक प्राणिमात्रावरील लोभ, त्याचो स्ववचनासाठीं कष्ट सोसण्याची तयारी, त्याचा त्याग, व त्याची बंधुप्रीति हे गुण अलौकिक आहेत. आजकालचे तंटे पाहिले किंवा १०० रुपयांसाठीं दोन भावांमधलीं भांडणें पाहिलीं कीं हीं कृत्यें अशक्य कोटींतलीं वाटतात. पण सामान्य माणसाला जें अशक्य तेंच रंगविण्यामध्यें कवीचें खरें कल्पनारम्यत्व, व तेंच रसिकाचें रसास्वादाचें खरें ठिकाण हें विसरून चालणार नाहीं. संशोधकाच्या दृष्टीनें पाहिल्यास यांतून बरीच वजाबाकी करावी लागेल; पण लोक जें रामायण वाचतात, तें मन रमविण्याकरितां, व ईशभक्तीमध्यें रंगून जाण्याकरतां. फूल हें रसज्ञाच्या दृष्टीनें

सुंदर, केवळ वाग्देवीच्या विलासाचें स्थान, पण सत्यशोधक वनस्पतीशास्त्रज्ञाच्या मतें तें प्रजोत्पत्तीचें इंद्रिय. केवढा हा दृष्टीदृष्टींतील फरक !

## उदात्ततेचा दुसरा अवतार

दुसरा उदात्ततेचा मूर्तिमंत अवतार म्हणजे महाभारत होय. लोक जुगार नेहमींच खेळतात, त्याच्यासाठीं सर्वस्व घालवतात, तुरुंगवास भोगतात, व पुन्हां जुव्वेबाजीमध्यें दंग होतात. अशा कुशल जुव्वेबाजांत व धर्मराजांत महदंतर आहे. शांततेचा अवतार असणारा व लोकांना ललामभूत असणारा असा धर्मराज पैसे मिळविण्यासाठीं फांसे टाकीत नाहीं. भीम सारखा ओरडून जरासंधाच्या हाडांच्या बनविलेल्या फांशांना भिववीत असतां, त्याला गप्प बसावितो. सभोंवतीं शकुनीसारख्या शठानें जाळें पसरलें असतां 'शठं प्रति शाठ्यं' ह्या कुटिलनीतिचा उपयोग न करतां, शठाशींसुद्धां सत्य व पवित्र आचरण करतो. याबद्दल चौदा वर्षें वनवास सोसूनही, व त्या वनवासाचे कटु अनुभव येत असतां आपलें व्रत मुळींच विसरत नाहीं. चित्ररथ गंधर्वानें दुर्योधनादि शत बंधूंना हतबल केलें त्या वेळीं भीमाला वाटलें कीं घोषयात्रा करणाऱ्या व त्या निमित्तानें आपलें वैभव पांडवांस दाखवून, पांडवांस ओशाळे करूं इच्छिणाऱ्या दुर्योधनाला ही योग्य शिक्षा झाली. पण भीमाप्रमाणें धर्माच्या मनांत सूडाची भावना मुळींच जागृत होत नाहीं. तो म्हणतो, 'ज्या वेळीं आपण आपसांत लढूं त्या वेळीं आपण १०० विरुद्ध ५ पण ज्या वेळीं त्रयस्थाशीं गांठ पडेल त्या वेळीं आपण १०५' असें उदात्त आचरण त्रिभुवन धुंडूनही सांपडणार नाहीं, अशा प्रसंगांच्या अवलोकनानें 'न जाणे न नेणे' अशांशिवाय इतरांना निर्भेळ आनंद झालाच पाहिजे.

## महाकाव्याचें राष्ट्रीय महत्त्व

महाकाव्याचा विषय झालेल्या व्यक्ति व विषय उदात्त असतात एवढेंच नव्हे तर त्या राष्ट्रीय महत्वाच्या असतात. ही गोष्ट पाश्चिमात्य महाकाव्याचें उदाहरण घेऊनही कळण्यासारखी आहे. मिल्टननें आद्य मानवाच्या अधःपतनावर महाकाव्य रचिलें व देवाच्या प्रतिपक्षाला म्हणजे सैतानाला नायकत्व दिलें. प्रत्येक मनुष्याच्या मनांत वावरणाऱ्या बऱ्यावाईट वासनांना आधारभूत धरून हें काव्य रचिल्यामुळें ह्या काव्याला सार्वकालिक महत्त्व आहेच. पण विशेषतः त्यांतील व्यक्ति ह्या ख्रिश्चन तत्त्वज्ञानाच्या परिभाषेशीं जुळणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही ख्रिश्चन राष्ट्राला

त्याचें महत्त्व आहे. हेलनच्या हरणामुळें उद्भवलेल्या ॲकिलीस व पॅरीस यांच्या युद्धाचें, ग्रीक लोकांना तसेंच महत्त्व आहे. नुसत्या व्यक्तिच राष्ट्रीय महत्त्वाच्या असतात असें नाहीं; त्यांतील नीति, त्यांतील छोट्या कथा, त्यांतील वर्णनें, प्रसंगाचें वैपुल्य यामुळें महाकाव्य हा एक कविकल्पनेचा महासागरच बनतो. एवढ्या मोठ्या सागरांतून १४ च रत्नें निघालीं पण यांतून असंख्य रत्नें निघावयाचीं !

## भ्रम सोडा

आज राष्ट्रीय भावनेला आपल्याकडे ऊत आलेला आहे. इंग्लिश लोकांनीं चंबुगबाळें आटपून जर ते इथून कूच करतील तर प्रत्येकास इवेच आहेत. पण लोकांना जी परकियांकडची सत्ता घ्यावयाची आहे किंवा कित्येकांना जें इंग्रजांच्या खांद्याला खांदा भिडवून राज्य करावयाचें आहे, तें समतेच्या तत्त्वावर. आपल्याला एकमुखी राज्यसत्ता मुळींच नको. प्रत्येक राष्ट्राची घडपड, तशीच, जुन्या राजवटीचा ओनामा गिरवणाऱ्या राजवटीमध्यें बंडें हीं लोकसत्तेसाठीं होत आहेत. अठरा वर्षांवरील माणसें कायदेशीर रीत्या मतदानास लायक झालीं पाहिजेत, व तशीं लायक होण्यासाठीं लोकसत्तेच्या तत्त्वावर उभारलेली मर्यादित स्वायत्ततेची घटना थोड्याच दिवसांत इथें राबणार आहे. इतर राष्ट्रांत लोकसत्तेचें स्वरूप निराळें व इथें निराळें; इथें त्याला ज्ञातिनिष्ठेची व वर्गविभागणीची छटा दिसून येते; वाङ्मयाच्या दृष्टीनें एवढें खरें आहे कीं वर्गवारीनें, जातवारीनें किंवा भेदानें लोक दिङ्मूढ झाल्यामुळें त्यांना इतर पुढारी निस्पृह असूनही गर्हणीय वाटतात. लोकशाही स्वराज्यपक्षाच्या एखाद्या कार्यकर्त्यावर जर आज काव्य रचलें, तर कॉंग्रेसच्या भक्तांस मिरच्या झोंबावयाच्या; तसेंच उदारमतवादी कार्यकर्त्यावर एखादी ओळ रचली तर तें साम्यवाद्यांस मुळींच खपावयाचें नाहीं. हे सर्व मतभेद सोडून एखाद्या दलित माणसाचें चित्र रेखाटावें तर त्याच्या चरित्राचा प्रपंच तो केवढा वाढणार ? दुसरें असें कीं जी व्यक्ति दिवंगत झाली ती जाऊन बरेच दिवस लोटले पाहिजेत तत्पूर्वी जर ती व्यक्ति काव्याचें अधिष्ठान झाली तर तें काव्य सार्वकालिक महत्त्वाचें नाहीं म्हणून लोक फेंकून द्यावयाचे. आधींच लोकोत्तर व्यक्ति असूनहि त्यांच्यावर प्रत्याघात होतात, व रोजरोज नवें राजकारण उपस्थित होत असल्यामुळें जुन्या व्यक्ति विस्मृतिपथांत विरून जातात ही झाली नागर जनांची गोष्ट. खेड्यांत पाहावें तां पूर्वीचे आपले अवतारी पुरुष ठाणें देऊन बसलेच आहेत मिळून, सध्यां एखादें महाकाव्य निर्माण करावयाचें म्हणून जर

एखादा कविध्रुव, कर्णाग्रावर लेखणीला क्षणभर विराम देऊन बसला असेल, तर त्यानें व त्याचें काव्य वाचून, यान्त्र जन्मीं याच डोळां तो सोहाळा पाहून मोक्ष मिळवूं इच्छिणाऱ्या रसिकानें, हा भ्रम सोडून द्यावा; व रामायण महाभारताचेंच एकदां आकंठपान करावें हें उत्तम.

—नोव्हेंबर १९३६

---

## ३ : वाग्देवीचीं वन्य भूषणें

### मयूर-पिच्छांचे भाईबंद

'धुर झिला घराची आठव रे । पांच तरी रुपाये पाठव रे ॥' ही ध्वनिमुद्रिका पुष्कळांच्या परिचयाची आहे. या ध्वनिमुद्रिकेंतील गीतांत कवीनें एका ग्रामीण पित्याचें अंतःकरण ओतलें आहे. मुंबईत आलेला मुलगा, मुंबईच्या मोहिनीनें वहावत जातो. मूळ घराकडे पाठ फिरवितो. याचें, मजेदार चित्र यांत रेखाटलें आहे. त्यांतही मुलाच्या आयुष्यावर मुंबईच्या हजारख्याली जीवनाचे परिणाम काय होतात, त्याचें मूर्तिमंत चित्र नसून, मुलगा पारखा झाल्यामुळें, बापाच्या हृदयांत काय कालवाकालव होते, याचें हें आविष्करण आहे. आधुनिक परिभाषेचा उपयोग करून बोलायचें म्हणजे, या गीतांत एका पित्याच्या भावनांचें विश्लेषण आहे. परंतु त्याला 'विश्लेषण' याच्यासारखे नागर संस्कारांना परिचित असे शब्द लावावे कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे; कारण यांत जें भय चितारलें आहे तें आहे अनागर. अनागर असा नकारपूर्व गीर्वाण शब्द कां वापरा? तें मन आहे निव्वळ गांवठी. व त्या मनांतील विचारही सांगितले आहेत गांवटी शब्दांत. मग या गांवठी 'बाबाला' टिळक, केशवसुत यांच्या नागर कृतींशीं टेंकून बसवायचें कीं काय! आपली वाग्देवी तर पडली नागर परंपरेची! तिला हीं मराठमोळीं माणसें आवडतात तरी कशीं? पण या वेळीं एक गोष्ट ध्यानांत ठेवायची कीं सरस्वती देवीला जसे 'कटाव' चे कटिबंध आवडतात, किंवा 'सन्मणिमालेचे' सर आवडतात, तसेच 'मयूरपिच्छांचे

भाईबंद,' म्हणजे वर दिलेले गांवठी चरण आवडले तर नवल नाहीं. कारण ज्या कृष्णाला कौस्तुभमणी आवडतो, त्यालाच तुळशीच्या श्यामवर्ण मालाही आवडतात.

**अस्सल गोपगीतें**

श्रीकृष्णाला तुळशी आवडतात म्हणून वाटेल तीं जीर्णपर्णें किंवा पानपाचोळा आणून आपण भगवंताची पूजा बांधीत नाहीं. फक्त तुळशीच्या कोमल मंजिऱ्याच आपण श्रीकृष्णचरणांशीं वाहतों; तसेंच त्याच्यावर त्याचें ओझेंही होणार नाहीं याची काळजी घेतों. मराठी भाषेच्या उद्यानांत आज जशीं काळजीपूर्वक लालनपालन केलेलीं भावगीतें जन्मतात, तशींच वरच्या-सारखीं ग्रामगीतेंही तिच्या चरणांपर्यंत येत असतात. यांत सर्वच उत्कृष्ट गीत असतात असें नाहीं. ही, उत्कृष्ट–निकृष्ट निवडण्याची चाळणी नाइलाजानें लावावी लागते. नाहीं तर गल्लीकुचींतून निघणारे काव्यध्वनि सरस्वतीच्या शिरोभागीं विराजमान झाले असते. शिमग्याच्या मोसमांत बरींच गीतें निर्माण होतात. त्या सर्वांना काव्यांत स्थान द्यावें लागलें असतें. तसेंच ज्यांच्यावर नागर मनाचा संस्कारही झाला नाहीं असे पुष्कळ लोक स्वतःच्या घरगुती भाषेंतही रचना करतील व त्यालाहि गोपगीतांमध्यें आपण स्थान देऊं. उदाहरणासाठीं एक खास लोकगीत त्याचा थोडा पेहेराव बदलून रसिकांच्या सेवेस सादर करूं. "**पाउस पडला । चिखल झाला । पोरें वाळवेलीं** ॥ मूळ गीताची लज्जत चाखतां यावी म्हणून "**वाळवेलीं**" हें रूप कायम ठेवलें आहे. "**चाकरि नाहीं, चुकरि नाहीं, घरीं रिकामा । मारवाड्याचे तांदुळ आणले, लागलि समानां** ॥" ऱ्हस्व 'रि' व 'दु' व 'समन्स' याचें 'समानां' असें मराठीकरण असें हें त्रिवेणी संगम झालेलें दुसरें उदाहरण पाहा. अशा तालबद्ध रचनांना काव्यप्रांतांतून बहिष्कृत करावयाचें की काय? हींसुद्धां अस्सल मराठी मनाचींच चित्रें आहेत व अस्सल गांवठी पोषाखांत आहेत. वास्तविक गोपगीतें, व्रजगीतें तीं हींच. पण हीं गीतें एकाच बाजूला राहून निराळींच त्यांचें स्थान पटकावितात. तात्त्विक दृष्ट्या यांचाहि लोकगीतांत अन्तर्भाव व्हायला पाहिजे; पण तसा करण्याचें बरेच लोक टाळतात. सध्यांचे दिवस काव्यगायनाचे असल्यामुळें बरेच कवि " गाऊं दावुन आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधें " या कोटीचे असतात. रस्त्यांत गाऊन दाखवितात एवढी अतिशयोक्ति झाली. पण काव्यगायनांतही स्वतःची कविता गाण्याकडे लोकांचा ओढा असल्यामुळें कविलोक स्वतःच नवीन गीतें रचतात व तीं म्हणतात. यामुळें खरीं जीं लोकगीतें

तीं व्रजगीतें किंवा ग्रामगीतें या सदरांतून जाऊन 'ग्राम्य-गीतें' या कोटींत पडलीं आहेत. वर दिलेल्या गोपगीतांनाच अव्वल दर्जाचीं व्रजगीतें म्हणा असा आमचाही आग्रह नाहीं. पण खरीं लोकगीतें कशीं असावीं याला वरील उदाहरणें बरींच उद्‌बोधक होतील.

## घाणा व आंबा

वृत्त अगर रचनावैशिष्टय व विषय हे वरील चरणांचे अतिशय ओबडधोबड अशा स्वरूपांत दोन पैलू आहेत. ज्यांना आपली कविता जास्त लोकांत पसरवायची असते, त्यांना हीं वृत्तें घेऊनही त्यांचा आपल्या मताच्या, विचारांच्या अगर भावनांच्या प्रसारार्थ उपयोग करतां येईल. हें गुह्य कित्येक जुन्या साधुसंतानींही ओळखलें होतें. चिदानन्द नामक एका जुन्या संतकवींनीं 'घाणा' 'आंबा' अशा रचनाविशेषाचा उपयोग करून, आपलें गहन तत्त्वज्ञान काव्यरूपानें सांगितलें आहे. 'घाणा' व 'आंबा' हे दोन लग्नांतील आचार आहेत : ज्या वेळीं हे दोन आचार पाळले जातात, त्या वेळीं म्हणावयाचीं हीं दोन गाणीं आहेत. मराठे वगैरे समाजांतील अशिक्षित स्त्री मंडळी कांहीं ओव्या रचून या दोन आचारांच्या वेळीं म्हणतात. परंतु विहिणीच्या रुसण्यासंबंधीं, नवरीच्या शृंगारासंबंधीं, किंवा व्याह्यांच्या बडेजावासंबंधीं ज्या पूर्वी ओव्या होत्या, त्यांचें रूप कायम ठेवून अन्तःस्वरूपांत ह्या उपर्युक्त श्रींनीं बदल केला. "**विवाह आरंभ स्थूलदेहीं ॥ निजशांति नोवरी, निर्गुण साकारी ॥ सुलग्नाची परी, ऐका श्रोते** ॥ १ ॥ असें घाण्याचें अधिष्ठान त्यांनीं बदललें व "**मुळीं फळ असे। फळीं मूळ दिसे। तो आंबा प्रकाशे साधुसंगे** ॥ २ ॥ असें 'आंब्याला' अद्‌भुत रूप दिलें. आधुनिकांनीं हा मार्ग सोडलेला आहे. फक्त कांहीं कहाण्या लिहितांना स्वतःचे विचार गद्यलेखक कहाण्यांच्या प्राकृत धाटणीनें सांगतात. पण कविता लिहितांना विचार–प्रबंध, वृत्त व भाषा यांचा मेळ असावा म्हणून मराठमोळ्या भाषेचा अवलंब करतात. आरंभीं उल्लेखिलेल्या गीताप्रमाणें कांहीं गीतें यशस्वी होतात; पण कित्येक प्रयत्न मुलाम्याचीं नाणीं आहेत असा भास होतो.

## भावनांचा आरोप

काव्यविषय झालेल्या व्यक्तीच्या भावना रंगवावयाच्या कीं स्वतःच्या भावना रंगवावयाच्या या विषयीं कित्येक कविराजांनीं स्वतःशीं कांहींच संकेत बांधलेला नसतो. वास्तववादाचा पुरस्कार करून स्वतःच्या अकलेचे तारे कित्येक

प्रबंधकार तोडतात. आज विचारसंक्रमणाचा काळ आहे. यांत समाजांतील प्रत्येक व्यक्तीला स्वतःची जाणीव होऊं लागली आहे. 'आम्ही ब्राह्मणांपेक्षां बुद्धीनें, संस्कृतीनें किंवा आचारविचारांच्या परंपरेनें अणुभरसुद्धां कमी नाहीं' असे अट्टाहासाचे उद्गार हरिजनांकडून येऊं लागले आहेत. याचा प्रतिध्वनी नेमका एखाद्या लघुगीतांत सांपडतो. कर्मठ भटजीबरोबर भांडणारा महाराचा किशोर–पोर नव्हे–वरचेंच उद्गार काढतो. तो म्हणतो, 'मी तुमच्यापेक्षां का कमी आहें? माझें कूळ उच्च आहे, माझे आचार मान्य आहेत, माझे विचार तर किती आक्रमणशील आहेत, हें आपण पाहतच आहांत." अस्पृश्यता हा कलंक आहे कीं भूषण आहे, हा येथें चर्चेचा विषय नाहीं. फक्त अस्पृश्यतानिवारणाच्या वावटळींत सांपडलेले कवि कसे बहकतात हेंच पहावयाचें. बहकतात असें म्हणण्याचें कारण "आपण समाजांतील व्यक्तींच्या मनाचें चित्रण करतों" असें म्हणतात व भावना चितारतात त्या स्वतःच्या. वास्तविक पांढरपेशा जातीस तुच्छ लेखावयाचें किंवा "भटजीं" ची टर करावयाची, हें एखाद्या पुढाऱ्याच्या चरित्रांतील गुपित असतें. स्वत्वाची जाणीव पोराला झालेली नसते, बहुजन समाजास नसते. आज जर चळवळीपासून अलिप्त अशा खेड्यांत आपण पाहिलें तर देवळाची पायरी ओलांडणें हें कित्येक अस्पृश्यांस अधम्य वाटतें. कित्येकांस गाभाऱ्यांत जाणें हा हक्क नसून, तो अधर्म आहे, असें वाटतें. असाच बहुजन समाज आहे. अघळपघळ भाषेंत, पाहिजे तर याला 'न्यूनगंड' असें नांव द्यावें व तन्निवारणार्थ झटावें. पण 'न्यूनगंडा'च्या तडाख्यांत सांपडलेला पोरगा एकदम एखाद्या भटजींशीं हमरीतुमरीवर येणार नाहीं. याचा निष्कर्ष असा कीं ज्या भावना आपण अस्पृष्टांच्या म्हणून स्वीकारतों, त्या खरोखर कवीच्याच असतात; व निव्वळ एखाद्या काल्पनिक व्यक्तीवर त्याचा आरोप केलेला असतो.

## कांहीं गोपगीतांची चर्चा

पांढरपेशा समाजाला भावना असतात तशा इतरांनाही असतात, हा या कवींचा आद्य सिद्धान्त आहे. मनुष्यमात्राला भावना असावयाच्या. त्याला शेतकरी, महार, मांग किंवा मजूर कसा अपवाद असेल? पण दोघांच्या भावनांत पुष्कळ फरक असतो. पूज्यभाव ही एक भावना घेतली, तर सुशिक्षित मनुष्य ती चेहऱ्यावरील हास्यानें, दृष्टीच्या स्तिमितानें किंवा मानेच्या लवण्यानें व्यक्त करील. पण एकादा अस्पृश्य ती लवून, केविलवाण्या मुद्रेनें पाहून व "मायबाप दीनावर दया करा' अशांसारखे शब्दप्रयोग करून, आपली पूज्यबुद्धी व्यक्त करील. ह्यांत

श्रेष्ठकनिष्ठत्व कोणाला द्यावयाचें तें कवीनें ठरवावें. पण भावनादर्शनाच्या तऱ्हा ह्या समाजपरत्वें निराळ्या, हें त्याला कबूल करावें लागेल. गिरिशांनीं "**मावळ्यांचें गाणें**" हें एक गोपगीत रचलें आहे. त्याच्यामध्यें शिवाजीच्या धोरणाचा पुरस्कार करून, त्यानें 'तोरण' कसें बांधलें किंवा त्याची "इगत" कशी होती, याचें दिग्दर्शन केलें आहे. 'तेची इगत' सारख्या शब्दप्रयोगांमुळें व रचनेच्या सौष्ठवामुळें हें गीत परिणामकारक होतें. म्हणजे भावना वठते. भावना ह्या दृष्टीनें पहावयाचें तर एवढी नम्र निष्ठा व पूज्य विषयापासून गुण घेण्याची चाड, थोड्याच ठिकाणीं सांपडेल. परंतु ह्या चरित्रांत जें सिंहावलोकन करून ज्या बोधप्रद गोष्टी काढल्या आहेत, त्या एखाद्या परिणतप्रज्ञ व शिवाजीचें चरित्र अथपासून इतिपर्यंत हाताळून त्याचा साकल्यानें विचार करण्यासाठीं सरसावलेल्या विद्वानांच्या तोंडीं शोभतील. आज जर मावळे पाहिले तर देशाभिमानविरहित आढळतील. हा त्यांचा दोष नव्हे. खरोखरीच ते शिवाजीच्या चरित्रानें भारले असते तर ते केवळ भारवाहक अगर मार्गदर्शक झाले नसते. त्यांनीं स्वराज्यसाधनाचा मार्ग काटला असता. त्यांच्यांतसुद्धां शिवाजीविषयीं आदरभाव असणार पण तो कथामय आठवणींच्या रूपानें; शिवाजीच्या चरित्रावरील लहानलहान आख्यायिका त्यांच्याजवळ असावयाच्या व त्यांना अवतारी दृष्टीनें ते पाहावयाचे. म्हणून भावना-परिपोष व निर्दोष रचनाचातुर्य यांमध्यें हें गाणें बिनतोड असलें तरी तें गोपगीतांच्या अस्सल परंपरेंत वाढलें आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. 'शिवरायाचा आठवावा प्रताप' या समर्थोक्तीपेक्षांहि ह्या गीताचा उठाव किंचित् जास्त नागर आहे. 'न्हारीचा वखुत' यांतील भावनेला जो स्पष्टवक्तेपणा दिला आहे, तो सुद्धां नागर माणसांत थोड्यामध्यें आढळेल. या गीतांतील भावना नैसर्गिक आहे व तिला दिलेलें गांवठी वातावरण रम्य आहे. पण 'पाहिलं जरी रोज मी । तरि हौस न होई कमी' हा स्पष्टवक्तेपणा या भावनेला किंचित् अपकारक झाला आहे. 'भलरी' या गीतांतील वातावरण मात्र सहजरम्य आहे.

## गुराख्यांचीं गाणीं

यावरून असें दिसून येईल कीं गोपगीतें लिहिणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. आपल्याकडे कित्येकांनीं 'गोपगीतें' या शब्दाचा वाक्यार्थ घेऊन, गुराख्याचीं गाणीं लिहिलीं आहेत. उन्हातान्हांतून किंवा थंडीवाऱ्यांतून तळमळणाऱ्या गुराख्याला क्वचितच गाणें सुचतें. पण कवीच्या सोईकरतां त्याला गाणें सुचतें,

हें आपल्याला गृहीत धरलें पाहिजे. आपल्याला मिळणारीं सुखें ही प्रासादनिवासांतही मिळणार नाहींत, अशी जी दर्पोक्ति दिसून येते ती गोपांच्या बोलींत कधींच दिसून येत नाहीं. प्रासादसुखाची ओढ लागल्यामुळें मुंबईकडे खेडवळ मंडळी धांव घेतात व गुराखी आज दुर्मिळ झाले आहेत, हें कित्येक कवींच्या गांवींही नाहीं. धनिकांना तुच्छ लेखण्याएवढें त्यांचें अवलोकन नसतें. धनिकाचीं गुरें वळणारा धनिकाला तुच्छ कसा लेखील ? दुसरें असें कीं त्यांचीं जीं गाणीं असतात तीं जनावरांवर, चाबकांवर किंवा पशुपक्ष्यांवर. स्वतःच्या सुखाचें, करवंदांच्या खाण्याचें, व झुळझुळणाऱ्या झऱ्याच्या पाण्याचें, तो जें वर्णन करतो, तें खरोखर कवीनें जी एखादी खेप गांवांत टाकलेली असते, त्याची गोड आठवण होय व तिचा आरोप तो गुराख्यावर करतो. व्रजगीतें लिहिणाऱ्या कवींनीं अगोदर व्रजजीवनाशीं समरस झालें पाहिजे. मुंबईहून पुण्यास जातांना आगगाडींतून दिसणाऱ्या ‘ कांबळीवाल्या ’ गुराख्यावर कविता करून भागणार नाहीं. ती कल्पनारम्य होईल. पण वास्तवरम्य नाहीं. तसेंच व्रजगीतें हीं सरस्वतीचीं वन्य भूषणें आहेत हेंही विसरून भागणार नाहीं. खेडवळांनाही नागर बनविण्याचे आज आपले ग्रामसुधारणेचे प्रयत्न आहेत. त्यावरून खेडवळ जीवनाला गौणत्व आहे, हें स्पष्टच आहे. म्हणून हीं वन्य भूषणें सरस्वतीच्या चरणीं वाहतांना आखडता हात घेतला पाहिजे.

—ऑगस्ट १९३६

---

# ४ : भाषाभिमानाचें तारतम्य

## मी आणि माझें घर

आजकाल कूपमंडूकवृत्तीनें कोणालाच राहतां येणार नाहीं. जरी एखाद्यानें असा विचार केला कीं मी आणि माझें घर, मी आणि माझा समाज यांतच मी वावरणार, तरी तें मुळींच शक्य नाहीं. असें राहणें एकदाच शक्य आहे आणि तें म्हणजे आत्म्याला विदेहावस्था प्राप्त झाल्यावर आर्थिक परिस्थितींतील स्थित्यन्तरामुळें जसा एखादा गांव सध्यां स्वतंत्र राहणें शक्य नाहीं, तसा विचारांच्या

क्षेत्रांत एखादा मनुष्य, समाज अगर प्रांत, स्वतंत्र व स्वावलंबी राहणें शक्य नाहीं. पूर्वी असा एक काळ होता, कीं गांवांतच धान्य पिकवावें, गांवांतच त्याचा खप करावा, गांवांतच त्याला लागणारीं उपकरणें, म्हणजे नांगर वगैरे विकत घ्यावे व बनवावे, यामुळें ग्रामसंस्थेला स्वायत्तता लाभली होती. हेंच चित्र त्याच्या परिसीमा वाढविल्यावर एखाद्या प्रांतास लागू पडण्यासारखें होतें. यामुळें एखाद्यानें जर मी माझीच भाषा बोलणार व माझ्याच गांवची भाकरी खाणार, असें म्हटलें तर त्याला शक्य झालें असतें. आज प्रत्येक प्रान्ताच्या परिसीमा वाढलेल्या आहेत. डोंगर, अरण्यें, समुद्र इत्यादि नैसर्गिक सीमांनीं आपली मर्यादा सोडलेली नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील गंगेचें पाणी कृष्णेच्या पाण्यास येऊन मिळालेलें नाहीं. पण उत्तर हिंदुस्थानांतील विचारांचें वारें, मान्सून वारे प्रतिकूल वाहून कदाचित् त्याला अडथळा करूं लागले, तरी संयुक्तप्रान्तांतून अग्निरथाच्या द्वारें सह्याद्रीची भिंत ओलांडून व विंध्य पालथा घालून सप्तकोंकणांत येऊं शकतें. विचारांची देवाण-घेवाण चालू झाली कीं विचारांचें माध्यम जी भाषा, तिच्यावरही तिचे आघात होणार.

## व्यापारी देवघेव

अशे आघात कां होतात? त्यांचे परिणाम भाषेवर काय होतील? हे प्रश्न विचाराई आहेत. भविष्यकालांत हें दळणवळण होत आहे असें कल्पिलें, तर भविष्य-काळ रम्य दिसण्याऐवजीं प्रवाहपतिताची जी गत होते, तीच गत आपल्या भाषेची होईल कीं काय, असा विचारवन्तांपुढें एक घोटाळ्याचा प्रश्न उभा राहतो. आर्थिक व व्यापारी क्षेत्रांत वावरणाऱ्या लोकांचा आपण विचार करूं. मुंबईत असें दृश्य आपणांस प्रत्यहीं दिसतें. दाक्षिणी व गुजराती असे लोक एकत्र आल्यामुळें जी एक भाषा तयार होते ती ऐकण्यासारखी असते. ही भाषा आपल्याच क्षेत्रांत वावरते असें नाहीं, तर गुढघ्यापर्यन्त कोट, एक विशिष्ट वीण घातलेली टोपी, मलमलचा अर्धा शर्ट, हीं जशीं दाक्षिणी लोकांनीं उचललेलीं असतात, त्याचप्रमाणें 'कुंपनी' 'चालेनी' वगैरे शब्दही ते उचलतात; व आपल्या चुलीपर्यन्त घेऊन जातात. असें जर अप्रतिहत रीतीनें व्यापारचक्र चालू राहिलें तर त्याचा अनिष्ट परिणाम होईल, याबद्दल तिळमात्र संशय नाहीं. जी गोष्ट गुजरातीशीं संबंध असणाऱ्यांची, तीच गोष्ट इंग्रजीशीं संबंध असणारांची. व्हाउचर, डिविडंड, गिल्ट एजेड वगैरे शब्द अगदीं माजघरांत पोंहोचले आहेत. हे शब्द म्लेंच्छोद्भव आहेत, ते "गिल्ट एजेड" (मुलामा असणारे व धारेचे) आहेत व त्यांनीं मराठी भाषेच्या चौरस स्वरूपास कंगोरे पडत आहेत, याची कोणालाहि जाणीव नसते.

याचेंच थोडेसें अतिशयोक्तियुक्त चित्र रंगविलें तर तें मात्र भयानक होईल. आज ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लावतांना तिच्या स्वतंत्र व्याकरणाची मदत घेऊन आपणांस लावावा लागतो. प्रमोदसारखीं कित्येक साप्ताहिकें ज्ञानेश्वरीच्या कांहीं ओव्या आपल्या पहिल्या पानावर उद्धृत करतात; त्यांच्याच सोबत जर त्यांनी त्या ओव्यांची 'छाया' छापली नाहीं तर त्यांच्या अर्थाची छायासुद्धां वाचकाऱ्या मनःपटलावर पडणार नाहीं, मग अर्थ तर दूरच राहो!! तशीच स्थिति पुढें येईल.

## नाजूक पण गहन प्रश्न

ही जशी परंपरा सुटलेल्या वाचकांची स्थिति तीच त्या व्यापारी गृहस्थांच्या बाबतींत घडेल, असें वाटूं लागतें. हें भेसूर चित्र मनाशीं रंगविल्यामुळें कांहीं सोवळ्या लोकांनीं परकीय भाषेवर बहिष्कार घालावयाचें ठरविलें आहे. असे लेखक शब्द दिसला कीं तो आपला कीं परका याचाच तेवढा विचार करतात. "रिस्ट वाच" असें एकाद्याला म्हणतांना त्यांनीं ऐकलें कीं ते म्हणतात, "कां हो म्लेंच्छ शब्दानें आपले हात विटाळतां? हातांतलें घड्याळ म्हणा ना! नाहीं तर 'कालकंकण' असा देवभाषेंतील शब्द वापरा. '**स्टेशन**,' '**टेबल**,' '**काउंटर**', '**बँक**' यांजबद्दलही असेच '**ठाणें**', '**मेज**', '**मर्यादा**', '**कोषालय**' असे कांहींसे शब्द वापरतां येतील. परंतु एकतर हे शब्द लोकप्रिय नसतात व मुळच्या शब्दाचा नाद, अर्थाची गोम व सूचकता तसेंच ठाकठिकी हीं बिघडतात. यामुळें चारचौघांत बोलावयाचें झालें तर 'नागरी' भाषाभिमानी पांढरपेशा गृहस्थ, संस्कृत घरीं पाणी वाहत असतांनाहि '**सहधर्मचारिणी**' असें न म्हणतां '**मिसेस्**' असेंच म्हणतो. 'पत्नी' असा शब्दोच्चार करतांना त्याचे ओंठ जरा माघार घेतील व आवाज खोल होईल. पण 'मिसेस्' असें म्हणतांना त्याच्या चेहऱ्यावर गांभीर्याऐवजीं आपुलकीचा भाव झळकूं लागेल. दोहों बाजूंचा विचार केला तर प्रश्न नाजूक व गहन भासतो. एका बाजूनें आपल्या भाषेवर आक्रमण होत आहे हें कळतें, तर उलट बाजूनें चारचौघांत हट्टी व विलक्षण म्हणवून घेणें शक्य नसतें. मराठी भाषेशिवाय इतर भाषांतून सहीसुद्धां करणार नाहीं, अशा भीष्मप्रतिज्ञेचे राजवाडे निर्माण झाले तर मराठीचें दैन्य क्षणार्धांत फिटेल. पण व्यवहार व ध्येयनिष्ठा यांत नेहमीं जमीनअस्मानाचें अन्तर असावयाचें. म्हणून या दोन पक्षांची तोंडमिळवणी करणें प्राप्त आहे. "रूढ झालेल्या शब्दांची गोष्ट सोडा पण नवीन शब्द आणूं नका" असा कित्येकांचा पोक्त सल्ला आहे. पण 'टेबल', 'गव्हर्नर,'

असे रूढ शब्द सोडले तर ह्यांची निवड करतांना फार कठीण जाईल. एखाद्या डॉक्टरला '**टॉन्सिल**', '**किडनी**', '**अॅस्थमा**', '**ब्रॉंकायटिस**' हे शब्द मुखोद्गत असतात. तो जर पुस्तक लिहूं लागला तर हे शब्द त्यानें परिचितांच्या सदरांतच धरावयाचे ! एखाद्या वकिलाच्या कोशामध्यें '**अफिडेव्हिट**', '**अपील**', '**हिअरिंग**', '**माय लॉर्ड**' हे शब्द रूढ झालेलेच असतात. वकील, डॉक्टर व कूळ किंवा गिऱ्हाईक यांची तीन 'व्यवहार–वर्तुळें' काढलीं तर तीं एकमेकांना एका विविक्षित क्षेत्रांत छेदतील. पण व्यक्ति तेवढ्या प्रकृति या न्यायानें पुन्हां 'रूढ' याची व्याख्या बदलेल. तरी पण भाषेला स्थायी स्वरूप पाहिजे. ज्ञानेश्वरी सारखे ग्रंथ छायेच्या मदतीनें वाचतां येण्याची परिस्थिति जेथवर दूर लोटतां येईल तेवढी बरी, म्हणून निदान लेखकांनीं शब्दयोजना करतांना स्वत्व विसरूं नये. एवढाच त्यांना सामान्य सल्ला देतां येईल. कित्येक लेखक मराठी शब्द योजतात पण त्याला प्रतिशब्द इंग्रजी देतात. नाइलाजानें असें करावें लागतें. लोकसत्ता असें नुसतें म्हणून भागत नाहीं (Democracy) असें लिहून लोकसत्तेला कुंपण घालावें लागतें. पण यालाही पळवाट आहे. प्रथम लोकसत्तेचें पूर्ण विवेचन करावें व नंतरच तो शब्द योजावा. अशी एथवर दिलेली सूचना फक्त लेखकांनाच देतां येईल. बोलणाराचें तोंड कोणीही धरूं शकणार नाहीं. त्यांच्यावर ग्रंथांचा व चळवळींचा काय उपयोग होईल तेवढाच.

## अब्दुल रहमान आणि तुळशी

भाषाभिमानाचें दुसरेंहि एक स्वरूप आपणांस पहावयास सांपडतें. मराठींत अर्थवाहक शब्दांची समृद्धि नाहीं, असें कळल्यावर कित्येकांनीं विडा उचलला कीं तिला समृद्ध करावयाची. जगांतील सर्व भाषेंतील शब्दांच्या गोणी तिच्यावर लादावयाच्या. ज्या वेळीं खरोखर मुसलमानी अम्मल होता त्या वेळची गोष्ट निराळी, पण आंग्लाईमध्यें सुद्धां '**खामकां,**' '**दिल्गुर,**' यांसारखे '**छुप्या**' अर्थाचे शब्द मराठींत येऊं लागले. लोकांशीं व्यवहार करतांना, उदाहरणार्थ, 'अबदुल रहिमान आणि कंपनी' यांच्या दुकानांतून छत्री आणतांना, तिच्याबरोबर कंपनीच्या छापाचें वेष्टण आणणें निराळें आणि फुलें तुळशी विकत घेऊन त्याच वेष्टणामध्यें गुंडाळून आणणें निराळें. नैसर्गिक गोष्टीला कोणी हंसत नाहीं. पण मुद्दाम केलेल्या गोष्टींचा सहजच लोकांना कंटाळा येतो. दुसरेंही एक आपल्याकडे बंड आहे. तें संस्कृताच्या व बखरीच्या फाजील अभिमान्यांचें होय. यांपैकीं पहिले "सकाळीं उठून चहा प्यालों" असें म्हणणार नाहींत. ते "**प्रातःसमयीं उन्नत होत्साता नूतनसोमपान करता**

झालों " असें कांहींतरी म्हणतील. एकाला मोटारींतून प्रवास करीत असतां आपलें नवें घर पाहिलें, असें लिहावयाचें होतें. त्यानें " **अग्निरथांत स्थानापन्न होऊन मार्गक्रमण करीत असतां युष्मद् नूतन पाषाणबद्ध निवासस्थान अवलोकिलें** " असें लिहिलें. अभिमान कौतुकास्पद आहे. पण व्यवहार्य नाहीं. तसेंच कित्येक लोक ' राज्य ' असें न म्हणतां ' राजवट ' म्हणतील किंवा " लाख माणसें मेलीं " असें न म्हणतां " **लाख बांगडी फुटली** " असें म्हणतील. या उदाहरणांपैकीं दुसरें उदाहरण बखरीच्या वाक्प्रचाराचें अनुकरण आहे, हें सहज कळेल. असें अनुकरण कितपत इष्ट आहे, हें ठरविण्यापूर्वी मराठींत आणखीहि एक वारें खेळत आहे, त्याचा विचार करूं व नंतर या अभिमानाचें तारतम्य ठरवूं.

## अभिमानाचें तिसरें वारें

हें तिसरें वारें म्हणजे प्रान्ताभिमान होय. मराठी ही महाराष्ट्राची भाषा असली तरी कित्येकांना वाटतें कीं, ती कित्येक जातींचीच भाषा आहे. अशी समजूत करून घेतल्यामुळें कित्येक असें म्हणतात, ही आजपर्यंतची ह्या वर्गाची बढाई आतां पुरे झाली. खेड्यापाड्यांतून वावरणारा जो शेतकरीवर्ग त्याची भाषा म्हणजेच खरी भाषा होय. पुन्हां तुल्यबल जातींतसुद्धां शब्दप्रयोग व वाक्यरचना यांचा भेद आहेच. तो भेद दृष्टिआड करूनसुद्धां पुढें मुंबईला विरोध करावयाचा म्हणून कित्येक लोक रांगडी भाषेची तळी उचलून धरतात, तर कित्येक असें म्हणतात कीं गोव्याची, खानदेशी वगैरे या उपभाषा नसून त्या स्वतंत्रच भाषा होत. असा या अभिमानाचा शाखाप्रपंच वाढल्यामुळें लेखनसाहित्य, तसेंच बुद्धि व पैसा यांचा व्यर्थ अपव्यय मात्र होत आहे. हीच शक्ति, बुद्धि व युक्ति एकाच केंद्राकडे जर वेधली, तरच खरें कार्य होणार आहे. समजा, एका गृहस्थाला समुद्रतीरावरील शहराचें वातावरण रंगवायचें आहे. त्यानें समुद्रावरील एका बंदराला भेट दिली व वातावरणांत समुद्रतीराचा वास येत आहे, अशी सत्यसृष्टि निर्माण करण्यासाठीं माशांचीं सुमारें पन्नास नांवें आपल्या कादंबरींत ठेऊन दिलीं, तर अशा रीतीनें भाषासमृद्धि होते कीं काय असा प्रश्न उत्पन्न होतो.

## इष्ट वळण

सारांश, सांप्रदाय निर्माण करणें हें भाषेला भूषणावह आहे; पण सांप्रदाय विचारांचे असावेत, भाषेचे नसावेत. आपले बरे किंवा वाईट विचार सांगणें किंवा

आपल्या सभोंवतालच्या जीवनाचें चित्र रेखाटणें म्हणजे स्वतःच्या आवडीच्या वाक्यरचनांची कसरत करणें नव्हे. ज्ञानेश्वरी, बखरी, किंवा आंग्लवाङ्मय यांना तुच्छ लेखणें, हें जसें एकेपरी पक्षपातीपणाचें आहे, त्याचप्रमाणें यांतील एकेकाचीच तळी उचलून धरणें हें पक्षपातीपणाचें आहे. जुन्या–नव्याचा कसून अभ्यास करावा व विचार सांगण्यासाठींच किंवा वेळीं प्रसंगीं मतप्रसारासाठींच भाषेचा उपयोग करावा, म्हणजे भाषेला इष्ट असें वळण लागेल व लेखकावर '**शिष्ट**' असा छाप बसणार नाहीं.

—मे १९३६

---

# ५ : मराठीच्या उपभाषा

## भाषा आणि उपभाषा

भाषा ही नेहमीं प्रवाही असते. प्रवाहाला अडविणें कोणाच्या हातीं आहे? तो एकदा सुरू झाला, की समुद्राला जाऊन मिळावयाचा. पण त्याच्यावर अवर्षणाची आपत्ति येण्याचा संभव असतो. जर कां मेघरायाची अवकृपा झाली, तर प्रवाह थांबलाच; किंवा जर का इतर छोटे छोटे प्रवाह त्याच्या वाटेंत येऊन त्यांनीं त्याला खंडणी दिली नाहीं, तरी अडतेंच. मग त्याची समृद्धि तरी कशी व्हायची? भाषेची नेहमीं समृद्धि व्हावी, तिची शब्दसंपत्ति वाढावी, तिला अर्थचमत्कृति उत्पन्न करण्याचा लवचिकपणा यावा, मनांतील विचारांची व विकारांची छटान् छटा उकलून टाकण्याची भाषेंत ताकद असावी, असें प्रत्येक ग्रंथकारास व प्रत्येक भाषाभिमानी वाचकास वाटत असतें. पण हा शब्दसंपत्तीचा झरा वाढणार कसा? किंवा प्रवाहाच्या दृष्टान्तांत म्हटल्या-प्रमाणें ती क्षीणदेही तरी राहणार नाहीं कशावरून? आजकाल ग्रंथनिर्मिती-कडे फार लक्ष आहे, विचारांच्या लाटा फारच उसळत आहेत. पण त्यांच्याबरोबर एक नाजूक प्रश्न उत्पन्न झाला आहे. मराठी भाषेच्या ज्या कांहीं उपभाषा आहेत किंवा बोली आहेत, त्यांच्यांत व मराठी भाषेंत तेढ उत्पन्न होते कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली आहे. कित्येक उपभाषा स्वतंत्र होतील, व मराठीला मग

सम्राज्ञी म्हणून आपण तिला आरती ओवाळूं, असें जर कोणास वाटेल, तर तें चुकीचें आहे. या बाबतींत अविभक्त कुटुंबपद्धतीचें उदाहरण बरेंच बोधप्रद होईल. सध्यांच्या दळणवळणाच्या व आर्थिक स्वातंत्र्याच्या दिवसांत कुटुंबाचा घटक विभक्त होऊं पाहतो, व तो केव्हां केव्हां आपोआप तसा होतो. उलट चार भावांनीं मनांत आणल्यास कुटुंब एकत्रितही चालू शकतें. तीच गोष्ट भाषांतील उपभाषांची आहे.

## प्रचलित मराठी

परंतु ही आत्मीय भावना कशी निर्माण करावी याचा विचार करण्यापूर्वी उपभाषा या स्वतंत्र भाषा आहेत काय ? मध्यभाषा व पोटभाषा किंवा उपभाषा असे शब्दप्रयोग इष्ट आहेत कीं काय ? याचा विचार करूं. वास्तविक भाषा ही ब्रह्माप्रमाणें अनाद्यनंत आहे. तिची सुरवात केव्हां झाली, ती त्या ईश्वरालाच माहीत ! पण ती कालौघाबरोबर वाहत राहिली व ओघाचें स्वरूप जसें बदललें तशी बदलली हें त्रिकालाबाधित सत्य आहे. वडीलधाऱ्या व स्नेहसंबंधीं माणसांपासून भाषणेच्छु मुलाला भाषेचा लाभ होतो व तो लाभ चालू राहतो. पण मुलगा बिनचुकपणें भाषा शिकता, व असाच जर क्रम चालला असता, तर भाषेची एकदां परिणति झाल्यावर त्यांत फरक पडला नसता. पण आपणांस असा पिढ्यान् पिढ्या क्रम सांपडत नाहीं. जसा वेलविस्तार वाढतो, तसा माणूस प्रवास करतो व त्याच्या भाषेंत फेरबदल होतो. म्हणूनच संस्कृत वाङ्मयांत किंवा मराठी वाङ्मयांत कालानुक्रमानें भेद आढळून येतो. शब्द, प्रत्यय व रचना हीं तिन्ही बदलून एका मनुष्यसमाजची भाषा दुसऱ्या मनुष्यसमाजास समजेनाशी झाली, कीं आपण त्यांना भिन्न भाषा म्हणतों. उपभाषांचाही कांहींसा वरच्यासारखा व थोडासा भिन्न प्रकार आहे. आज मराठीच्या गोमांतकी ऊर्फ कोंकणी, अहिराणी, चित्पावनी, कारवारी, वऱ्हाडी अशा ज्या उपभाषा म्हणून रा. कृ. पां. कुळकर्ण्यांसारख्या भाषाशास्त्रकोविदांनीं मान्य केल्या आहेत, त्या मध्य मराठी जाणणाऱ्या व लिहिणाऱ्या जनतेला सहज समजतात. पण त्याबरोबर मात्र असें म्हणतां येणार नाहीं कीं, आज जी विश्वविद्यालयानें मान्य केलेली मराठी आहे, तिच्या ह्या मुली आहेत. कारण कोणीही पुणें, पैठण, नगर इत्यादि ठिकाणांहून जाऊन हे उपभाषांचे प्रान्त बसविले नाहींत, उलट असें मात्र दाखवितां येईल कीं, महाराष्ट्राच्या बाहेरून कित्येक पुढारलेल्या ज्ञाति या उपभाषांच्या प्रान्तांत येऊन राहिल्या. उदाहरणार्थ, "संगमेश्वरीं वाण्यांमध्यें कानडी वळण आहे"

" कोंकणांतील वाणी मुळचे गुजराथी व मागाहून महाराष्ट्रीय झाले आहेत " हें मत खरें मानलें, तर त्यांच्या लहानशा मुलखाची भाषा मराठीची मुलगी म्हणावयाची, कीं गुजराथीची सून म्हणावयाची ? तसेंच आजचे गुजराती जी भाषा मराठी म्हणून बोलतात ती मराठी कीं तिची उपभाषा, कीं स्वतंत्र भाषा ? म्हणून महाराष्ट्राच्या दूरदूरच्या भागांतल्या ज्या बोली आहेत, त्यांना उपभाषा म्हणणें म्हणजे त्यांचा व पर्यायानें मराठीचा उपमर्द करणें होय. कारण ही तिकडची प्रचलित मराठी होय. भाषेचा बदलत जाण्याचा धर्म असल्या-मुळें त्या प्रान्तांतील तें भाषेचें स्वरूप असें म्हणावें.

## ऐनजिनसी नाणीं

प्रांतांतील एका विभागाची तरी एक भाषा असावी, तर तेंही नाहीं. हिंदु-स्थानच्या दुर्दैवानें म्हणा अगर भाषेच्या दुर्दैवानें म्हणा, हिंदुस्थानांत अनेक वर्ण व अनेक पोटजाती आहेत. प्राचीन धंद्यावरून जे एकदां वर्ण निर्माण झाले, त्यांचेच प्रांतभेदामुळें आणखी उपवर्ण निमार्ण झाले आहेत. आज कांहीं पांढरपेशे लोक जरी इतरांचा धंदा करूं लागले असले, तरी त्यांच्यापुरतें पांढरपेशांच्या भाषेचें वैशिष्ट्य राहतें. यामुळें दुकानदार ब्राह्मण व पिढीजाद वैश्य हे शेजारीं शेजारीं क्रयविक्रय करीत असले, तरी भाषेचा विनिमय क्वचितच करतात. यामुळें या उपभाषांच्या प्रदेशांत आणखीही उपभाषा मानण्याची अनवस्था प्राप्त होते. कोळी, ब्राह्मण व मराठे जरी एकाच उपभाषेच्या प्रांतात वावरत असले, तरी ते आपल्या भाषेस दुसऱ्याचा संपर्क लागूं देत नाहींत व शिष्टांच्या दृष्टीनें जी अधिकृत भाषा, तिचा सोंवळेपणा कायम ठेवतात. परंतु त्रयस्थांना त्या भाषेंतील कांहीं विशिष्ट वर्गच दिसतात व त्यांच्यावरूनच आपण उपभाषांना ओळखतों. बारा बारा मैलांच्या टापूंत भाषा बदलते असें म्हटलें, तर ती जशी अतिशयोक्ति, तसेंच जातींजातींत भाषा बदलते, व धंद्याधंद्याच्या अनुक्रमानें तिच्यामध्यें पालट होतो असें म्हटलें, तर तेंही वस्तुस्थिति सोडून नाहीं. कांहीं व्यापारी लोक " **चकारें** " " **पकारें** " " **सुत्रा** " " **मोळू** " अशा तऱ्हेचे नवीनच शब्द प्रचारांत आणतात, तर कांहीं गद्यशब्दसृष्टीचे ईश्वर " **दांडी मारणें** " " **वाघ मारणें** ", " **आवा पास करणें** " अशांसारखीं ऐनजिनसी व कोरीं खणखणीत नाणीं पाडतात. अर्थात् ही चलनी नाण्यांची बनावट रोज होत असतांना व त्यांत वर्गवारीनें भिन्नत्व दिसून येत असतांना पोटभाषांचें नामकरण तरी कसें करणार ?

## नांवें प्रादेशिक हवीं

पण आपल्याकडे चुकीनेंच कांहीं उपभाषांचीं नांवें प्रचलित होत आहेत. "**चित्पावनी**", "**कोंकणी**" व "**अहिराणी**" हीं तीं उपभाषांची नांवें होत. आमचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, भाषा ही एखाद्या जातीच्या मालकीची इस्टेट नव्हे. तिच्यावर समाजाचा सारखाच हक्क आहे. दुसरे असें कीं, ज्या वर्गांची भाषा एकाच प्रान्तात अगर प्रान्तविभागांत समजते व थोड्याशा प्रत्ययांनीं भिन्न असते तिला भिन्न भाषा असें तरी कां म्हणावें ? तसेंच, एकाच भागांत जे उच्च अगर सुधारलेले असे वर्ग मानले असतील, त्यांच्यावरून त्या प्रान्तांच्या भाषेस कां संबोधावें ? उत्तर कोंकणापासून प्राचीन कुडाळप्रान्तापर्यंतच्या भागांत प्रचलित असलेल्या भाषेस कित्येक लोक चित्पावनी ह्या नांवानें ओळखतात. वास्तविक या भागांत चित्पावन समाज जी भाषा बोलतो, तीच इतर ब्राह्मण बोलत असतात, असें नाहीं. किंवा हा समाज जिथून पूर्वी आला, तिथच्या एखाद्या स्वतंत्र भाषेचें, हें मराठीपासून पृथक् असें स्वरूप आहे असेंही नाहीं. 'बघेवी' वगैरे रूपें मराठीशीं नातें सांगणारीं दिसतात. बरें, या समाजाचासुद्धा, ही भाषा स्वतंत्र मानावी, तिला दुसऱ्या भाषेची लेक मानूं नये, असा आग्रह नाहीं. चिपळूण सोडून देशावर अगर इतरत्र स्थाईक झालेल्या एकदोन चित्पावन ब्राह्मणांस जेव्हां आम्हीं हें नांव दाखविलें, तेव्हां त्यांना या भाषेच्या अस्तित्वाचाच संशय आला. 'आम्ही असली भाषा कधींच बोलत नव्हतों.' असें त्यांनीं सांगितलें. चित्पावनी या उपभाषेस चिपळुणी, रत्नागिरी, अगर राजापुरी असें एखादें प्रादेशिक नांव दिलें, तर जास्त शोभण्यासारखें आहे. तसेंच चुकीनें वापरण्यांत येणारें दुसरें नांव म्हणजे 'कोंकणी' हें होय. गोवा प्रांतांतील लोक बोलतात तिलाच कित्येक लोक 'कोंकणी' या नांवानें ओळखतात. या प्रान्तांत साष्टीकर म्हणून जो सुसंस्कृत समाज आहे, त्यासच पूर्वी लोक 'कोंकणे' या नांवानें ओळखीत. 'कोंकणे ऐसी ओळखें लक्षणें' असे जुने उल्लेखही आहेत. या सुविद्य, सुसंस्कृत व तत्प्रान्ताबाहेरील माणसास चटकन् डोळ्यांत भरणाऱ्या समाजावरून जर हें नांव रूढ झालें असलें, तर तेंहि वरील 'चित्पावनी' ह्या नांवाप्रमाणें अन्वर्थक नाहीं असें म्हणावें लागतें. किंवा जर तें नांव कोंकण या सह्याद्रीच्या पश्चिम पट्टयावरून पडलें असेल, तर तेंही अतिव्यास आहे. कारण गोवें हा कोंकणांत मोडणारा एक लहानसा प्रान्त आहे. "गोयंकार "गोयंबाब" या शब्दाप्रमाणें "**गोंयबोली**" असा शब्द लावला तर तो शोभून दिसेल. कारण त्यांत गोवें याचें गोव्यांच्या भाषेंतील "गोंय" हें रूपही

22CE3 99720 13|4

आलें, व बोली ह्या मध्यमराठी भाषेच्या शब्दावरून तिचें शिष्टमान्य भाषेशीं नातेंही दिसून आलें. " अहिराणी " ह्या नांवावरून आहिरांची भाषा असा बोध होतो. तिलाही एकाच समाजाची भाषा असें न म्हणतां खानदेशी म्हटलें तर जास्त चांगलें. हें नामकरणाविरुद्ध आक्षेपयुक्त लेखन कित्येकांना कटु वाटेल, पण भाषा ही प्रादेशिक असते, हें ध्यानांत ठेवलें तर, व मराठी भाषेची हानी न होतां तिचीं ज्ञातिभेदविरहित भावंडें भाषेंत भेदातीत राहून त्यांनीं विचारविनियम करावा व एकोप्याचा आस्वाद घ्यावा असा सिद्धान्त ग्राह्य धरला तर, नांव देतांना शिष्टांनीं किती सावधगिरी बाळगिली पाहिजे, हें कळेल !

## प्रादेशिक शब्द

सर्व महाराष्ट्राची म्हणून एकच भाषा मानावी व तिच्या प्रादेशिक स्वरूपांना वर्गविशिष्ट नांवें असूं नयेत, असें म्हटल्यानें ह्या प्रान्तविशिष्ट बोलींचें आम्ही महत्त्व कमी करूं इच्छितों असेंही नाहीं. कित्येक प्रान्तविभागांत फिरून आज कित्येक संशोधकांनीं जनतेंत रूढ असलेल्या गोष्टी, म्हणी व गाणीं गोळा केलीं आहेत. समाजशास्त्राचा व भाषाशास्त्राचा अभ्यास करणारांना ह्या अमोलिक देणग्याच होत. समाजाचे व्यवहार कसे चालतात, त्यांच्या समजुतीचा जीवनावर काय परिणाम होतो, प्रत्यय व वाक्यप्रयोग कसे बदलतात, हें यावरून कळेल. उदाहरणार्थ, अलिबागकडे शिष्टसम्मत भाषा बोलणारे लोक '**इकुडल्या**' '**तिकुडल्या**' असें म्हणतात. तसेंच चिपळुणाकडचे शुद्ध भाषा बोलणारे लोकही 'करताच ना' यांतील 'च' चा उच्चार किंचित् 'त' सारखा करतात. असा वर्णोच्चारामध्यें बदल कां होतो हें पाहणेंही मनोरंजक आहे. यासाठीं प्रादेशिक संवाद, गोष्टी, चुटके जेवढे अस्सल स्वरूपांत लिहितां येतील तेवढे लिहावे. पण आज जी, अशीं गाणीं गोळा करण्यांत किंवा लोककथा संशोधण्यांत एकदेशीयता दिसून येते, तशी दिसून येऊं नये. भूमिका अभ्यासकाची असावी, प्रचारकाची नसावी. कारण आज एखादा संग्राहक एका विशिष्ट प्रान्तांतलें लोकवाङ्मय गोळा करतो व तींच " उपनिषदें " आहेत असें म्हणतो. यामुळें इतर उपभाषांच्या अभिमान्यांस चेव येऊन तेही स्वतःच्या उपभाषेचें घोडें पुढें ढकलतात. उपभाषांतून ग्रंथनिष्पत्ति झाली, तर ती इष्टच आहे. " **बाबू मामालो फणस** ", " **मझी बा खंय गेली ?** " यांसारखे लेख मनोरंजन तर करतात व वाङ्मयांतही भर टाकतातच. पण जेव्हां ह्याच भाषाभिमानाचा अतिरेक होतो, त्या वेळीं मराठीची हानी होईल कीं काय अशी भीति वाटते. वर आम्हीं अविभक्त कुटुंबाचा दाखला दिलाच आहे.

अनेक कुटुंबांमध्यें जर एखादें कुटुंब शोभून दिसलें पाहिजे, तर त्यांत अनेक व्यवसायांचीं व नवविचारांचीं माणसें स्वतंत्र पैसे मिळविणारीं, पण कुटुंबावर कांहीं आपत्ति आल्यास एकत्र किंवा कुटुंबांतील लोकांना एखादा धंदा काढतां यावा म्हणून एखादा स्वतंत्र निधि उभारणारीं अशीं असलीं, तर तें कुटुंब म्हणजे तत्त्वानें स्वतंत्र, पण कृतीनें एकत्र असे असून खरोखर धन्य होय. हा दृष्टान्त भाषेला कसा लावतां येईल तें पहा. श्री. वरेरकरां सारख्या लेखकांनीं "**माड**", "**पोय**", "**नीरा**" असे प्रादेशिक शब्द शिष्टसंमत भाषेंत रूढ केले आहेत. यांत वरेरकरांचें सव्यसाचित्व दिसून येतें. पण असे शब्द रूढ करतांना ते प्रादेशिक आहेत हें ध्यानांत ठेवून त्याचा उपयोग केला पाहिजे. उदाहरणार्थ, "**पोय**" हा शब्द एखाद्यानें वाचला, कीं त्याचा तो अर्थ विचारूं लागतो. गद्य लेखनांत असे शब्द आले, तर त्यांचा परिचय करण्यासाठीं म्हणून लेखकानें त्या शब्दाची यथार्थ कल्पना येण्याकरितां त्याचें स्पष्टीकरण द्यावें. नुसती 'पोय' असें म्हणण्यापेक्षां 'जींतून पुढें नारळ येतात ती निमुळती, हातभर लांब पोय' असें, हा शब्द रूढ करतांना म्हणावें. कारण अर्थ समजून घेण्यासाठीं कोश चाळण्याची खटपट सामान्य वाचक करीत नाहीं. काव्यामध्यें मात्र 'घात', 'भलरी' यांसारखे प्रादेशिक जेव्हां शब्द येतात, त्या वेळीं मात्र त्यांचें स्पष्टीकरण लेखाच्या ओघांत नकळत वाचकांच्या घशांत उतरवणार नाहीं. या बाबतींत कोश किंवा टीपा आहेतच व ह्या सर्व प्रादेशिक भाषांना एका छत्राखालीं आणण्याचें काम महाराष्ट्रशब्दकोशानें केलेंच आहे.

## भाषेचें स्थैर्य आणि वैपुल्य

पण हा उपभाषांचा प्रश्न जास्त दुर्घट होऊं नये म्हणून, वेळींच जपणें बरें. आज सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण नाहीं. यामुळें या महाराष्ट्रांत प्रादेशिक रूपें राहून मराठीला समृद्धि येत नाहीं. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक झालें, व कोर्टकचेऱ्यांतून जर शिष्टसंमत रूपें येऊं लागलीं, तर उपभाषांचा प्रश्नच उगवणार नाहीं. कायदे-पंडितसुद्धां ज्या जबान्या वगैरे तयार करतात त्या पाहिल्या तर तेच प्रादेशिक भाषेची विकृति कायम ठेवतात, असें म्हणावें लागेल. धंदेवाईक वकील जर मनावर घेतील, तर दर दहा मैलांवरचें भिन्नत्व दुरावेल. साहित्य सम्मेलनासही या बाबतींत पुढाकार घेतां येईल. निरर्थक भांडणांमध्यें जो वेळ जातो, व लक्ष्मीच्या सहवासा-साठीं जो सरस्वतीचा खटाटोप चालतो, तो जर खरोखर या प्रादेशिक भाषांकडे वळेल, तर लेखकांना विस्तीर्ण क्षेत्र मिळून त्यांचें दैन्य फिटेल. ही वाङ्मयगंगा

राजकीय केंद्रांत न घोटाळतां गरिबांच्या झोंपडीकडे वळली तर बरी ! किंवा ह्या सम्मेलनानें सर्व प्रादेशिक बोलींतील लोककथा जमविण्याचें कार्य अंगीकारलें, किंवा दूरदूरच्या खेड्यांतून जर फिरतीं वाचनालयें सुरू केलीं, तर भाषेला स्थैर्य, व वैपुल्य आणण्याची शिष्टांची जी इच्छा, ती सफल होईल.

ऑगस्ट १९३६

---

# ६ : जुनें वाङ्मय त्याज्य आहे काय ?

## घोर पातक

वर्तमानपत्रांच्या व मासिकांच्या या कालांत ‘ जुना ’ हा शब्द तोंडांतून निघतो हें ब्रह्महत्येपेक्षां जास्त घोर पातक आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, किंवा रामदास यांच्या काव्यांतून निबंधाच्या शिरोभागीं जरी एखादें अवतरण घेतलें तरी तो लेख वाचकांच्या रोषाला कारण होतो. तें जाड टाइपांतलें अवतरण पाहून नवमताभिमानी वाचक म्हणतो, “ काय हें सन्यातन्यांचें खूळ पिकलें आहे ? हे सनातनी जर एकदां जगांतून नष्ट होतील तर समाजाचें दैन्य फिटेल. ह्या सनातन्यांचें जर मत–परिवर्तन झालें तर स्वराज्यही लगेच हातीं येईल. उद्योगधंद्याची भरभराट होत नाहीं, त्यालाही हे सनातनीच कारण ” अशी एकदां सरबत्ती सुरू झाली कीं जुन्याची तरफदारी करणें दूरच राहतें. जुन्याचा असा तिटकारा करणारांनीं नव्या वाङ्मयाचें आलोडन करून त्यांचें वर्चस्व नव्यावर प्रस्थापित केलेलें असतें, असें मुळींच कोणी समजूं नये. त्यांच्या कानांवरून चार दोन काव्यगायनें, व दहापांच व्याख्यानेंच गेलेलीं असावयाचीं. त्यांच्या अवलोकनांतून चार दोन आधुनिक ग्रंथ गेलेले असावयाचे ! पण मत मात्र बृहस्पतीलाही बुद्धिमत्तेंत मागें टाकणारें. यामुळें विश्वविद्यालयांतून जेव्हां ज्ञानेश्वरी दासबोधासारखे जुने ग्रंथ नेमण्यांत येतात, तेव्हां हे अर्धशिक्षित त्यांना शिव्यांची लाखोली वाहतात. केशवसुतांपूर्वीची कविता जर जळून गेली तर महाराष्ट्राचें फारसें नुकसान होणार नाहीं, असेही उद्गार कित्येक लोक

काढतात. प्रत्यक्ष होळी पेटवून हे लोक त्यांत जुन्या ग्रंथांचा स्वाहाकार करीत नाहींत, हेंच वाङ्मयाचें खरें भाग्य म्हटलें पाहिजे. या मतावर कांहीं लोक असें म्हणतात कीं, "अशीं मतें असेनात कां? त्यांत काय बिघडलें? जुनीं पुस्तकें प्रत्यहीं खपत आहेत. रा. पांगारकरांसारखे वाङ्मयाचा इतिहास लिहीत आहेत; व त्यांच्याच आवडीसारखे आवड असणारे लोक जुने ग्रंथ उपलब्ध झाल्यास ते प्रसिद्ध करीत आहेत. काय जुनें वाङ्मय मरणार आहे?' केवळ कोल्हेकुईने जुनें वाङ्मय मरणार नाहीं खास, पण वर जें उत्तर दिलें, तें आक्षेपांस समर्पक उत्तर नव्हे. तें एक प्रकारें परिस्थितीचें चित्र आहे. आज सनातन्यांचीं पत्रें वेगळीं व सुधारकांचीं वेगळीं अशी स्थिति आहे. त्यांचे विचार एकाच पत्रांत प्रसिद्ध न होतां आपापल्या आवडत्या पत्रांमधून होतात. यामुळें या दोन मतांचा समन्वय होण्याचें चिन्ह दूर राहून, जुन्या विषयीं तिटकाराच तरुण पिढीमध्यें दिसून येतो.

## विकृतींचीं कारणें

अशी, दृष्टीमध्यें विकृति उत्पन्न व्हायला कांहीं कारणेंही आहेत. आजच्या तरुणावर पाश्चात्य वाङ्मयाचा थोडा फार संस्कार झालेला असतो. पाश्चात्य वाङ्मयांतील विचारप्रवाह व पाश्चात्यांची विचार मांडण्याची पद्धति या त्याला परिचित झालेल्या असतात. तिकडे जसें स्वलक्षण वाङ्मय निर्माण झालें आहे, तसेंच त्याच्या लक्षणाची व तंत्राची छाननीही झालेली आहे. तिकडे फुलपाखरासारख्या उडत्याबागडत्या वैणिकापासून तों समुद्रासारख्या गंभीर व अथांग अशा महाकाव्याची निर्मिति झाली आहे. सात मजली हंशा पिकवणारे फार्स आहेत तशीच धीरोदात्त व रौद्ररसपूर्ण अशीं नाटकेंही निर्माण झालीं आहेत. शिवाय नवशिक्या माणसाला रसास्वाद घ्यायला शिकविणारीं पुस्तकेंही तयार झालीं आहेत. एकट्या शेक्सपीअरवर जेवढे ग्रंथ झाले आहेत, तेवढे बायबलाशिवाय इतर कोणत्याहि ग्रंथावर झाले नाहींत असें म्हणतात. वाङ्मयाविषयीं अभिरुचि नसलेला मनुष्यसुद्धां या टीकांच्या एकदां पकडींत सांपडल्यानंतर मूळ ग्रंथाचा मेवा आत्मसात् करून घेण्यासाठीं धडपड करतो. किलरकुच, ब्रॅड्ले यांचे ग्रंथ वाचल्यानंतर कोणता मायेचा पूत शेक्सपीअरमध्यें रचनाचातुर्य, कल्पनासौंदर्य, स्वभावपरिपोष नाहीं असें म्हणेल? वाङ्मय लोकप्रिय करण्यासाठीं टीकाशास्त्राची त्याला जोड मिळाल्यामुळें व इंग्रजी वाङ्मयाचें अवाढव्य विक्राळ स्वरूप पाहिल्या-मुळें मनुष्य भांबावून जातो. महाराष्ट्रांत वावरणारा सह्याद्रि मोठा, एवढा मोठा

कीं त्याचें दरमहा मासिक स्मारक निघतें. पण विंध्य पर्वताची सीमा ओलांडून, एकदा हिमालयाच्या आसमंतात् गेलें, कीं कोठें तो हिमाच्छादित व गगनचुंबी हिमालय आणि कोठें तो उघडा, बोडका सह्याद्रि ! पण ही गौरीशंकराची यात्रा संपवून आपणांला परत महाराष्ट्रांत यावयाचें, हें मात्र विसरतां नये. स्वभाषा, स्वदेश यांचा फाजील अभिमान उत्पन्न होऊं नये, म्हणून ही हिमालयाची यात्रा सुखदायक खरी, पण बर्फाचें पाणी पिऊन आपण थोडेच तहान भागविणार ? आपणांला आपल्या खडकाळ महाराष्ट्रांत, आपल्या बापजाद्यांच्या घराशेजारीं स्वकष्टानें विहीर खणलीच पाहिजे. किंवा आपल्या वाडवडिलांनीं खोदून ठेवलेल्या विहिरीचेंच पाणी प्यालें पाहिजे. साध्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे, आपण आपल्या गरजा पाहून वाङ्मयनिर्मिति केली पाहिजे. आपण जें वाङ्मय निर्मावयाचें, तें आपली परिस्थिति, काल इत्यादि पाहून निर्मावयाचें; नाहीं तर पाश्चात्यांच्या वळणावर '**आंधळयांची शाळा**' निर्माण व्हायची !

## पूर्वग्रहदूषित मतें

हिरव्या चष्म्यांतून पाहण्याची सवय लागली, कीं वाचक विचारूं लागतो कीं, आपल्या जुन्या मराठी वाङ्मयांत वैणिक कुठें आहे ? आपल्याकडे महाकाव्य कुठें आहे ? आमच्याकडे एकांकी नाटकें कुठें आहेत ? याचें चक्क उत्तर 'नाहीं' असें दिलें, तरी कांहीं बिघडत नाहीं. देवल, किर्लोस्कर अगर त्रिलोकेकर यांच्यापूर्वी नाटककार नव्हते; म्हणून त्यांच्या पूर्वीचें वाङ्मय वाचणें त्याज्य कसें ठरेल ? किंवा आपल्याकडे '**स्वर्ग हरपला**' याच्यासारखीं काव्यें नाहींत, असें म्हटल्यानें असलेलें काव्य वाचूं नये, असें होत नाहीं. खरें पाहिल्यास दैनिकें आणि मासिकें यांच्या चतुःसीमेंतून पुस्तकांच्या अंतर्वेदीपर्यंत जाणारी मंडळी फारच थोडी. चुरचुरीत व चिमटे घेणारे चुटके वाचण्याची संवय लागल्यानें तर, ग्रंथांवरून मन उडालेलें. मग मोरोपंत–मुक्तेश्वरांकडे वळतो कोण ! दुसरें असें कीं, घाईनें लिहिलेलें लिखाण घाईनेंच वाचण्याची आपत्ति ओढवल्यामुळें, मतें ही तशींच तात्कालिक. 'यावत्तैलं तावदाख्यानम्' असा सारा प्रकार. यामुळें असे, जुन्या वाङ्मयाविषयींचे पूर्वग्रहदूषित विचार प्रसार पावतात.

## अभंग हित

विचार आज कसेही प्रसार पावत असले तरी, वस्तुस्थिति अशी असल्यामुळें थोडा निराळ्या दृष्टीनें विचार करूं. वाङ्मय जें निर्माण होतें, त्याचे निर्मिति करणाऱ्याच्या दृष्टीनें व वाचकांच्या दृष्टीनें निरनिराळे हेतु असतात.

'जादूगार,' 'गड आला पण सिंह गेला,' 'शापसंभ्रम' यांसारखीं पुस्तकें निव्वळ मनोरंजनासाठीं निर्माण होतात. 'अस्पृष्टांचा प्रश्न,' 'शतपत्रें' 'हिंदुधर्म आणि सुधारणा' इत्यादि ग्रंथ मतप्रचाराकरितां निर्माण होतात. तसेंच "वसईची मोहिम," "ओरायन" यांच्यासारखे ग्रंथ सत्य-शोधनार्थ निर्माण होतात. शिवाय, लेखकांचा, या प्रसववेदना सोसण्यामध्यें लौकिक व लक्ष्मी, यांचें संपादन करण्याचा उद्देश असतोच. याउप्पर हिंदुस्थानांत लेखनावर उपजीविका करणाराला लेखणीसारखें क्षीणदेही बनावें लागलें, तरी लोकसेवेचा व भाषासेवेचा बडेजाव मिरवतां येतोच. पण यांच्यापकीं फारच थोडे हेतु या जुन्या मराठी वाङ्मयनिर्मितीच्या मुळाशीं होते. एकनाथासारखा व्यवहारी, कर्तव्यदक्ष मनुष्य एका आडक्याच्या शोधांत दिव्यांत भरण घालून मध्यरात्र उलटवितो, हें पाहून जनार्दनस्वामींनीं त्याला खरा हिशेब कसा असतो, याचें महत्त्व पटविलें. व मागाहून एकनाथी भागवत निर्माण करणारा एकनाथ निर्माण झाला. मोक्षसाधन हाच या काव्याचा उद्देश होता. आत्महित साधणें, हीच त्याची गुरुकिल्ली होती. तसेंच, हजारों अभंग निर्माण करणाऱ्या तुकारामाला स्वतःचें, अभंग हित कसें साधतां येईल, हीचि विवंचना होती व इतरांनींहि हें अभंग हित साधावें, ही त्याची तळमळ होती. '**सर्व माझें कुळ करीन विष्णुदास, अवघे वैकुंठास पाठवीन**' असा त्याचा निर्धार होता. वाचकांना चुचकारावें असा मात्र मुळींच हेतु नव्हता. लक्ष्मीची आराधना त्यांना मुळींच करावयाची नव्हती. त्यांना फक्त लक्ष्मीधराला पकडावयाचें होतें. म्हणून, ते हातीं वीणा घेऊन '**कंठीं राहें नारायणा**' असें म्हणत असत. पण आज ईश्वरालाच विचारतो कोण? आपण स्वतःच जन्मतों; आपले आईबाप आपलें पालनपोषण करतात. नंतर आपण शिक्षण घेतों. पैसे मिळवितों आणि व्यवहार करतों. यांत या त्र्यस्थाचा काय संबंध? ही नसती ब्याद कशाला? मीच जग चालवितों मग मीच ईश्वर; अशा तऱ्हेची विचारसरणी रूढ झाल्यामुळें व ईश्वर चर्मचक्षूंस दिसत नसल्यामुळें, त्याची कशाला नसती उठाठेव करावयाची? पण या लोकांची जी भौतिक शास्त्रज्ञांवर मदार, तेच बोससारखे शास्त्रज्ञ आतां आस्तिक्य बुद्धि दाखवून जगांतील जीवनतत्त्वाची मीमांसा करतां येत नाहीं, असें म्हणूं लागले आहेत. सोनारानें कान टोंचले तर ते दुखत नसतात. शास्त्रज्ञांनीं हात टेकून, आस्तिक्यबुद्धि पत्करल्यावर मग सगुणो-पासना व निर्गुणोपासना, असे दोन प्रकार येतात. कुठलीहि उपासना घेतली तरी

जोंपर्यंत देहधाऱ्याला वाचा आहे व त्याला जीव आणि शिव यांचें कोडें उकलत नाहीं, तोंपर्यंत शब्दांनीं व्यक्त केलेल्या उपासनामय उद्गारांना महत्त्व राहतेंच व ज्याचें या तात्त्विक विषयांत मन रमतें, त्याचें ह्या विषयावरील काव्यांत मन रमेल. खरी आस्तिक्य बुद्धि नसतांही, ज्याला कोणत्याहि विषयांबद्दल कळकळीनें मतें बनवायचीं आहेत, त्याला मूळ ग्रंथ वाचलेच पाहिजेत. तसेंच प्रांतभिन्नत्वानें तत्त्वज्ञानविषयक प्रश्न कसे उद्भवतात, त्यांना कसें वळण मिळतें इत्यादि महत्त्वाचे प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत, पहिल्यानें ज्ञानेश्वरीसारखें, उपदेशपर ग्रंथावर भाष्य; नंतर एकनाथी भागवता-सारखे किंवा मुक्तेश्वरी भारतासारखे कथानकात्मक व नीतिप्रधान ग्रंथ, तसेंच तुकारामाच्या काळीं झालेली स्वतंत्र भावप्रवणनिर्मिति, नंतर मोरोपंतांनीं केलेलें रूपान्तर इत्यादि ग्रंथांमधून ईश्वरविषयक, उपासनाविषयक, व व्यावहारिक कल्पनांमध्यें कसेकसे फरक होत गेले, हें पाहणें महाराष्ट्राची संस्कृति अभ्यासतांना अवश्य पाहावें लागेल. मात्र, ठोकून देतों ऐसाजे, असें म्हणणाऱ्याला पानहि उघडायला नको.

### अहेव लेणीं

आतां रचनादृष्टीनें विचार करूं. वैणिकें, विलापिका, खंडकाव्यें यांची निष्पत्ति इकडे झाली नाहीं, हें आपण प्रथम दर्शनींच कबूल करूं. मात्र अरबीसमुद्रालगतच्या प्रदेशांत द्राक्षें कां होत नाहीं हें विचारणें, हें आपलें भौगोलिक परिस्थितीचें अज्ञान होय. वैणिकाचा वाच्यार्थच घ्यावयाचा तर, वीणेवर म्हटलेल्या अभंगास वैणिक म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. तसेंच, रसपरिपोषाच्या दृष्टीनें पाहिल्यास शान्तीपर्वा सारखीं श्रेष्ठ स्थळेंही दाखवितां येतील. आख्यानाला खंडकाव्य म्हटलें तरी सनातनी म्हणविणारांची फारशी आडकाठी होईल किंवा एखादा संतदासानुदास फिर्याद् करील, असें वाटत नाहीं. आपण एक गोष्ट विसरतों कीं या शब्दसृष्टीच्या ईश्वरापुढें जो प्रश्न होता तो नवे रचनाप्रकार रूढ करण्याचा नसून, प्राकृत भाषेला 'अहेव लेणें' चढविण्याचा होता; पंडितांपुढें प्राकृताचा प्रकाश पाडण्याचा होता. संस्कृताभिमान्यांपुढें आजही विश्वविद्यालयामध्यें मराठीच्या अभिमान्यांची तिरपीट उडत असते, हें आपण विसरूं शकत नाहीं. नवे रचनाप्रकार, नवीं शास्त्रें, कोश, व्याकरण, वर्तमानपत्रें, सभा, सम्मेलनें, सनदशीर चळवळी इत्यादींचें सौभाग्य लाभूनही आपणांला विश्वविद्यालयाच्या प्रवेशद्वारांत मायभाषेचा केवळ चंचुप्रवेश करतां आला. पुढें लवकरच ही स्थिति पालटेल, ही गोष्ट वेगळी. पण

एवढीं साधनें असतां, जी गोष्ट आपण तात्काळ करूं शकत नाहीं, ती गोष्ट चुटकी-सारखी कशी व्हावी? 'संस्कृतवाणी देवें केली आणि प्राकृत काय चोरापासून आली' असे झगडे करावे लागले व मोरोपंतांसारख्या कवींना काशीमध्यें शलाकापरीक्षेनें आपला बहुमान करून घ्यावा लागला; मग प्रकाशनसमारंभ होण्याचें दूरच राहिलें.

## सुधा आणि काकवी

कित्येक असें म्हणतात कीं, या संत कवींनीं भारत, भागवत इत्यादि ग्रंथ पुढें ठेवून त्याचें 'कॉपी टु कॉपी व माशी टु माशी' असें नक्कल-लेखन केलें, त्याला अक्कल कितीशी लागते? पण ही टीकाकारांच्या कल्पनेची एक शक्कलच होय. श्लोकाला श्लोक व आर्येला आर्या असें भाषांतर कुठेंच मिळणार नाहीं. रघुनाथ पंडितानें, ग्रंथाला मूळ संस्कृत कथेचा आधार घेतला असला तरी 'जो पाहे सदसद्विचार हृदयीं जोपा जनाची करी । जो पावे समयीं, विशेष गणिला जो पावनांभीतरीं ॥' यांच्यासारख्या अलंकारांना मुळांत थोडाच आधार मिळणार? तसेंच ज्ञानेश्वरांनीं स्थितप्रज्ञाच्या समताबुद्धीला जे दीप, इक्षुदंड, वृक्ष यांचे दृष्टांत दिले आहेत, त्यांना भगवन्ताच्या मूळ कल्पनेचा कर्ताकरविता श्रीकृष्ण व ज्ञानेश्वर निमित्तमात्र हाच आधार. हा युक्तिवाद न लढविला, तर कल्पनेचें स्वातंत्र्य त्यांत खास आहे. शिवाय असें दिसून येईल कीं महाराष्ट्रकवींचें स्वातंत्र्य यांतच आहे. पाश्चिमात्य लोक, कथा किंवा एखादी कलाकृति याचा जो साकल्यानें मनावर परिणाम होईल, त्याला प्राधान्य देतात. याच दृष्टीनें म्हणजे परिणामकारकतेच्या दृष्टीनें लघुकथेला आज प्राधान्य आलेलें आहे. उलट पूर्वकालीन मराठी लेखक कल्पनेला महत्त्व देतात. मोरोपंतांच्या कित्येक आर्यांतून, आर्येच्या प्रथमार्धांत कथेचा एक लहानसा धागा असतो व उत्तरार्धांत उपमा, दृष्टांत, रूपक यांच्या सारखे अलंकार असतात; "**तो शर-गर-घर-वरसा, पवि-सा, रवि-सा, स्मरारि-सायकसा। पार्थभुजांतरिं शिरला, वल्मीकामाजि नाग-नायकसा** ॥ या आर्येंत शब्दालंकार व अर्थालंकार योजून एकच कल्पना रंगविली आहे. पण टीकाकर घसरतात, ते यांत प्रसाद नाहीं या तत्त्वावर. प्रसाद याची व्याख्या 'अर्थसौलभ्य' अशी करतात. प्रसाद हा गुण सापेक्ष असल्यामुळें त्याच्यावरच महत्त्व देण्यांत अर्थ नाहीं. प्रसाद, वगैरे तीन गुण व नवरस अशी विभागणी व अर्थांची वाच्य, लक्ष्य, व व्यंग्य अशी त्रयी या संस्कृतांत स्वलक्षणें आहेत. त्या गोष्टी

मराठी कवींनीं नकळत, तर कित्येकांनीं अभ्यासानें उचललेल्या आहेत. कथानकामध्यें कोडें उत्पन्न करून नंतर त्याचा उकल करणें, हा पाश्चिमात्य कथेचा एक तंत्र-नियम असतो. तसाच, ह्या कवींचा स्फुट कविता—मग ती कथेचा भाग का असेना—ती भूषविणें, असा अलिखित संकेत दिसतो. पण या तंत्रापेक्षां मंत्राकडेच लेखकांचा ओढा होता. 'चातुर्याचे योगें कवित्व करिती! प्रासादिक अंग आणितां न ये!' या उक्तीवरून चातुर्याला गौण महत्त्व येतें. तुकारामानें एकदाच सांगून टाकलें आहे 'सुपाटोपलीचे कवि, आम्ही सुधा हे काकवी.'

—ऑगस्ट १९३६

---

## ७ : जिवंत वाङ्मयाचा झरा

### हरघडी प्रकाशणारें वाङ्मय

आजकाल वाचन हा एक प्रतिष्ठेचा विषय बनून गेला आहे. खांकोटीला एकतरी वर्तमानपत्र मारलेलें नाहीं, असा पुरुष मुंबईत विरळा. वाङ्मय एवढें स्वस्त झालें आहे कीं, दोन पैसे खर्च केले कीं वाङ्मयगंगा दाराशीं घो घो धांवत येते. सहस्ररश्मी सूर्यनारायणाचे किरण भूतलावर अवतीर्ण होण्यापूर्वींच, या वाङ्मय-गंगेची लाट लोकांच्या डोळ्यांवरून जाते. '**प्रभात**', '**नवाकाळ**' असे ललकार कानीं पडतांच डोळे चोळीत उठणारे बहुत! 'क्रॉनिकल्'चा ओढून ताणून लांब केलेला ध्वनि कानीं पडूनच कित्येकांना प्रातःस्मरणाचें पुण्य घडतें. असा हा वाङ्मयनिर्मितीचा खटाटोप अहर्निश चालू असतां, एखाद्या बृहस्पतीची तरी प्राज्ञा आहे काय, हें वाङ्मय नाहीं असें म्हणण्याची? वाङ्मयानें पोट भरून मरण्याची पाळी आली आहे! असें हें हरघडी प्रकाशणारें वाङ्मय, स्वतः सरस्वतीला तरी वाचून होत असेल कीं नाहीं याची वानवा आहे. बाकी, देवीच्या मनांत आलें तर अनेक चमत्कार करून दाखवितां येतात. त्यांतला एक अलौकिक चमत्कार म्हणून तिला या वाङ्मयाची नोंद करून ठेवणें शक्य आहे. पण सामान्य माणसाला प्रश्न पडतो कीं, या वाङ्मयांत एवढें

आहे तरी काय ? हृदयाचे संदेश व विभूतींचे आदेश, ते हेच काय ? वाङ्मयाचा जिवंतपणा यांतच लपून बसला आहे काय ?

## नव्या दिवशीं नवें पुस्तक

येथवर झाली वृत्तपत्रांची गोष्ट. वृत्तें मिळविणें व त्यांचा प्रसार करणें, एवढीच जर त्यांची इतिकर्तव्यता असेल, तर त्यांत कांहींएक वावगें नाहीं. आहेत झालें धंदे-वाईक; म्हणून त्यांच्याकडे काणाडोळा करतां येतो. पण त्यांच्याच हाताला हात लावून शेंकडों मंडळें, हजारों प्रकाशक व लाखों प्रकाशमाला निघतच आहेत. धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय—एक का दोन ? जेवढीं म्हणून ज्ञान-विज्ञानाचीं अंगें आहेत, त्यांत सारखी ग्रंथनिष्पत्ति होत आहे. हेन्री फोर्डनें जशी, प्रत्येक शिरागणिक एक मोटार निर्माण करावयाची, अशी महत्त्वाकांक्षा धरली होती, तशीच वाङ्मयाधिष्ठात्री देवतेनें पुस्तकें व कालानुक्रम यांत शर्यतच लावली आहे. " नवा दिवस, नवें पुस्तक " अशी म्हण प्रचारांत आणली, तर ती वस्तुस्थितीचें कांटेकोर निदर्शन करील. कदाचित् कोणी म्हणेल कीं, हल्लीं नव विचारांचें वारें लोकांत संचारलें आहे; त्याचाच हा सारा प्रताप. लोक फार विद्वान, उद्योगी व चारित्र्यसंपन्न बनले आहेत. देशांत संपत्तीचा पूर वाहत आहे. लोकांना मनो-विनोदनावांचून कांहीं काम नाहीं. तमाशे, खेळ, रेसिस वगैरे सर्व बंद पडलीं आहेत. आणि जो उठला सुटला, तो पुस्तकांत डोकें खुपसून बसला आहे. क्रीडांगण, क्लब्स वगैरे सर्व ओसाड पडत असून, नवीं वाचनालयें उघडावीं लागत आहेत.

## पुस्तकांना खप नाहीं

पण खरा प्रकार याच्या अगदीं उलट आहे. पुस्तकें निघत आहेत. पण तीं वाचकांच्या गळ्यांत बांधावीं लागतात. कांहींतरी प्रति खलास व्हाव्या म्हणून पुस्तकालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. तसेंच ग्राहकांची मनधरणी करावी लागते. पाहा हें पुस्तक किती सुंदर, किती नवविचारपरिप्लुत, किती विद्वानांनीं वाखाणलेलें, अशी त्याची जाहिरात करावी लागते. इतकें करून कुठें भागतें ? वर्तमानपत्रें, मासिकें इत्यादिकांत त्याचीं स्वकीय लोकांकडून परीक्षणें लिहावीं लागतात. तेव्हां कुठें पांचशें प्रति खपतात व शेंदोनशें रुपेरी नाणीं हातीं येतात. तींही प्रकाशकाच्या कृपेनें एकाच चेकनें घरीं आलीं तर ठीक. पूर्वी लोक, सहा सहा महिने बसून हातानें ग्रंथाच्या प्रति करीत व ते ग्रंथ पूजेला लावीत. 'तैलाद् रक्षेत्, जलाद् रक्षेत्' इत्यादि त्याच्या रक्षणाकरितां श्लोक, कवि-

ताही करीत. आतां हे सर्व श्रम वांचतात; पण, पुस्तकांना खप नाहीं. याचें कारण तरी काय ?

## गुरुकिल्ली

कारण शोधायला फार लांब जायला नको. ज्या वेळीं पुस्तक उपयुक्त असतें तेव्हां तें खपतेंच. उपयुक्तता याचा अर्थ थोडासा जपून केला पाहिजे. चहाचें आधण यायला पुस्तकाच्या पानांचा उपयोग होईल. पण तो खरा उपयोग नव्हे. ज्या प्रकारचे विचार राष्ट्राला जरूर असतील त्यांचें कथन, ही एखाद्या पुस्तकाची पहिली गुरुकिल्ली होय. शिवाजीमहाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला महाराष्ट्रांत दऱ्याखोऱ्यांतून साथीचा सूर निघायला हवा होता. त्या वेळीं रामदासांनीं भावभक्तीची तार छेडतांच तिचा स्वर महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं दुमदुमूं लागला. महाराष्ट्राचें रक्त सुप्त होतें, तें सळसळूं लागलें. धार्मिक श्रद्धेचा, स्वातंत्र्यप्रेमाचा व कणखरतेचा महाराष्ट्रांत जो ऊत आला, व ज्याचें प्रत्यक्ष फल स्वराज्यस्थापनेच्या रूपानें महाराष्ट्रानें उपभोगिलें, त्या तपश्चर्येचा कळस असा, दासबोध सर्वांना प्रिय झाला. त्याचीं पारायणें झालीं. तो ग्रंथ टिकला. शेंदोनशें वर्षांनंतर विसाव्या शतकांतही स्फूर्ति देऊं शकला. भागवत धर्माचें वारें असेंच महाराष्ट्रांत खेळलें व ज्ञानेश्वरादि भागवतप्रणेत्यांनीं प्रसारलेला धर्म व त्यांच्या तत्त्वांना वाहिलेलीं पुस्तकेंही आबालवृद्धांना प्रिय झालीं व तीं टिकूं शकलीं. हीं आपलीं धार्मिक उदाहरणें दिलीं म्हणून कित्येकांना घडाघड शिंका येतील; पण त्यांना आपण असें सांगूं, कीं फ्रेंच क्रांति होण्यापूर्वीं व्हॉल्टेअरसारखे ग्रंथकार निर्माण झाले व त्यांनीं क्रान्तीची भूमिका तयार करून ठेवली. याच्या उलट उदाहरण म्हणजे मार्क्सचें होय. मार्क्सचें तत्त्वज्ञान जर्मनींत जन्मलें. जर्मनीची भूमि, या तत्त्वज्ञानाला पोषक नसल्यामुळें तिथें तें रुजलें नाहीं. त्याचा परिपोष त्याला अनुरूप अशा रशियामध्यें झाला. या सर्व उदाहरणांवरून हा सिद्धांत निघतो कीं, लेखकाला भावी कालाच्या आरपार पाहण्याची दृष्टि पाहिजे. भावी कालांत आपल्या देशाचें तारूं सुरक्षित नेण्याकरितां आजच्या वावटळी काय आहेत, तें त्यानें पाहिलें पाहिजे. हें सर्व कार्य पार पाडण्यासाठीं त्याच्या पदरांत भरपूर तपश्चर्या असली पाहिजे. नेता होऊं इच्छिणारा लेखक वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध तर हवाच, तसाच तो तपोवृद्धही हवा. नुसता दाढीदीक्षित कामाचा नाहीं.

## वर्ष भरतां एक छकुलें

आजच्या वाङ्मयजनकांकडे यांपैकीं कांहीं नसतें. त्यांनीं अभ्यास केलेला नसतो असें कोणी म्हणावें ? त्यांनीं शॉचीं पारायणें केलेलीं असतात. त्यांनीं इब्सेनचीं

पुरश्चरणें केलेलीं असतात, मेरी स्टोप्स त्यांच्या पांचवीला पुजलेली असतेच. बेरी त्यांच्या सांप्रदायाचा गुरु ! ! सारांश काय ? सर्व जाडे जाडे पाश्चात्य ग्रंथकार त्यांनीं हाताळलेले असतात, आणि त्यांचाच पडसाद त्यांच्या लेखांतून, कादंबऱ्यांतून व कथांतून दिसून येतो. त्यांचे देश, त्यांचे विचार, त्यांचे आचार, यांच्यांत आजचे लेखक गर्क झाल्यामुळें आपल्या देशाचें भानही त्यांना नाहीं. स्वतःच्या शहराबाहेर एकानेंहि पाऊल ठेवलेलें नसतें. अशांतलाच एखादा लेखकबुव, शेतकऱ्यांच्या जीवनावर प्रकाश पाडणारी अभिनव कादंबरी लिहितो व वाचक ती रुचकर, म्हणून तिचा आस्वाद घेतो. खेड्यांतील जीवनावर प्रकाश पाडणारे फार; पण त्या प्रकाशांत राहून खेडवळांची सेवा करणारे कोणीहि नाहींत. तसेंच मानसशास्त्रावर गप्पा मारणारे फार, पण खरोखर ज्यांनीं मानसशास्त्राचा अभ्यास केला आहे, असे विरळा ! खरें पाहिल्यास एक एक विषयावर तिकडे लिहिणारे असतात व जन्मामध्यें एखादेंच पुस्तक लिहिणारे असतात. पण इकडे पहावें तो "**वर्ष भरतां एक छकुलें !**" "फ्रॉईडचें मानसशास्त्र," "इब्सेनचीं" नाटकें, असें आपण प्रत्यहीं ऐकतों व त्यांचीं भाषांतरें आपण वाचतों व पाहतों. आपल्यांत मात्र तसा जगद्वंद्य महात्मा कोणीच निर्माण होत नाहीं याबद्दल खंत करीत नाहीं ! ओरड मात्र सर्व तंत्राबद्दल ! जुन्या लोकांना आपण मंत्र घोकतात पण तंत्रावर भर ठेवतात म्हणून हांसतों, पण पाश्चात्य वाङ्मयाचें तंत्र म्हणून ओरडणारे लोक त्याच्या पूर्णपणें आहारीं गेलेले असतात. या तंत्रांत तरी नाविन्य कुठं आहे ? नवमतवादी म्हणून ओरडावयाचें व स्वतःचें नवीन म्हणून कांहींच नसावयाचें असा हा नवमतवादीपणाचा मासला आहे. तिकडे 'सॅनेट'ची चलती असली कीं इकडे सुनीताला उफाळी फुटली ! तिकडे 'शॉर्ट स्टोरी'चें युग सुरू झालें कीं, इकडे लघुकथा अवतरली. तिकडे रंगभूमीवर फेरफार झाला व एकांकी नाटकें लोकप्रिय झालीं कीं इकडे कलावंत त्यांचा अनुकार करूं लागले. अशा रीतीनें आपलें राष्ट्र गतानुगतिक होत आहे. त्यांत जिवंतपणा नाहीं. विचारांत ओज असेल, तर तंत्रांत शैथिल्य असूनही ग्रंथाला मोल येईल. डॉ. केतकरांचें विचार कोणाला आवडोत अगर न आवडोत त्यांच्यांत खरें ओज व जिवंतपणा आहे. म्हणून त्यांच्या ग्रंथांत पदलालित्य नसतांही व त्यांनीं कथापरिपोषाच्या तंत्राला धाब्यावर बसवूनही त्यांचीं पुस्तकें, ग्रंथ या संज्ञेला पात्र झालीं आहेत. त्यांचे इतर ग्रंथही तसेच परिश्रम-पूर्वक लिहिलेले आहेत. म्हणून त्यांना कोणाकडून प्रकाशनसमारंभ करावे लागले

नाहींत. त्यांनीं कधीं आपल्या मित्रांकडून आपल्या पुस्तकांवर व्याख्यानें देवविलीं नाहींत. कथावाङ्मय सोडल्यास परिश्रमाचें व नाविन्याचें दुसरें उदाहरण म्हणजे गीतारहस्य होय. हें पुस्तक निर्माण होण्यापूर्वी टिळक त्या विषयावर ४३ वर्षे परिश्रम करीत होते. या उभयतां वाङ्मयकोविदांचे विचार नाविन्य व तपस्या यांच्या भट्टींतून उजळून निघाले आहेत, याबद्दल तिळमात्र संशय नाहीं.

## राष्ट्रियत्वाची जोड

नाविन्य व तपस्या यांच्या जोडीला राष्ट्रीयत्व या तिसऱ्या गुणाची जोड असली पाहिजे. राष्ट्रीयत्व याचा अर्थ ध्वजवंदनपर गीत असा नाहीं. तर जे विचार लोकांपुढें मांडावयाचे, ते सर्वांना सारखेच महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे वाटले पाहिजेत. एक दोन पिढ्यांच्या पूर्वी संतचरित्रें व पांडवप्रताप वगैरे ग्रंथ फारच प्रिय झाले होते. वास्तविक हे ग्रंथ प्राकृत होते. नुकतीच भागवत धर्माची भरभराट झाली होती. त्याच्या पूर्वीपासून पांडव, कृष्ण, राम या विभूति देवत्वाला गेलेल्या होत्या. धर्माच्या संस्थापनेसाठीं व दुष्टांचा संहार करण्यासाठीं आपण अवतार घेतों, असें श्रीकृष्णाचें म्हणणें आहे. अशाच विभूतींमध्यें संत, राम, कृष्ण यांची गणना होते. म्हणून, त्यांचा जीवनक्रम व गुण वर्णन करणारे ग्रंथ लोक घरोघर पूजीत व त्यांचा आदरपूर्वक स्वीकार करीत. स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराज व त्यांच्या पश्चात् गाजलेले वीर यांचे पोवाडे याच कारणानें लोक तल्लीन होऊन गात. म्हणूनच जे विचार चिरकाल टिकावेत, व ज्यांचा प्रसार व्हावा अशी लेखकाची इच्छा असेल, ते विचार वर सांगितलेल्या नाविन्य, तपस्या व राष्ट्रीयत्व या तीन निकषांवर त्यानें घासून घेतले पाहिजेत. म्हणूनच नाविन्य, तपस्या व राष्ट्रीयत्व यांच्या त्रिवेणीसंगमाला जिवंत वाङ्मयाचा झरा हें नांव देणें अन्वर्थक होय.

—जून १९३६

## वडीलधारी कोण ?

गोष्टीवेल्हाळ लोक जुळ्या बहिणींची एक गोष्ट सांगतात. लघुकथांना चटावलेले वाचक त्या गोष्टीला कथा म्हणणार नाहींत, व उगीच कथेच्या तंत्राचा एक वादविवाद माजवितील, इतकेंच नव्हे तर आणखी नुसता कागदी सामना न करतां, वाग्युद्धाची खडाजंगी व्हावी म्हणून एखादी सभा बोलावतील; म्हणून तिला आपण गोष्टच म्हणूं. कथेचे धागेदोरे, गुंतागुंत, मनोविश्लेषण, स्वभावाचें आलेखन वगैरे विशेषसें कांहीं त्यांत नाहीं. निव्वळ एक छोटासा प्रसंग. अगदीं जोडीच्या बहिणी होत्या. त्यांच्या हातांत तोडीच्या पाटल्या होत्या कीं नाहीं त्याची नक्की नोंद कथाकोविदानें केलेली नाहीं. पण पाटल्या, गोट इत्यादि बाह्य भूषणांनीं त्या जोडीच्या होत्या एवढेंच नव्हे, तर सहोदरही होत्या आणि गमतीची गोष्ट अशी कीं एकीला दुःख झालें कीं तेच विचार दुसरीच्या मनांत यावयाचे. एकीच्या मनांत थोडासा मैत्रिणीविषयीं संशय आला कीं दुसरीनेंहि नकळत त्या मैत्रिणीशीं केली बोलाचाली बंद. 'आवळी' शीं बोलण्याचें बंद करणाऱ्या मैत्रिणीला 'जावळी' ही आपल्याशीं बोलत नाहीं, असें पाहून अचंबा वाटावा आणि तिनें मनांत म्हणावें 'असें झालें तरी कसें' मी 'आवळीची' शत्रु पण 'जावळी'ची मैत्रीण ना ! मग ही वडीलधाऱ्या मैत्रिणीचा कैवार घेऊन कां भांडते ? हो पण विसरलों. त्या गोष्टींतील मुख्य मुद्दाच असा होता कीं वडीलधारी कोण ! त्या दोघां बहिणींनाहि वडीलधारी कोण, हें एक कोडेंच होतें. जन्मकालांमधील तास-दोन तासांच्या अन्तरानें पाहिलें, तर वडीलधारेपणा त्यांत तो कसला शोधावयाचा ? दोघींनाही सरकारी खात्यांत नोकऱ्या लागल्या असत्या, तर हा वडीलपणाचा मान बाजूस सारून सरकारनें एकाच तारखेला दोघींनाही सेवानिवृत्त केलें असतें. पण इतरांना तो प्रश्न सुटेना. मग याच्यावरच वादविवाद झाले, सम्मेलनें भरलीं; डोकीं फुटलीं; शेवट प्रश्न सुटला नाहीं तो नाहींच ! दोघींनींही आपसांत सलोखा करावयाचा, तर तेंही नाहीं.

## कथेकऱ्यांचा कल

अशीच, बुद्धिक्षेत्रांत जन्म पावणाऱ्या दोन भगिनींची स्थिति आहे. कला आणि नीति; दोघींनाही मानवी बुद्धीनेंच जन्म दिला. केव्हां केव्हां

दोघीही सहोदरच नव्हे, तर समकालीं व समस्थलीं जन्मतात. पण त्यांच्यांत पहावें, तों श्रेष्ठकनिष्ठत्वाचा नेहमींच वाद. दोघींनींही समेट करावा आणि मानवजातीचें कल्याण चिंतावें, हा सल्ला पोक्त आहे खरा. पण सल्ला पोक्त झाला म्हणून त्याला सत्ता थोडीच आहे! यामुळेंच विद्वानांमध्यें कला व नीति यांच्या संबंधींचे झगडे चालतात! एका विद्वानानें तर नीतीला हरदासी गप्पांत नेऊन टाकलें आहे. ' जे आहेत ते ' नीतीची कलेच्या नाजुक कुंचल्याच्या मागें ब्याद कशाला! तिनें आपलें पायघोळ सदऱ्यांत आणि उपरण्याच्या लफ्फ्यांत घोंटाळावें. पण ' सकाळीं उठोनी देवासी भजावें ' अशा तऱ्हेचा बालबोध उपदेश करणारे हरिदास तरी कुठें आहेत? सर्व हरिदास नांवाचे हरिभक्तपरायण असतात. गाण्याच्या मैफलीवर आणि आख्यानाच्या रसोत्कर्षावरच ते आपली छाप श्रोत्यांवर ठेऊन देतात. ' नेहमीं खरें बोला ', ' गुरूला देव माना ' अशा तऱ्हेचे मासलेवाईक उपदेश न करतां ' खऱ्यां 'नीं संशोधिलेल्या इतिहासावरच ते कीर्तन करतात, किंवा ' देवां 'नीं पुनरुज्जीवित केलेल्या रामदासी वाङ्मयावर प्रवचन करतात. म्हणून कीर्तन करणारे कथेकरी किंवा गोष्टी, कादंबऱ्या रंगविणारे कथेकरी, दोघेही नीतीचा प्रसार करण्यासाठीं उपरण्यानें कंबर कशीत नाहींत, किंवा टांकाला शीण देत नाहींत. दोघेही कथेकरी मनोविनोदनाकडेच झुकत आहेत, यांत तिळमात्र शंका नाहीं. वेदान्त घोळून सांगणारेही कथेकरी आहेत; पण तेवढ्यावरून ते नीतीचा प्रसार करण्याकरितां, घराचें रान करून उजाड मैदानाचें मनोहर उपवन करायला निघाले आहेत, असें ठरत नाहीं.

## शास्त्रीय पद्धति

वस्तुस्थिति कशीही असली तरी कला व नीति यांचा कांहींच संबंध नाहीं काय? हा तात्त्विक प्रश्न शिल्लक राहतो. नीति हें शास्त्र आहे व कला मग ती लेखन, शिल्प, चित्र वगैरे कोणत्याही ललित वर्गांतील असो, ती शास्त्र नाहीं. यामुळें दोघांचा काडीचाही संबध नाहीं, असें नेहमीं प्रतिपादण्यांत येथें. या म्हणण्याची विशेष फोड केल्यास दोन मुद्दे निघतात. नीति ही शास्त्र तर ती कोणत्या अर्थानं व तिचा कलेशीं कांहींच संबंध नाहीं काय? ह्यांपैकीं पहिल्याचा आरंभीं विचार करणें क्रमप्राप्त आहे. शास्त्राच्या व्याख्या कांहींही असोत, शास्त्र म्हटलें कीं जुन्या लोकांसमोर षड्दर्शनें उभीं राहतात, व आधुनिकांसमोर, पदार्थविज्ञान रसायन, जीवशास्त्र वगैरे आधिभौतिक शास्त्रें उभीं राहतात. यामुळें पुष्कळसा घोटाळा होतो. नीति हें शास्त्र आहे, असें म्हटलें कीं जुन्या लोकांना

तें ‘ **बहिश्चराः प्राणाः** ’ असें वाटतें व आधुनिकांना जुन्या अर्थानें त्याज्य पण नव्या अर्थानें ग्राह्य असें वाटतें. हा परिणामाचा विचार गौण आहे. वास्तविक शास्त्रीय पद्धति व तिची योजना, या दोनच गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एका बारीक विद्युत्प्रवाही तारेखालीं लोहचुंबक धरला, तर या दोहोंपैकीं जी वस्तु चल असेल ती आंदोलन पावून प्रवाहाचें प्रमाण दाखविते, ही गोष्ट प्रयोगकर्ता अनेक वेळ अवलोकन करतो व नंतर विद्युत्प्रवाहमापनाचा एक नियम बनवितो. अवलोकनावरून अनुमान व अनुमान पक्कें करण्यासाठीं पुन्हां प्रयोग, अशी ही शास्त्रीय पद्धति आहे व त्या पद्धतीनें शोधिलेल्या प्रमेयाचा प्रवाहमापनासाठीं शास्त्रज्ञांनीं उपयोगही केला आहे.

## नियमांची योजना

भौतिकशास्त्रें स्थिर असतात. याचा अर्थ असा कीं लोहचुंबक पृथ्वीच्या गर्भांतील लोहचुंबकाशीं समांतर राहतो, असा जर आपण नियम बांधला तर तो नियम सर्व काळीं व सर्व स्थळीं सारखाच लागू पडतो. दर्भधारी ऋषींच्या काळांत किंवा तुलाधारी वैश्यांच्या चालू शतकांत इकडचा कांटा तिकडे झुकत नाहीं. पण नीतिनियमांचें असें नाहीं. तुलनात्मक दृष्टीनें सांगावयाचें म्हणजे ज्या कालमर्यादेंत लोहचुंबकाचा नियम तयार झाला, त्याच्यापेक्षां पूर्वीच्या कालमर्यादेंत नीतिनियम तयार झाले. राजनीति, समाजनीति अगर व्यक्तिगत नीति ही कालमर्यादेनें अलीकडची आहे. लोहचुंबकाचा नियम अनन्तकाल बदलणार नाहीं, पण नीतिनियमांवर संस्कार होऊं शकतील. पांच हजार वर्षांच्या मागें कृत्रिम नीतिनियम नव्हते, असें म्हणतात. ‘ **नैवं राज्यं न राजासीत् नच दण्डो न दाण्डिकः** ’ शिक्षा नाहीं व शासनसंस्था नाहीं, मग नीति तरी कुठली ! यथा राजा तथा प्रजा. राजा जर ठिकाणावरच नाहीं, मग प्रजेला तरी नियम कुठले ? पण एवढें मात्र विसरतां नये कीं ‘ धर्मेणैव प्रजाः सर्वाः रक्षन्ति स्म परस्परम् ’ म्हणजे व्यवहार चालवायला कांहीं ना कांहीं घटना होती, हें खास ! व्यवहार जर चालला पाहिजे तर खरें बोला अगर खोटें बोला पण, यांपैकीं कोणता तरी एक नियम होता, हें खास. नाहींतर व्यवहाराला अस्तित्वच नाहीं. मानवव्यवहार हा वाढता व कालान्तरानें गुंतागुंतीचा होत जातो. आरंभीं आरंभीं थोडकीं माणसें; देण्याघेण्याचे प्रसंगहि थोडे. यामुळें नियमही थोडे सुटसुटीत. नुसते दहा नियम केले तरी चालण्यासारखें असतें. पण वाढत्या संसाराला ते अपुरे पडतात.

किंबहुना नियम बनविण्यापेक्षां त्यांची योजना, हाच या शास्त्राचा महत्त्वाचा भाग होतो.

**नियमांचें पालन**

नीतिशास्त्राच्या बाबतींत योजकांची कशी त्रेघा उडते, याचीं उदाहरणें नेहमींच सांपडतात. खरें बोलावें असा सर्वसाधारण नियम झाला. पण केव्हां खरें बोलावें व केव्हां खोटें, हा प्रश्न सोडविणें शहाण्यासुर्त्यांनाही कठीण होतें. हा दाखला पटविण्यासाठीं जुनींच उदाहरणें घेऊं. एका पारध्यानें एक हरीण रानांतून हुसकून काढला व तो पळत येऊन एका गृहस्थाच्या घरीं आश्रयार्थ राहिला. यजमानानें गृहस्थाला उचित म्हणून, त्याचें रक्षण करण्याचें ठरविलें. मागाहून पारधी स्वतः हरिणाची चौकशी करण्याकरितां आला. स्वतःच्या घरांत हरीण लपलेला आहे, असें सांगणें म्हणजे खरें बोलण्याचा नियम पाळणें होय. पण हा नियम पाळतांना दिलेलें वचन मोडावें लागतें, त्याची वाट काय ? अशा रीतीनें दोन नियम एकमेकांविरुद्ध येऊं लागले कीं विचार करावा लागतो ? हरिणाला महत्त्व द्यावें कीं पारध्याला ? पण लगेच विचार डोकावतो ? सर्वच प्राणी सारख्याच योग्यतेचे नाहींत काय ? मग स्वजातीयांचाच पक्षपात कां ? ही शंकासुद्धां पक्षपात करूं नये, ह्या नियमावरूनच सुचलेली. हें उदाहरण एवढ्याचसाठीं घेतलें कीं नीतिनियमांची योजना किंवा त्यांचें पालन हें व्यक्तीच्या बुद्धिसामर्थ्यावर व अनुभवावर अवलंबून आहे. हें पालन केल्यावरही 'लौकिक' म्हणून कांहीं चीज असल्यामुळें यथाशास्त्र पालन करूनही भागत नाहीं. त्या वागणुकीचें समर्थनही करावें लागतें. उदाहरणावरून नीतिशास्त्रांतील व इतर शास्त्रांतील फरक ध्यानांत येईल. वरील उदाहरण जुन्या वातावरणांतील व थोडेसें अद्‌भुत वाटणारें असें कित्येकांना वाटेल. त्याची विसाव्या शतकांतही आवृत्ति होणें अशक्य नाहीं. एखादा राजकीय कैदी परकी राष्ट्रांच्या आश्रयास राहिला. त्यांच्यावर दांत असणारें सरकार त्याची मागणी करूं लागलें; तर त्याला सोडावा कीं सोडूं नये, हा प्रश्न मुत्सद्यांच्या सुपीक मेंदूंनाही शीण देणारा आहे. अशा एखाद्या कैद्याला न सोडण्याबद्दल रणधुमाळी माजून, रक्ताचे पाट वाहून, त्यांच्यावर एखादें, रसाळ महाकाव्य किंवा लज्जतदार कादंबरीही निर्माण होणें शक्य आहे.

**समाजाचें शासन**

अशा तऱ्हेची जी कादंबरी निर्माण होईल, ती अशा तऱ्हेनें वागा असें सांगणारी खास, पण तिचा परिणाम व्हावयाचा तोच होतो. ह्या कादंबरींतील नायक

नीतिमान् आहे कीं अनीतिमान् आहे, ही गोष्ट महत्त्वाची नाहीं. पण त्याच्या आचरणाचा, त्याच्या आयुष्यांत कांहीं ना कांहीं परिणाम घडला असें दाखवावें लागेल. मॅक्बेथ हा महत्त्वाकांक्षी सेनापती डंकनला ज्या वेळीं आपण लढाई जिंकली असें पत्र पाठवितो, त्या वेळीं आपल्या राजनिष्ठेचा बडेजाव तो घोळून सांगतो. याच अभिधाला फसून डंकन त्याच्या घरचें आमंत्रण स्वीकारतो. पत्नीच्या टोंचणीमुळें त्याच्या प्राणाचा अपहार मॅक्बेथ करतो. पुढें ज्या अकल्पित गोष्टी घडून त्याचा प्राणान्त होतो, तो त्याच्या नीतिनियम मोडण्याचें प्रायश्चित्त असेंच म्हणावें लागतें. पुढचा परिणाम व आरंभीचें कार्य, यांच्यामध्यें कार्यकारणभाव न कल्पिला तर वाचकाचें अगर प्रेक्षकाचें समाधानच होणार नाहीं. भिन्नदेशीय प्रेक्षक असले व त्यांच्या नीतिनियमांच्या पालनामधें फरक असला तरी विश्वासघात केल्याबद्दल डंकनविषयीं सहानुभूति निर्माण होणें व मॅक्बेथविषयीं शौर्याबद्दल आदर असला तरी विश्वासघाताबद्दल तिरस्कार उत्पन्न होणें ही गोष्ट साहजिकच घडते. प्रेक्षकाच्या मनांत पूर्वीचे कांहीं संस्कार असतातच व आपल्या बुद्धिसामर्थ्यानुरूप नाटकांतील अगर कादंबरींतील पात्राविषयीं अनुकूल अगर प्रातिकूल मत तो देतो. ही गोष्ट जुनाट नाटकांच्या बाबतींत घडते असेंही नाहीं. आधुनिक नाटकांतील नायकांनाही ही नीतिदृष्टि असते. Pillars of Society या नाटकांत बर्निक एका रेल्वेचा फांटा काढूं नये म्हणून विरोध करतो. यांत सुद्धां जास्ती लोकांचें हित आड येतें असें तो सांगतो. जास्त लोकांच्या हितासाठीं कमी लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष करावें, असा त्याचा नीतिनियम नाहीं काय? हा नीतिनियम ठसविण्याकरितां हें नाटक लिहिलें नाहीं, एवढें खरें; पण ह्या शास्त्रांतून नाटकांतील पात्रें सुटूं शकत नाहींत. कारण हल्लीं तरी कथालेखक वास्तववादाचा पुरस्कार करूं लागले आहेत, त्यांना तर मुळींच सुटतां येत नाहीं. हे नियम जाचक कुठें होतात हें त्यांनीं सांगितलें तर त्यापासून ते समाजाचे शासनच करीत आहेत, असें ठरतें.

### नायक आणि खलनायक

या विवेचनांत एक मुद्दा दृष्टिआड होऊं देतां नये. कथेंतील नायक सद्‌गुणांचा पुतळा आहे व तो आदर्श असा रंगवावा, असें मुळींच नाहीं. हल्लींचा काळ दृष्टीसमोर घडणारा असला, तरी वादविवादांत व नाटक कादंबऱ्यांतून व्यक्तिस्वातंत्र्याचा आहे. समाज असेल तर तो आपल्या घराबाहेर आहे, त्याला आपण कांहीं तुझे नियम पाळणार असें थोडेंच लिहून दिलें आहे? त्याची काय मोठीशी फिकीर? स्वतःचे कायदेशीर वर्तनाचे व मतप्रदर्शनाचे हक्क आहेतच ना? मग

तो कितीहि गुणी मनुष्य असला तरी आपण त्याला आदर्श कां म्हणावें असाच मंडळी प्रश्न विचारतील ! गुणमापनाचें एखादें मापनयंत्र न निघाल्यामुळें आदर्श म्हणून तरी कोणाला ठरवावें ? ह्याचा मासला म्हणून जर पहावयाचें असेल, तर एकाच कादंबरीवर प्रसिद्ध झालेलीं निरनिराळीं परीक्षणें पहावीं व त्या परीक्षणांतूत एकच नायक कित्येकांच्या मतें गुणी व कित्येकांच्या मतें टाकाऊ असाच दिसतो ! टीकाकार व व्यक्ति अशा स्वातंत्र्यवादी आहेत, म्हणून नायक अगर नायिका सद्‌गुणांचा पुतळा नसावी. तरुण, कुलीन, गोरा, चतुर, विद्वानांत हिरा जसा शारदेच्या आईच्या ध्येयाला अनुरूप असा नवरा जगांत दुर्मिळ तसा तो कादंबरीच्या जगांत नसावा हें म्हणणें सयुक्तिक आहे. कारण, त्यामुळें वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या सत्याकांक्षेला धक्का पोंचतो. याच्या उलट, चोरी करणारा व चोरींत आनंद मानणारा नायक साहसी, चिकित्सक असा जरी असला तरी तो खल आहे, एवढेंच नव्हे तर तो समाजांत दुर्वर्तनाचा प्रादुर्भाव करणारा, म्हणून त्याज्य होय.

## साहित्यिकांची जबाबदारी

दुसरें असें कीं नैतिक उदात्तता दाखविणारे प्रसंग कादंबरींतून खच्चून दाखवावे, असेंही नाहीं. कादंबरीकाराला आपल्या मताचा कांटा अमक्या बाजूला झुकतो आहे, असेंही दाखविण्याची गरज नाहीं. खऱ्या खोट्याची निवड करायला चाणाक्ष वाचक तयार असतातच. समाजहिताची जर त्याला कळकळ असली तर त्याच्या हातून समाजाची हानी होणारही नाहीं. ललित वाङ्मयाची सेवा करणाराला समाजाचा अभ्यास करूनच लेखणी हातीं घ्यावी लागते. आणि समाजाचें हिताचें असें ध्येय असल्याशिवाय त्याचा अभ्यास तरी व्हावा कसा ? समाजांत तुरुंगांत जाणारीं माणसें पुष्कळ असतात. देशासाठीं कारावासांत राहून पुन्हां पुन्हां शिक्षा झाली तरी मनाचा खंबीरपणा दाखवणारे व शिक्षा झाल्यानंतरच्या एक दोन तासांनीं झोंपेची डुलकी देणारे निस्संगहि असतात. तसेंच, वाटमारी करून व प्रवाशांचीं शिरें उडवून सातव्या खेपेस शिक्षा झाली म्हणून आतां आपली जन्मभर ददात चुकली, असें म्हणणारे 'बेडर' बेरड लोकही असतात. दुसऱ्या वर्गांतील लोकांस प्रामुख्य देणारा कथालेखक खरोखर समाजाचें हित पाहतो काय, हें विचारणीय आहे. कलानीतीच्या या वादविवादांत एक गृहस्थ एक गोष्ट सांगत असत. यमाच्या दरबारांत जेव्हां पापाचा पाढा चित्रगुप्त वाचूं लागला, तेव्हां सात सात खून करणाऱ्या खुनी दरवडेखोरापेक्षां एका सुप्रसिद्ध लेखकावर जास्त शिक्षा भोगण्याची पाळी आली. लेखक सनदशीर

चळवळीचा पुरस्कार करणारा असल्यामुळें त्यानें खुद्द यमराजांकडे दाद मागितली. पण यमराजांनीं सांगितलें, " एक व्यक्ति निदान सात खून करते; पण एखादे वेळीं तुझ्या लिखाणानें हजारों लोक मरावयाचे " गोष्टीचा इत्यर्थ एवढाच, कीं लेखक समजतात त्यापेक्षां त्यांच्यावर सामाजिक जबाबदारी असते. म्हणून समाजाला वळण त्यांनीं कलेच्या मार्गानें द्यावें किंवा निराळ्या मार्गानें द्यावें, कलेची व नीतीची फारकत करून भागणार नाहीं.

—सप्टेंबर १९३६

---

## ९. वितळणारे ढग

### अभ्यंगस्नान घालणारे ढग

ते नव्हेत ! जे आपल्या चित्रविचित्र आकृतींनीं व विविध रंगछटांनीं अन्तःकरणाचा ठाव घेतात, व मनावर कायमचे चितारले जातात, ते ढग हे मुळींच नव्हेत. सायंतनींच्या समयीं सूर्य पश्चिम क्षितिजावर विश्रांति घेत असतां, त्याच्या मनोरम कोमल किरणांचीं सोनेरी आभरणें लेवून, रंगभूमीचा आभास उत्पन्न करणारे हे ढग मुळींच नव्हेत. तर मग हे कोणते ? ग्रीष्माची तलखली असह्य झाली कीं ज्या वेळीं शरीर आणि जीव मंद मंद वाहणाऱ्या झऱ्याच्या शीतळ पाण्याच्या ओंजळीची अपेक्षा करतात, त्या वेळीं आकाशांत गर्दी करणारे व धो धो वर्षावानें सृष्टिदेवतेला अभ्यंगस्नान घालणारे, तेच खरे वितळणारे ढग. या ढगांमुळें चातकाच्या आसावलेल्या जिभेवर शीतलोदक पडून, त्याच्या तळमळत्या जीवाला शांतता लाभते कीं नाहीं, हें एखादा संकेतवादी कवीच सांगूं शकेल, पण हे ढग खांद्यावर घाईघाईनें नांगर टाकून आपल्या दोघां चतुष्पाद सोबत्यांना घेऊन, कसवट करावयाला निघालेल्या शेतकऱ्यांना मात्र निःसंशय आनंदाच्या परमोच्च शिखरावर पोंचवीत असतात. ह्या ढगांची गर्जना, भित्र्या माणसाच्या हृदयाचा थरकांप उडविणारी असते, असेंहि नव्हे. मात्र ह्या मेघांची एकमेव उच्छृंखल सोबतीण ज्या वेळीं काळ्याकुट्ट आकाशांत थैमान घालूं लागते, त्या वेळीं घीरगंभीर

पुरुषाचें हृदयहि बधिर होऊन, तो उष्ण निश्वास सोडूं लागतो. मात्र आशेचा एकच किरण असतो, कीं हे नवीन सृष्टि निर्माण करणार.

### आमची विस्मृति

खरें पाहिल्यास कलेच्या क्षेत्रांतहि असे गर्जणारे, वर्षणारे व नवी सृष्टि निर्मिणारे कलावंत नाहींत का? त्यांचा, एखाद्या तत्त्वाविषयींचा आवेश व त्या तत्त्वाच्या अंमलबजावणीसाठीं चाललेला उत्स्फोट पाहिला, कीं वाटतें; एखादा ज्वालामुखीच जागृत होऊन उसळी मारतो आहे. ज्या वेळीं सरदारशाहीचा नायनाट करून, स्वातंत्र्य, समता व बंधुता यांच्या प्रस्थापनेसाठीं एखादा शारदेचा शिलेदार आपली तुतारी फुंकतो, त्या वेळीं जुन्या कल्पना पार विरून जातात. त्या वेळीं एखादा क्रांतिकारक केशवसुत "**जुनें जाउं द्या मरणालागुनि**" असें सांगत सुटतो. त्याचा संदेश राष्ट्राच्या रोमरोमांत भिनत असतो. फ्रेंच राज्यक्रान्ति म्हणा, रशियन उलथापालथ म्हणा, किंवा एखादी नूतन राष्ट्रांतील रक्ताचा लेशहि वायां न जातां झालेली शांत क्रांति म्हणा, अशाच एखाद्या गर्जणाऱ्या तोफेनें घडवून आणलेली असते. समाजाची जीर्ण घडी मोडून, नवी घडी बसवावी म्हणून, आगरकरांनीं केलेली गर्जना, एखाद्या वर्षारंभींच्या प्रचंड मेघसमूहाच्या गडगडाटाला शोभण्यासारखी नाहीं काय? स्त्रियांनीं जाकिटें घालावीं, स्वयंवराची प्रथा पुन्हां अमलांत यावी, अशा एक ना दोन, त्या वेळीं विचित्र वाटणाऱ्या गर्जना आगरकरांनीं केल्या. त्या आज लोकांच्या अंगवळणींहि पडलेल्या दिसतात. वर्षारंभींचे मेघ वर्षून गेले, व श्रावण मासांतील 'सरसर शिरवीं' पडूं लागलीं व ऊन–पावसाची संमिश्र सोनेरी छटा पृथ्वीवर पसरली कीं, त्या गोड वातावरणांत आपली दृष्टि आजू-बाजूच्या गार वातावरणावर असते व ते पूर्वीचे काळेकुट्ट गर्जणारे ढग आपण विसरतों. शेतांतली हिरवीं रोपें डोलूं लागलीं व जिकडे तिकडे हास्य विलसूं लागलें कीं मागची कशाला आठवण राहते? ते गर्जणारे ढग वितळलेले असतात!

### प्रबोधाची दासी

यावरून कोणी म्हणतील कीं मी, क्रान्तिवादी व प्रचारकी वाङ्मयालाच कलेच्या मयूरसिंहासनावर बसवीत आहें. 'कलेचें मयूरसिंहासन' कदाचित् क्रांतिवादाच्या भारानें मोडून पडेल, अशीहि एखाद्याला भीति वाटेल. वास्तविक प्रचारकी थाटाच्या वाङ्मयालाच आज कित्येक जण डोक्यावर घेऊन नाचत आहेत. ज्या वाङ्मयांत बहुजन समाजाचें चित्र नाहीं, तें खरें वाङ्मय नव्हे, असेंहि कित्येक यथार्थतेनें प्रति-

पादन करतात. ह्या टाहो कानीं जाऊन, त्या टाहोला उत्तर म्हणून कित्येक लेखक एखादा ध्येयवादी हरिजन निर्माण करतात. ललितकला ही एक कला नसून, ती प्रबोधाची दासी आहे, असेंच त्यांचें मत असतें.

## स्थलकालाची प्रतिनिधि

तसें पाहिल्यास, स्थलकालनिरपेक्ष अशी कला असणें शक्य आहे काय? हिंदुस्थानांत निर्माण झालेली कादंबरी हिंदुस्थानांतील परिस्थितीला निरपेक्ष अशी कशी असूं शकेल? आजच एखाद्यानें कादंबरी लिहायला घेतली व तींत आजच्या कालाची पार्श्वभूमि घेतली, तर महायुद्धाची झळ, राजकारणांत निर्माण झालेली कोंडी, समाजकारणास मिळालेलें गौण स्थान; ह्यांचे उल्लेख त्या कादंबरींत येणें अपरिहार्य आहे. पण हे राजकीय प्रश्न कशा तऱ्हेनें सोडवावे, म्हणजे सत्याग्रह केल्यानें, किंवा बहिष्कार पुकारल्यानें? किंवा साम्राज्यशाहीशीं सहकार्य केल्यानें, आजची राजकारणाची कोंडी फुटेल व सर्वत्र आबादीआबाद होईल, असें दाखविलें तर ती काळाची प्रातिनिधिक कादंबरी होईल, यांत तिळमात्र संशय नाहीं.

## सविकल्प समाधि

पण ही कादंबरी चिरंतन महत्त्वाची होईल काय? दोनशें वर्षांनीं एखाद्याच्या कपाटांत ही कादंबरी आढळली, तर ती तात्कालिक महत्त्वाची होती असाच तिच्या-वर शेरा बसणार नाहीं काय? दुसरें असें कीं, अशी कादंबरी वाचून किती जणांना हे प्रश्न सोडविण्याची स्फूर्ति होईल? आज प्रत्यक्ष प्रचार करणारे, व्यासपीठावरून व्याख्यानांचा भडिमार करणारे, निवडणुकांसाठीं वर्तमानपत्रें चालविणारे ह्यांच्या हातांत समाजाची खरी नाडी आहे, कीं आरामखुर्चीवर बसून, धूम्रवलयें काढीत कादंबरीचीं पानें उलटणाऱ्यांच्या हातीं? आरामखुर्चीवर बसून कादबरी वाचणारा, ती जिवाला विरंगुळा म्हणून वाचीत असतो, बोधामृतासाठीं नाहीं. बोधामृतच हवें असेल, तर व्याख्यानें काय थोडीं आहेत! ललितवाङ्मयातील कथानक वाचावयाचेंच, तर तें त्या कथानकाबरोबर वाहावत जाण्यासाठीं. त्यांतील मनोविश्लेषणाची गम्मत पाहण्यासाठीं, किंवा प्रसंगांतून प्रसंग कसे उद्‌भवतात, तें पाहण्यासाठीं! कादंबरीचें कथानक वाचकाला झुलवीत असतें, व तसें झुलवून घेण्यासाठीं व सद्यःपरिस्थिति विसरण्यासाठींच वाचक एखादें पुस्तक जवळ करीत असतो. हें विधान सराईत व शिक्षित वाचकाला लागू होणार नाहीं. ज्या वाचकानें, कथेंतील स्वभावपरिपोष, प्रसंगसंगति, समरप्रसंग, वातावरण, स्थल-

कालाचें एकत्व यांवर व त्यांच्या ललितलेखनांतील महत्त्वावर विचार केला असेल, तो शास्त्रीय दृष्टीनें ललितलेखनाचा परामर्ष घेत असतो. पण इतर वाचक कथानकांतील प्रवाहित्वाबरोबर वाहत जातात व त्यांतच रममाण होतात. ह्यालाच सविकल्प समाधि असें म्हणावें पाहिजे तर!

## मनोविश्लेषण

मग कलावन्तानें प्रचलित प्रश्न सोडून द्यावे काय? प्रेमविवाह, मिश्रविवाह, दलितवर्ग, राजकारणांतील पक्षोपपक्ष, उद्योगधंदे, साक्षरता, वगैरे विषयांवर व अलिकडेच निघालेल्या मनोविश्लेषणावर कांहींच लिहूं नये? मनोविश्लेषणशास्त्र, म्हटलें कीं तिथें मात्र हात टेकावे, असेंच कोणालाहि वाटेल. मनोविश्लेषण, लैंगिक प्रश्न, फ्रॉइड यांचीं नांवें घेऊन किंवा त्यांचें गणपतिपूजन करून कित्येक लोक आपला बडेजाव वाढवूं पाहतात. या ठिकाणीं मनोविश्लेषणशास्त्र व ललितलेखनांतील स्वभावपरिपोष यांची बरेच लोक गल्लत करीत असतात. ललितलेखनाचें, स्वभावचित्रण हें एक महत्त्वाचें अंग आहे. एखाद्याचा स्वभाव कसा बनला व त्यांत फरक काय झाला, हें दाखविणें आवश्यक आहे. ‘यशवंतराव खरे’ या कादंबरींत यशवंतरावाची स्त्रियांविषयींची भावना किंवा त्याचें श्रीधरपंतांचें अनुकरण, हे स्वभावपरिपोषाचे उत्कृष्ट नमुने आहेत. पण हरिभाऊंच्या कारकीर्दींत फ्रॉइडचें नांव ऐकूं येत नव्हतें किंवा मनोविश्लेषण हा शब्द लोकविश्रुत नव्हता, म्हणून त्यांच्या कादंबऱ्या कमी रंजक झाल्या होत्या काय? रचनेंत आटोपशीरपणा नसणें व कथनांत पाल्हाळ असणें हे दोष असूनही हरिभाऊंच्या कादंबऱ्या अक्षर वाङ्मयांत मानाचें स्थान घेऊन बसल्या त्या कशामुळें?

## ग्रंथांचें कार्य

थोडासा खोल विचार केल्यास, असें दिसून येईल कीं वर जे विषय दिलेले आहेत, ते कांहीं मानसशास्त्राचे, कांहीं समाजशास्त्राचे व कांहीं राजकारणाचे अंगभूत असे विषय आहेत. त्यांचें निर्णायक उत्तर, त्या त्या शास्त्रांतले महापंडितच देऊं जाणत. अशा पंडितांनीं केलेली मीमांसा रूक्ष असणार, यांत तिळमात्र संशय नाहीं. शास्त्रीय अगर सामाजिक विषयांचें निर्णायक उत्तर घेण्याच्या अपेक्षेनें जर एखादा वाचक पुस्तकें वाचूं लागला, तर तो ललितवाङ्मयाकडे न वळतां, शास्त्रीय प्रबंधांकडेच वळेल व अशा ग्रंथांत त्याला हवें असलेलें उत्तर स्पष्टपणें मांडलेलें आढळेल.

## लालित्य हा आत्मा

पण ललितकृतीकडे जो मनुष्य वळत असतो, तो आनंद मिळविण्याच्या दृष्टीनें. ' लालित्य ' हाच खरा ललितवाङ्मयाचा आत्मा, रंजकता हाच त्याचा प्रधान गुण. कोणत्याहि कथेंत जो समरप्रसंग असतो, तो कसा रंगतो हेंच पाहण्याच्या अपेक्षेनें एखादा वाचक त्या कथेकडे पाहतो. उदाहरणार्थ, वेश्याजीवनांत मुरलेली पण वेश्याजीवन हा गाळ आहे, असें समजून त्यांतून वर येऊन संभावित आयुष्य व्यतित करूं पाहणारी स्त्री व तिच्याकडे पाहणारा समाज व त्याची दृष्टि यांमध्यें जो संगर होतो, तोच पाहण्यालायक असतो. त्या स्त्रीची तेवढी तयारी असेल तर ती स्त्री लग्न करून, आपलें जीवन मोठ्या धीरानें घालविण्याचा प्रयत्न करील. नंतर हळदीकुंकूं समारंभ, सामाजिक जेवणावळी या ठिकाणीं अपमान झाल्यास सहन तरी करणार नाहीं किंवा अशा समारंभांस हजर तरी राहणार नाहीं. परिस्थिति प्रखर असल्यास, त्या स्त्रीचा शेवट दुःखदायी होईल व ती व्यक्ति प्रभावी असल्यास शेवट आनंदी व समाधानकारक होईल. परंतु अशा कथानकावरून "' वेश्याजीवन हें किळसवाणें आहे," ' वेश्येला समाजांत वरच्या वर्गाचे म्हणविणारे लोक आपल्यांत प्रवेश करूं देणार नाहींत,' किंवा "वेश्यांनीं गृहजीवन पत्करिल्यास, तें चांगलें" असें सिद्धांत काढणें धोक्याचें होईल. अशा जीवनावरची कथा प्रेक्षकास अगर वाचकास डोकें खाजवावयास लावते, हें खास; पण तो लेखकाचा दुय्यम हेतु असतो व कदाचित् विचारप्रवर्तन हें जरी त्यांचें मुख्य ध्येय असलें तरी, तो जो मार्ग पत्करतो तो मनोरंजक असावा लागतो. ' कुंकू ' चित्रपट पाहिल्यावर लोकांच्या मनावर त्यांतली मुख्य कल्पना ठसली कीं त्यांतली ' एक होता राजा ' सारखीं गाणीं किंवा त्यांतलें दिवाळींतील नाचाचे, वस्त्रें बदलण्याचे प्रसंग जास्त ठसले, हें पाहावें. यावरून हेंच निश्चित कीं, कलावस्तूंतील रंजकता, पात्रें, प्रसंग व कथानकाचा ओघ, त्यांतील आकर्षकता, ह्याच गोष्टी जास्त महत्त्वाच्या होत. त्यांतील रंजकतेवरच वाचक लोलुप होत असतो.

## कलाकृतींचा अद्ययावत्पणा

एतढें झालें तरी वातावरण अद्यावत् असणें व एखादा प्रचलित प्रश्न सोडविण्याची ऐट लेखकानें आणणें किंवा असा प्रश्न कादंबरीशीं, नाटकाशीं किंवा लघुकथेशीं संलग्न करणें, यांमुळें ललितकृतीला अद्ययावत्पणा येत

असतो. जुनें तें सोनें असलें तरी माणसाचा खरा ओढा नाविन्याकडे असतो. नवे प्रश्न, नवे प्रवाह, नवे विचार व नव्या रूढी यांतील उपयुक्ततेपेक्षां त्यांतील नाविन्याचाच मोह मनाची पकड घेत असतो. यामुळें कोणताहि, लोकसमाजांत वावरूं इच्छिणारा लेखक लोकविन्मुख राहूं शकत नाहीं. लेखकाचें कार्य हें दुधारी तरवारीवर नाच करण्यासारखें दुर्घट आहे. तो समाजाचा व स्थलकालाचा प्रतिनिधि तर असला पाहिजेच; त्याचबरोबर समाजाचें पुढारीपणहि त्यानें घेतलें पाहिजे व शिवाय त्याच्या कलेंत रंजकताहि पाहिजे. उन्हाळ्याच्या दिवसांत कडक उन्हांतून वावरणाऱ्या व तहानेल्यांना व उष्णतेनें तळमळणारांना आकाशांत गर्दी करणारे काळेकुट्ट गर्जणारे मेघ आपले उपकारकर्ते वाटतात. हे मेघ वितळतात, सृष्टीची शोभा वाढवितात. पुन्हां वर्षाऋतूनंतर प्रशांत आकाशांत सूर्याच्या सोनेरी व तांबूस प्रकाशांत मेघडंबरी तयार करणारे चित्रकारमेघ जास्त आकर्षक वाटतात; तीच गोष्ट पुढाऱ्यांची व लेखकांची !

—जुलै १९४०

---

## १० : साहित्याचा आस्वाद

### ग्रंथांची माधुरी

ट्रामवेंतून आणि आगगाडींतून पुस्तक हातांत घेऊन जाणारी मंडळी पाहिली, कीं खरें साहित्ययुग तें हेंच, असेंच कोणालाही वाटतें. ज्याच्या हातांत पुस्तक आहे तो सरस्वतीच्या प्रसादाचा खरा भागीदार असला पाहिजे. बासुंदीचें भोजन, अश्वावर आरोहण, गगनभेदी उड्डाण करणाऱ्यांपेक्षां साहित्याचा आस्वाद घेणारी मंडळी खरोखरच भाग्यवान्. त्यांचाच काल खरा मौजेमध्यें व सुखविलासामध्यें जातो. ज्यानें ग्रंथांतील माधुरी एकदा चाखली, तो इहलोकींचीं सर्व सुखें तुच्छ लेखीत असला पाहिजे. एकदा गगनामध्यें विहार करण्याची लज्जत चाखल्यावर मानव्यामध्यें येऊन, या कर्णकटु कोलाहलांत कोण पडतो !

## परप्रत्ययनेय आस्वाद

साहित्याचा आस्वाद लोक कसा घेतात व त्यांचा साहित्याच्या रससेवनामध्यें हेतू काय असतो, हें पाहणें मोठें मौजेचें होणार आहे. आजकाल प्रत्येक मासिकांतून आणि साप्ताहिकांतून परीक्षणें, निरीक्षणें व परिचयलेख प्रसिद्ध होत असतात. यावरून कोणीही असें अनुमान करील कीं, साहित्याचा खरा आस्वाद घेणारा म्हणजे टीकालेखक. त्यानें एकाद्या पुस्तकाची तारीफ केली, कीं तीच खरी साहित्य-माधुरीची कसोटी. जणूं काय, पुस्तक वाचून स्वतःचें समाधान झाल्यावरच तो लेखणी उचलीत असला पाहिजे. पण सर्व प्रकार याच्या अगदीं उलट असतो. नाण्यांच्या छनछनाटानेंच परीक्षणकर्त्यांचे हात लेखणी उचलायला धजतात काय? महाराष्ट्रांत अशी बाजारी टीका लिहिणें दुरापास्त आहे. कारण जिथें आडांतच नाहीं, तिथें लेखकाच्या पोहऱ्यांत कुठून उतरणार? पण अशा पैशांच्या मोहास बळी पडून जरी टीका लिहिली नसली, तरी देवाण-घेवाणाचा प्रकार पुष्कळ ठिकाणीं असतो. कंपुशाहीच्या मामल्यांत तर काय घडतें हें विचारायलाच नको. एक मित्र नागपूरला व दुसरा इगतपुरीला. पण 'आंतरः कोऽपि हेतुः' यामुळें नागपूरच्या लेखणीबहाद्दराचे विचार आगाऊच इगत-पुरीनिवासियाला कळतात. लेखकाचें पुस्तक बाहेर पडावयाच्या अगोदरच रसग्रहण तयार असतें. त्यामुळें वाचकांच्या रसग्राहकशक्तीला मात्र ग्रहण लागतें. टीकाच्या अनुकूल प्रतिकूल फैंकीच्या माऱ्यांत बरेचसे वाचक पुस्तकें वाचतात. ज्या ज्या पुस्तकावर जास्त टीका झालेली असेल, तें हटकून वाचावयाचें, असाही कित्येकांचा नियम असतो. म्हणून अनुकूल टीका होईल, तेंच पुस्तक वाचतात, असें नाहीं. ज्या पुस्तकावर प्रतिकूल टीका झाली असेल, तेंही वाचणारे असतात. अशा वाचकांना वाङ्मयापासून निर्भेळ आनंद मिळतो काय? असें सांगतात कीं वाङ्मय हें स्वयंप्रकाशी असतें. सूर्य उगवल्यावर, हा सूर्य आहे, याच्या-पासून सर्व जगाला प्रकाश मिळतो, त्याच्यावर माणसाचें जीवन अवलंबून आहे, असें सांगावें लागत नाहीं. तो उगवला, कीं आपोआप लोकांना कळतें. कित्येक सद्गृहस्थांना सूर्याचे किरणच जागृत करतात, ही जशी गोष्ट सूर्याची, तशीच जिवंत व ओजस्वी वाङ्मयाची. असें जर आहे, तर परप्रकाशी वाङ्मय निस्तेज म्हणावयाचें, कीं वाचकांचा आनंद बराचसा पूर्वग्रहावरच अवलंबून असतो असें म्हणावयाचें?

## करूं नये तें केलें

विभावरी वाङ्मयावरची टीका वाचल्यावर " कळ्यांचे निश्वास " संग्रहीं ठेवणारे पुष्कळसे वाङ्मयवीर आहेत. विभावरीनें वाङ्मयांत पदार्पण केल्यावर जें वादळ उठलें, किंवा उत्पन्न करण्यांत आलें, त्यामुळें त्या वादळांत पुष्कळ वाचक सांपडले. कांहीं दिवस वाचनालयांतून विभावरीचीं पुस्तकें मिळविण्यासाठीं वाचनालयांच्या व्यवस्थापकांची मनधरणी करावी लागत असे. अशी मनोभूमिका तयार झाल्यावर वाचकांच्या मनावर जो ठसा उमटला, त्याला कारण सर्वस्वी कळ्यांचे निश्वास हें पुस्तक, कीं त्या परिस्थितीचा वाचकांवरचा दाब ? सर्व वाचक अशाच वर्गांतील असतात, असें नाहीं. कित्येक वाचक अशींच सरकारजमा झालेलीं पुस्तकें वाचतात. "गुन्हेगार" हें पुस्तक सरकारजमा झाल्यावर बऱ्याच जणांनी वाचलें. तें पुस्तक चांगलें कीं वाईट, समाजाची धारणा करणारें कीं समाजविघातक, हा प्रश्न इथें महत्त्वाचा नाहीं; ज्यांनीं तें पुस्तक, तें सरकारजमा झाल्यावर वाचलें, त्यांना त्याच्यापासून निर्मळ आनंद मिळाली कीं कसें ? विचार-ग्रहणापेक्षां, करूं नये ती गोष्ट केली, ह्या भावनेचाच तो आनंद नाहीं काय ?

## विविध वाचक

वर दाखविल्याप्रमाणें वर्तमानपत्रांतील टीकांचा व परीक्षणाचा विशिष्ट परिणाम होत असतो. तसाच परिणाम संभाषणांतील सहजोद्गारांवरूनहि होऊं शकतो. एखाद्या साहित्यिकाशीं बोलतां बोलतां त्यानें म्हणावें कीं, " माझें बारा वर्षांचें काम " हें एक उत्तम पुस्तक आहे. तेवढ्यावरून त्या पुस्तकाच्या वाचकवर्गामध्यें भर पडते. अशा तऱ्हेनें निर्माण झालेल्या वाचकांचा एक नवीन वर्ग दिसून येतो. कित्येक वाचक शेक्सपीअरचीं छत्तीस नाटकें वाचून काढणारे असतात. शेक्सपीअरचें एक एक नाटक वाचीत जावें, तशी तशी त्यांच्या आनंदाची कमान वाढत असते. कित्येकांची महत्त्वाकांक्षा अशी असते कीं, टॉलस्टॉयचीं सर्व पुस्तकें वाचून काढावयाचीं, तर कित्येकांनीं अशी खूणगांठ बांधलेली असते कीं, टागोरच्या गोष्टी व कादंबऱ्या यांचा अगोदर फन्ना पाडावयाचा. टागोरचा जो भक्त असतो, त्याला जर सिंक्लेअर लुईच्या कादंबऱ्या वाचायला सांगितल्या, तर कसेंसेंच वाटतें. तसेंच शॉचें पान उलटणें त्याच्या जीवावर येतें. उलट शॉच्या नाटकांतील पात्रांची जन्मकथा सांगणारे त्याच्या नाटकांतील विचार, स्वल्पविराम व पूर्णविराम इत्यादींची नोंद ठेवणारे व शॉच्या एकेका नाटकागणिक आनंदाची लूट मिळविणारे लोकही पुष्कळ असतात. शॉभक्ताला टॉलस्टॉयचें एक पानही वाचवत नाहीं किंवा टागोरभक्ताला बेरीची

भाषाशैली पसंत पडत नाहीं. म्हणून टॉलस्टॉय व बेरी यांच्या विचारांमध्यें व भाषाशैलीमध्यें, आनंदाची खैरात करण्याचें मर्म नाहीं असें, समजावयाचें कीं काय ? शॉच्या बुद्धिप्रधान वाङ्मयावर लुब्ध होणाऱ्या, टागोरच्या भावनाप्रधान व ध्येयमय विचारांवर मोहित होणाऱ्या, किंवा सिंक्लेअरच्या मजूरवर्गाच्या चित्रणानें दयार्द्र होणाऱ्या वाचकांकडे पाहिलें, म्हणजे असें म्हणावें लागतें, कीं साहित्याचा आस्वाद घेणें हें जेवढें आजूबाजूला चाललेल्या चळवळींवर व जाहिरातींवर अवलंबून असतें, तेवढेंच तें वाचकांच्या विशिष्ट मनोरचनेवर अवलंबून असतें.

## पुनः प्रत्यय

हीच गोष्ट निराळीं उदाहरणें घेतल्यानें जास्त स्पष्ट होणार आहे. वर्तमान-पत्रांतील टीका न वाचतांही, आपण पुस्तकें वाचतों व त्यांपैकीं कित्येकांपासून आपल्याला आनंदाची लयलूट मिळत असते. का. र. मित्र यांची लीला नांवाची एक कादंबरी आहे. आज चौकशी केल्यास, ती पुष्कळशा वाचनालयांत मिळणारहि नाहीं. ही कादंबरी पहिल्या प्रतीची आहे, असा साहित्यिकांनीं तिच्यावर शेरा मारलेला नाहीं. साहित्यिकांचीं मतें दुसऱ्या अनेक कादंबऱ्यांशीं घोटाळत असतात; प्रथितयश साहित्यिकांनीं ती वाचलीही नसेल व कादंबरीचें जें एक तंत्र म्हणून मानलें जातें, त्या तंत्राच्या कसोटीवर घांसली, तर तिच्या तंत्राला शंभरापैकीं पन्नास तरी गुण पडतील कीं नाहीं याची वानवाच आहे. पण प्रस्तुत लेखकानें असे वाचक पाहिले आहेत कीं, ती, ते उत्तम म्हणतात. एकदोन वाचक त्या कादंबरीवर बेहद्द खूष झाले होते. या वाचकांनीं तंत्राचा अभ्यास केला नसल्यामुळें त्यांच्या मनावर जो परिणाम झाला, तो पहाणें खरोखर महत्त्वाचें आहे. कादंबऱ्यांचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे वर्ग पाडून त्याप्रमाणें आपण जर निर्णय दिला, तर ती कादंबरी व तिचे वाचक एका विशिष्ट वर्गांत पडतील. पण आपल्याला जो विचार करावयाचा, तो श्रेष्ठ वाचक कोणता व कनिष्ठ वाचक कोणता या दृष्टीनें नव्हे. एक विशिष्ट वाचक व एक विशिष्ट पुस्तक याच दृष्टीनें आपल्यास पहावयाचें आहे. लीला या कादंबरींत एक विद्यार्थी हालअपेष्टा सोसून विद्यार्जन करतो व त्या विद्यार्जनानिमित्त त्याला परगृहवास करावा लागतो, असा कथानकाचा मुख्य धागा आहे. अडचणी कशा येतात, व त्यांपैकीं कांहींतून दैवाच्या बळावर तर कांहीं स्वतःच्या युक्तीच्या बळावर नायक कसा तरून जातो व यशस्वी होतो, हें दाखविलें आहे. ही कादंबरी ज्यांना आवडली, त्या वाचकांची तशीच स्थिति होती. ते दोघेही त्या कालीं विद्यार्जन करीत होते.

त्यांना परगृहवासाचा अनुभव येत होता व परक्यांची रुष्ट बोलणीं सोसावीं लागत होती. यामुळें स्वतःच्या परिस्थितीचेंच चित्र त्यांना कादंबरींत दिसलें, व त्यांना त्या कादंबरींतून आनंद लुटतां आला. ही कादंबरी आनंदपर्यवसायी आहे, यावरून कादंबरीच्या शेवटीं जो आनंदाचा भाग आहे त्यामुळें ती त्या वाचकांना आवडली असे कोणीही म्हणेल. पण कादंबरी जी त्यांनीं वाचली ती केवळ शेवटच्या भागा· करतां नव्हे. कित्येक असें म्हणतील कीं, कथानकांत पुढें काय घडलें, तें कळावें या उत्सुकतेनेंच त्यांनीं ती वाचली असेल. पण हेंही म्हणणें पटणारें नाहीं. त्यांनीं ज्या इतर कादंबऱ्या वाचल्या त्या उत्सुकतेसाठीं व जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं. पण त्यांनीं वाचलेल्या कादंबरींत जी ही उत्कृष्ट म्हटली, ती केवळ आत्मचित्रासाठीं.

## समाधानाची अपेक्षा

गोष्ट आनंदपर्यवसायी असली, कीं तीपासून वाचकाला समाधान लाभतें ही गोष्ट खोटी नाहीं. नायकावर अनेक आपत्ति आल्या व तो नायक बुद्धिमान व थोडाफार सुगुणी असला, कीं वाचकाला वाटतें कीं त्या नायकाला विजयश्री मिळालीच पाहिजे. जर तो चित्र रेखाटून बक्षीस मिळावें म्हणून झटणारा असेल व दैवयोगानें अगर आपल्या चुकीमुळेंच त्याला बक्षीस एकदोन वेळ मिळालें नसेल; तरी शेवटीं अनपेक्षितपणें त्यास बक्षीस मिळालें, कीं वाचकही त्याचा अंशभागी होतो व त्याला समाधान वाटतें. इथें आत्मचित्रण नसलें तरी सहानुभूती मात्र असते खास. यामुळेंच त्याला आनंदाची प्राप्ति होते; बक्षीस मिळाल्याचें सुख होतें. अनुभव घेण्याची मनोरचना असल्याखेरीज मात्र त्याला आनंद होत नाहीं. म्हणून कादंबरींतील किंवा नाटकांतील आनंद लुटण्याची पात्रताही वाचकाला कमवावी लागते व परिस्थितीच्या अनुभवानें त्याचें मन पात्र झालें असल्यास त्याला कथेंतील आत्मनुभवही मिळतो. याच कारणानें दुःखान्त वाङ्मय लोक टाळतात. कित्येकांची अशी समजूत आहे कीं, दुःखान्त वाङ्मयापासूनही माणसाला समाधान व आनंद होतो. पण मी असे कांहीं वाचक पाहिलेले आहेत कीं, ते फक्त आनंदी वाङ्मयाचीच मागणी करतात. कित्येक तर असें बोलून दाखवितात कीं, ‘ मला बुवा तें मरण, आजार, कर्ज दुखापत यांची गोष्ट नको. त्या गोष्टींत प्रेम नसलें तरी चालेल, पण ती गोष्ट मौजेची व आनंदाची असली पाहिजे.’ आनंद व दुःख हीं सापेक्ष आहेत. तहान लागल्यानेंच पाण्याचें सुख कळतें ही जरी गोष्ट खरी असली तरी वाचक स्वतः दुःखी असो अगर सुखी असो कांहीं विशिष्ट वर्गाच्या वाचकांना, मनावर आनंदाचा, उल्हासाचा व उमेदीचा ठसा उमट-

विणारींच पुस्तकें आवडतात. परिणामाबद्दल मनाची खात्री करूनच नंतर तें पुस्तकें वाचायला नेतात. संसारांतून दुःखाचे आघात सोसूनहि, त्यांचें मन पुस्तकांतील दुःखमय स्थितीचे आघात सोसण्याइतकें कणखर झालेलें नसतें, असें पाहिजे तर म्हणावें. परंतु " पण लक्षांत कोण घेतो ' ही कादंबरी आपल्याच्यानें वाचवत नाहीं, म्हणून अर्ध्यावर सोडून देणारीं व 'एकच प्याला ' नाटक आपल्याच्यानें पाहवत नाहीं, असें म्हणून घरीं परतणारीं माणसें पाहावयास सांपडतात.

## समसमां संयोग

या कादंबरींत व " एकच प्याला " नाटकांच्या प्रयोगांत रमणारीं माणसेंही असंख्य असतात. पढिक माणसें सोडून इंग्लिश टीकाशास्त्राचा गंधही नाहीं, अशा वाचकांचा विचार करूं. इंग्लिश टीकाशास्त्राची अशी एक गोम आहे, कीं शेक्सपीअरवरील टीका वाचल्या, कीं आपणांस शेक्सपीअरच्या खांचाखोंचा कळून नाटकांत तल्लीन होण्यास मदत होते. पण ज्या माणसावर टीकेचा परिणाम झालेला नाहीं, अशाला जर रघुवंशांतील अजविलाप वाचून दाखविला तर श्रोत्याला जर पत्नीविरहाची व्यथा बाधली नसली तर तो त्या विलापामध्यें रमून जात नाहीं. पण जर कां एकादा नवीन विधुर असला, तर या शोकामधें तल्लीन होऊन जातो. तीच गोष्ट शृंगारिक काव्यांची. विरहतरंग हें काव्य शेंकडा नव्याण्णव हिश्शांनीं तरुणांकडेच सांपडावयाचें. ही झाली शृंगाराची गोष्ट. तसेंच दुःखमय किंवा करुण वाङ्मय ज्या स्थितीचा वाचकाला अनुभव असतो, त्यालाच आवडतें. दुःखी मजुराची कथा दुःखीकष्टी बेकारालाच जास्त पटते.

## निर्भेळ आस्वाद

यावरून असा एक प्रश्न उद्भवतो कीं, जर साहित्याचा आस्वाद घेणें हें मनुष्याच्या मनःस्थितीवर अवलंबून आहे, तर अशा वाचनानें त्याला काय फायदा होतो ? त्याचें उत्तर असें कीं, सामान्य माणसाच्या ज्या भावना मूक अवस्थेंत असतात, त्या भावनांना वाचनानें आविष्कार व्हावयाला सवड मिळते. दुःखाचें निवेदन केल्यानें किंवा सुखाचा मित्राशीं सहविभाग केल्यामुळें भावनांना मोकळी वाट मिळून, माणसाला मोकळेपणा वाटतो. असेंच वाङ्मयाच्या आस्वादाचें विश्लेषण करावें लगतें. त्याबरोबर एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेवली पाहिजे. दुःखान्त पुस्तक असूनही त्याचें वातावरण उच्च असूं शकेल. एकाद्यानें

स्वतःच्या पोटाची खळगी भरण्याकरितां हाल सोसले असतील, किंवा आपल्या आप्तेष्टांना सुख देण्याकरितां सुखाची राखरांगोळी केली असेल, किंवा त्याहूनही राष्ट्र अगर साम्राज्य यांच्याकरितांही त्यानें जीवाचें रान केलें असेल! दुःखीकष्टी मनुष्य त्या कथेच्या वाचनानें समरसही होईल व उच्च वातावरणांतही शिरेल. म्हणून साहित्याचा आस्वाद घेणें हें जसें वाचकाच्या मनःस्थितीवर व त्या काळाच्या विचारप्रवाहावर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें साहित्याचा निर्मळ आस्वाद वाचकाला चाखविणें व त्याला उच्च वातावरणांत नेणें हें साहित्य निर्माण करणारावरही अवलंबून आहे.

—जानेवारी १९३७

---

## ११ : जीवित आणि कला

### रणकंदनें

कोणत्याहि देवतेची उपासना करावयाची असें ठरलें कीं उपासनेची साधनें व हेतू ह्यांचा खल उपासनेचा हरिःओम् होण्यापूर्वीच केला पाहिजे. ग्रहादि देवतांची किंवा तेहतीस कोटी दैवतांपैकीं एखाद्या देवतेची आराधना करण्याचे संकेत पुराणांतून बहुधा वेदवाक्याएवढे ग्राह्य असतात. कविकल्पनेची भरारी खरी धरली तर, कला आणि मयूराधिष्ठित शारदा यांत अभेद आहे. पण विसाव्या शतकांतील आराध्यवस्तूंचे दंडक घालून देणारीं पुस्तकें अजून पुराणांच्या परंपरेंत जाऊन न बसल्यामुळें कलेचा हेतु आणि साधनें यांच्या निश्चितीसाठीं रणकंदनें माजतात; व मोठमोठे वाग्धुरंधर आपल्या वाणीला श्रम देतात.

### भावनेची हुकमत

या बाबतींत निर्णय देण्यास कलाकृतीचा जन्मकाल फारच उपयोगी पडेल. रामायणाचा जन्मकाल एका क्रौंचमिथुनाच्या हननाकडे जातो; यांत स्फूर्तीचा भाग बराच आहे. स्फूर्तीचा झटका आल्याबरोबर एक श्लोक निर्माण होणें, हें शक्य कोटींतील दिसतें. पण श्लोकांवर श्लोक निर्माण होऊन, रामायण त्रितळावर

वांटूनही शिल्लक राहिलें, हा स्फूर्तीचा झटका द्वापार युगाला शोभेसारखाच होता. कलियुगांत या स्फूर्तीच्या दैवी चमत्कराकडे कोणी भक्तिभावानें पहाणें दुर्घट! कवीच्या बहुप्रसवी कल्पनेचाच तो खेळ आहे, यांत संशय नाहीं. पण विशेष महत्त्वाची गोष्ट आहे ती ही कीं, या कल्पनावृक्षाच्या मुळाशीं भावनेचा ओलावा आहे. रामासारखा धीरोदात्त पुरूष, त्याचे अतुल दिग्विजय, त्याचें प्रजावात्सल्य, या गोष्टींच्या प्रीतिसंगमाचें फल म्हणजे त्याच्या चरित्रावरचें अजरामर महाकाव्य. कवीची जागृत कल्पना तर आहेच, पण त्या कल्पनेची राष्ट्राच्या भावनेशीं स्नेह जुळतांच, राष्ट्राच्या कर्त्या पुरुषाचें चरित्र अलौकिकत्व पावलें. म्हणून कवीच्या भावनाचें क्षेत्र व सार्वजनिक जिव्हाळा यांचें क्षेत्र, एकमेकांस छेदणाऱ्या वर्तुळांप्रमाणें जेथें एकरूप होतें तेथेंच महाकाव्याच्या व पर्यायानें कलेचा जन्म संभवतो. महाभारताच्या अवलोकनानेंही हीच गोष्ट प्रत्ययास येण्यासारखी आहे, 'जया' सारखा छोटेखानी ग्रंथ जगड्व्याळ महाभारत बनला, याला कारण राष्ट्रीय संस्कृतीचें प्रेम. हिंदु–धर्मावरील हल्ले परतविण्याकरितांच नैषधासारखे परक्या लोकांचे भाग आपल्या ग्रंथांत अढळ स्थान पावले व बुद्धासारखा लोकांच्या डोळ्यांदेखत वावरणारा पुरुष अवतारमालिकेंत स्थिर झाला. यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं, ज्या भावनेची हुकमत लोकसमुदायावर अधिक त्याच भावनेचा उत्कर्ष ज्या कलाकृतींत झाला असेल, तीच लोकादरास जास्त पात्र होते व लोक तिचा योग्य परामर्ष घेतात.

## वैयक्तिक बडेजाव

पण काळाचा ओघ आतां बदललेला आहे. विभूतिपूजेचें प्राबल्य कमी होऊन आजकाल वैयक्तिक बडेजाव पराकोटीस चढला आहे. राष्ट्राला तर कांहीं अस्तित्व असेल तर तें व्यक्तीच्या प्रतिनिधित्वापुरतेंच. सर्व व्यक्तींनीं आपला मताधिकार न गाजविण्याचा हक्क कांहीं काळ वापरावयाचा नाहीं, असें मनांत आणलें तर न जाणों राष्ट्राचा संसारही क्षणभर नष्ट होईल.

## व्यक्तिप्रधान काव्यें

व्यक्तीला महत्त्व चढल्या बरोबरच राष्ट्राची जागा व्यक्तीनें पत्करिली व त्यामुळें व्यक्तिप्रधान काव्यें, नाटकें व भावगीतें निर्माण झालीं. आजहि लोकसमुदायांत सन्मान भोगणाऱ्या माणसाला काव्यनायक बनविणें अशक्य नाहीं. पण जो तो स्वराज्याचा भोक्ता असल्यामुळें व्यक्तीच्याच भावना रसिकवृंदाला सादर होतात; व जो लेखक वस्तुनिष्ठ दृष्टीनें लिहितो तो सुद्धां स्वतःच्या बुद्धीस

आवडणारा मनुष्यच कथेच्या केंद्रस्थानीं योजतो. याचमुळें राजा शिवाजी नायक होण्याऐवजीं 'राजा'ही कथेचा नायक होऊं शकतो. त्याचप्रमाणें फुलझाडें शिंपणारी राज्यैश्वर्यसंपन्न शकुंतला कालिदासाला कौतुकास्पद वाटली तरी, आज न्याहारीचा वकुत टळेल म्हणून बिगिबिगि जाणारी मराठ्याची राकट स्त्रीही काव्याची अधिष्ठात्री होऊं शकते. म्हणूनच एका महाराष्ट्राचे बालक, व्यक्तिवैशिष्ट्य म्हणून निरानिराळीं राष्ट्रगीतें निर्माण करतात. जीवनांत फेरबदल झाले कीं काव्यविषयांचेंही रूपांतर होतें, हाच येथपर्यंतच्या विवेचनाचा निष्कर्ष आहे.

## कलावन्ताची दृष्टि

व्यक्तीचें मोल वाढल्याबरोबर एक आपत्ति ओढवते. व्यक्ति करील ती पूर्वदिशा होण्याचा संभव असतो; व त्यामुळें गलिच्छ प्रकारांनाही सौंदर्याची प्रतिष्ठा लाभणें शक्य आहे व तशी केव्हां केव्हां लाभतेही. जीवनाचा प्रांत अमर्याद आहे, पण मनुष्य मर्यादित जगांतच वावरत असतो. म्हणून कलेचा प्रदेशही बंदिस्त झाला आहे. इथें मोपांसां नामक प्रख्यात कथालेखकाचें मत विशेष ग्राह्य ठरेल. तो म्हणतो कीं, चतुष्पाद प्राणी व द्विपाद मानव यांत भेद आहे. देहयात्रा संपविणें हाच जीवजंतूचा हेतु; निसर्गही त्या हेतूच्या सिध्यर्थ त्यांना अन्नपाणी देऊन हातभार लावतो. पण मानवाला ह्या पृथ्वीतलावर उणीव भासते; म्हणून तो रात्रंदिवस खपून आपल्या मनाप्रमाणें त्याचें परिवर्तन करतो. निसर्गानें त्याला आकाशदीप दिला आहे. पण मानवानें तो अपुरा पडतो म्हणून विद्युद्दीप निर्माण केले आहेत. निसर्गानें त्याला विचारविनिमयाकरितां वाणी दिली आहे, पण तिचा टप्पा मर्यादित असल्यामुळें मानवानें ह्या चौकटींतच न राहतां आपले संदेश जगाच्या कानाकोपऱ्यांत पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. म्हणून जीविताची उणीव भरून काढण्यासाठीं कला व विशेषतः ललितकला अवतार घेते, असें ठरतें. मोपासांच्या गोष्टींवरूनही हीच गोष्ट दृढमूल ठरते. आपल्याकडे मात्र या गोष्टींचा विपर्यास केला जातो. मोपासानें एका गोष्टींत प्रसूतिसमयाची योजना केली आहे. या गोष्टीचें कथासूत्र असें आहे. एका काळीं प्रेमबद्ध झालेलें जोडपें पुढें विभक्त होतें, व त्यांतील रमणी दुसऱ्याच एका वल्लभावर अनुरक्त होऊन तिला संतति होते. प्रसूतिसमयीं ती एकटीच असतां त्या पूर्व वल्लभाची व तिची अकल्पितपणें गांठ पडते व तो तिला त्या वेळीं काळाच्या दाढेंतून वांचवतो. या गोष्टींतील प्रसूतिसमय जर वेगळा घेतला व त्याला अनुलक्षून एक कविता केली किंवा चित्र काढलें तर तें निःसंशय ग्राम्य ठरेल. पण येथें परिणाम होतो, तो निरा

ळाच. परिस्थितीमुळें नायकाच्या मनांत काय बदल झाला, हाच त्या गोष्टीचा मुख्य विषय; वाचकाच्या मनांत जी भावना उद्भूत होते तीही विस्मयाचीच होय. पण आपल्याकडे मात्र ह्याचें भलतेंच अनुकरण केलें जातें व ह्या श्रेष्ठ कलाकोविदाच्या सांप्रदायावर, हे अनिष्ट प्रकार खपतात. दुसऱ्या एका गोष्टींत तीनचार पुरुष एकाच स्त्रीशीं संबंध ठेवतात व तिला मूल झालें त्या वेळीं तिला मदतहि करितात. पण ज्या वेळीं तें मूल गतप्राण होतें त्या वेळीं 'एक गेलें म्हणून काय झालें, आम्ही आहोंच' अशा मासल्याचे उद्गार काढतात. इथेंसुद्धां विषय काय रंगविला आहे, याला कमी महत्त्व असून भावना कोणती निष्पन्न होते, यालाच जास्त महत्त्व आहे. ही गोष्ट वाचून माणूस कामवासनेच्या आहारीं जाण्याऐवजीं त्याला कामवासनेचा किळत येतो. 'किती मूर्ख लोक आहेत हे!' असेच उद्गार वाचकाच्या तोंडांतून बाहेर पडतात. ह्यावरून हीच गोष्ट दिसून येते कीं, जीवनाचा अफाट साधनसमूह कलावन्तासाठीं मोकळा आहे, पण त्याचा उपयोग करतांना त्यानें एक विशिष्ट दृष्टि ठेवली पाहिजे.

### सौंदर्य-दृष्टि

कलावन्ताला सौंदर्यशोधक अशी दृष्टि पाहिजे. ती शुद्धस्वरूपांत कशी असू शकते, याचें विवरण करण्याकरितां एकाच विषयावर लिहिलेल्या दोन छोट्या नाट्यकृतीचें आलेकन करूं. 'Something to talk about' आणि 'Bishop's candle sticks' हीं दोन्ही नाटकें चोरीच्या विषयावर आहेत. पण चौर्यकर्माचा, या नाटकांत कलाकुसरीनें उपयोग केला आहे. पहिलें नाटक एखादें धनवान कुटुंब कसें नाविन्याच्या मागें लागतें, व चोराचें कौशल्य कसें कौतुकानें पहातें या विषयास वाहिलें आहे; दुसरें चोरावर उपकार केल्यानें तो कसा चोरी कबूल करतो व उन्नतीला जातो, हें दाखविलें आहे. पहिल्याच्या वाचनानें वाचक धनिकांचा मूर्खपणा आचारणार नाहीं व दुसऱ्याच्या श्रवणानें 'शठं प्रति सत्यं' हें तत्त्व सिद्ध करण्यासाठीं क्वचितच प्रयोग करील. पण त्यांत चोरी करणारावर निर्बंध नसावा. कारण ती मानसशास्त्राला धरून आहे असें कुठेंच सांगितलेलें नाहीं. हेंच कलादृष्टीचें मर्म ध्यानांत येण्याकरितां अगदीं विशेष परिचयाचें उदाहरण घेऊं. पोपट आणि मैना हे आबालवृद्धांच्या ओळखीचे शब्द आहेत; त्यांच्या उच्चारानें कोणती कल्पना मनांत संचारते, हें ते शब्द चारचौघांत उच्चारून पहावे. ह्या शब्दद्वयांकडे शास्त्रीय दृष्टीनें पाहतां येईल. तसें पहाणारे फारच थोडे. पण ही प्रचलित कल्पना सोडून या पोपटमैनेच्या विष-

यावर आधारलेली एक कल्पित कथा केसरीनें कांहीं वर्षांमागें प्रसिद्ध केली होती. एक राघू व एक मैना प्रवासाला निघालीं होतीं. प्रवासाच्या श्रमानें जेव्हां तीं दमलीं त्या वेळीं राघूनें, फराळासाठीं आणलेल्या फळांतून एक उचललें व तें पंखाखालीं लपवून म्हटलें, "तुला कवची पाहिजे कीं गीर?" मैना उद्गारली, "गीर"; राघूनें खारीक दाखवितांच ती चपापली. पुन्हां याच लपंडावाची पुनरावृत्ति झाली व बदाम बाहेर पडून मैना फसली. तिसऱ्या खेपेस मैनेनें सुवर्ण-मध्याचा आश्रय केला, पण तिच्या पदरीं जर्दाळूची कवची आली. या गोष्टींत सत्य व कविकल्पना यांचा मनोरम संयोग साधला आहे; व कथासूत्राचा परिपोष आकुंचित क्षेत्रांतही कसा उत्तरोत्तर करतां येतो हें दाखविलें आहे.

सारांश असा कीं, जीविताचा ओघ जसा बदलत जाईल तसे कलाविषय बदलतात, पण कलावंताची भेदक व सौंदर्योपासक दृष्टि अचल राहते. कल्पनेला वावरण्यास चारी दिशा मोकळ्या आहेत, पण तिला सदभिरुचीची लगाम अवश्य पाहिजे.

---

## १२ : चिरंतन बोल

### सुंदर प्रतिकृति

परवांच मी एका लेखकाचें पुस्तक पाहिलें. पुस्तक सुरेख होतें. नव्हे वाचण्यासारखें होतें. इतकेंच नव्हे तर, तें मी अधाशासारखें वाचलेंहि. पण एक सांगायचें राहिलें. तें पुस्तक म्हणजे एका परदेशस्थ पुस्तकाची देशी प्रतिकृति होती. प्रतिकृति म्हणजे हिणकस, असा म्हणण्याचा मुळींच आशय नाहीं. उलट ती सुंदर प्रतिकृति होती, असाच निर्वाळा दिला पाहिजे. कारण तें पुस्तक हातांतून खालीं ठेववेनाच! त्या पुस्तकांत होतीच तशी माहिती. निव्वळ एक गोष्ट होती. एका चिनी कथेवरून तिची केंद्रकल्पना घेतली होती. बाकी सगळा विस्तार लेखकाचा स्वतःचाच होता.

### वाङ्मयांतलें मीठ

पण सर्वांत गंमतीची अशी गोष्ट ही कीं त्या गोष्टीनें चिनी जीवनावर सतत सहा शतकें परिणाम केला होता. एकाच पुस्तकाच्या कल्पनेच्या आहारीं एखादें राष्ट्र

सहा शतकें जातें यावरून त्याचा प्रभाव किती असला पाहिजे याची कल्पना केलेली बरी. हें कळलें कीं मनांत साहजिकच कल्पना येते ती ही, कीं अशा टिकाऊ कल्पना चिरंतन होतात तरी कशा ? असें काय असतें त्यांत कीं त्यांनीं समाजाच्या मनोभूमिकेवर कायमचीं पाळेंमुळें धरून राहावें ? मीठ जास्त प्रमाणांत असलें कीं लोणचें टिकतें; त्यांतील आंब्याच्या फोडी करकरीत राहतात ! मग लेखकानें आपल्या वाङ्मयांत कोणतें मीठ घालावें म्हणजे तें टिकाऊ होईल ?

## टिकाऊ वाङ्मय

पण एवढें दूर कशाला जावयाला पाहिजे ? आपल्याकडेसुद्धां टिकाऊ वाङ्मय आहे. पूर्वी जें कांहीं काल टिकाऊ होऊन राहिलें त्याचाच विचार करूं. तुकारामाचे अभंग टिकाऊ होते व आजही आहेत यांत संशय नाहीं. तुकारामाच्या भक्तीचा सर्वच लोक अनुकरण करीत आहेत, असें म्हणण्याचा आमचा मनोदय नाहीं. पण त्या तुकारामाच्या अभंगांतील उक्ति लोकांच्या जिभेवर खेळत आहेत. तुकारामाचे अभंग सोपे होते, व्यवहारी होते व ठसकेबाज होते. म्हणूनच ते जनसमूहाच्या जिव्हेवर चिकटले, हें कांहीं खोटें नाहीं. पण आजहि सोपें वाङ्मय कांहीं तोट्याचें नाहीं. सोपें म्हणजे बहुजन समाजाचें वाङ्मय. तें कल्पनेनें सोपें पाहिजे. त्यांतील भाषाहि सोपी पाहिजे; इतकेंच काय, ती लोक बोलतात ती बोलीच पाहिजे. यांचा एकांगी अर्थ घेऊन एका लेखणीबहाद्दरानें बोली भाषेचाच पुरस्कार केला. संस्कृतची अगदीं हकालपट्टीच केली त्यानें. ह्या आजीबाईची कटकट त्या तरण्याबांड शिलेदाराला खपेना. पण आजीबाईचा खाष्टपणा दूर झाला तर चिरंतन वाङ्मय निर्माण होईल, हें तरी खरें मानण्यास फारच थोडी जागा आहे.

## वाङ्मयाचे अधिष्ठान

तुकारामाचें किंवा ज्ञानदेवाचें लेखन चिरकाल टिकलें. त्याचें लोकांनीं श्रवण केलें, त्याचें चिंतन केलें, कीर्तन केलें आणि देव्हाऱ्यांत ठेऊन पूजनहि केलें. याचें कारण त्याला असलेलें अधिष्ठान. सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील तयाचें, परि तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे असें समर्थांनीं म्हटलें आहे. निवृत्तिनाथा-पासून मोरोपंतांपर्यंत, सगळ्यांचें ध्रुवपद एकच होतें. मोरोपंतानें सांगितलें आहे कीं आपण ईश्वराचें चारित्र स्वतः तरून जाण्यासाठीं गातों. ईश्वरभक्तीच्या अधिष्ठानावर आधारलेलें वाङ्मयच टिकतें; व इतर टिकत नाहीं, असा याचा निष्कर्ष नव्हे. विशिष्ट पंथाला वाहिलेलें वाङ्मय त्यांच्या प्रचारकांमुळें आपो आपच प्रसार पावतें. लोकांच्या घरींदारीं पोहोंचतें, व टिकतें.

## मलयगंधर्वाची गोष्ट

वाङ्मयनिर्माता, त्याचे प्रचारक, त्याच्या पंथाचे अनुयायी, व त्या पंथाचे सर्व सभासद मिळून एक अलिखित घटना असलेली संस्थाच तयार होते, व ती आपल्या संस्थेच्या ध्येयांना चिरंतन स्वरूप देत असते. पुराणांत मलयगंधर्वाची गोष्ट आहे. त्या मलयगंधर्वाला नारदाचा शाप झाल्यामुळें, तीन जन्म घ्यावे लागले. तिसऱ्या जन्मीं तो घोडा होतो व जयत्पाळ राजाच्या आश्रयाला राहतो. जयत्पाळ राजाला मुकुंदराज उपदेश करतात. कारण त्याला गुरुभक्तिशिवाय कांहीं प्यार नसते; व त्यासाठीं तो अनेक पढिक गुरूंना बंदिवासांत टाकीत असतो. मुकुंदराज ज्या वेळीं त्या राजाला भेटतात, त्या वेळीं तो रिकिबींत पाय ठेवण्याला लागणाऱ्या अवधींत आत्मज्ञान करून द्या, असें सांगतो व मुकुंदराजाहि त्याला घोड्यावर बसतां बसतांच फटके देऊन आत्मज्ञान घडवितात. ही गोष्ट एवढ्याच-साठीं दिली आहे कीं पुराणांतरींची जी मलयगंधर्वाची गोष्ट, तिलाच मुकुंदराज हे आधुनिक संतकवि विष्णूचे अवतार अशी पुस्ती जोडून, एक सांखळी महिपतीनें तयार केली. यामुळेंच त्याची गोष्ट–हिची कल्पना लोकामध्यें आपोआप उत्पन्न झाली असेल—कदाचित् संतवाङ्मयांत मानाचें स्थान मिळवून बसली व घरोघर ती लोक भक्तिभावानें वाचूं लागले.

## प्रदीपांची लाखोली

सांगावयाचें काय कीं विशिष्ट कालखंडामध्यें जे विचार लोकांत प्रसृत झालेले असतात, त्यांना धरून असलेलें वाङ्मय चिरंतन किंवा टिकाऊ होण्यास मदत होते, यावरून मात्र असें समजावयास नको कीं सर्व वाङ्मय प्रातिनिधिक असलें तर तें टिकतें. मराठीचीच गोष्ट घेतली, तर अनेक संत महाराष्ट्रांत होऊन गेले. त्या सर्वांच्याच ग्रंथाला मानाचें स्थान मिळालें नाहीं. संशोधकांनीं अनेक नवीन नवीन गाथे प्रसिद्ध केले आहेत, पण ते सर्वच लोकांच्या जिव्हाग्रीं बसले नाहींत. एवढेंच कशाला तुकारामाचे दुर्मिळ अभंगहि छापले आहेत. पण जे एकदां दुर्मिळ ठरले ते दुर्मिळच. ते कदाचित् एखाद्या ग्रंथालयांत मिळतील पण त्यांना लोकांच्या जिव्हाग्रीं नाचण्याचा मात्र मान नाहीं. पांगारकरांनीं संपादिलेल्या भक्तिमार्ग-प्रदीपाचें आधींच लोकांना मुखोद्गत असलेलें वाङ्मय आहे. भक्तिमार्ग प्रदिपाची लाखोली महाराष्ट्र शारदेच्या चरणीं रुजू झाली आहे, पण त्यांत चिरंतन म्हणजे लोकांना मुखोद्गत, या अर्थानें थोडेंच वाङ्मय आहे.

## वाङ्मय–नवनीत

मराठीची गोष्ट सोडून, संस्कृत साहित्याचा विचार केला, तरी हीच गोष्ट नजरेस येते. भासांचीं नाटकें अलीकडेच उपलब्ध झालीं. मध्यंतरीच्या कालांत तीं लोक विसरलेच. लोकांचा व्यवहारच चलनशील आहे. ते भाषाहि विसरतात व वाङ्मयहि विस्मृतिगर्तेंत फेंकून देतात. जें काय राहील तेवढेंच चालू ठेवतात. पण एक मात्र गोष्ट दिसून येते कीं कांहीं ग्रंथ किंवा कांहीं ग्रंथांतील भाग अमर झालेले असतात. दहीं घुसळून ताक पुष्कळ निघतें व लोणी अल्प निघतें. लोणी ठेवतात व ताक पाण्यासारखेंहि वापरतात किंवा शेजारीं देतात. पण लोणी देत नाहींत. लोणी लोकांना देण्याएवढें निघतच नाहीं मुळीं. वेद अडीच हजार वर्षांपूर्वी झाले, असे कुणी म्हणतात, कुणी त्यापूर्वींहि त्यांना अस्तित्व होतें, असें प्रतिपादितात पण त्यांतलीं कित्येक सूत्रें लोकांनीं नित्यच स्मरणांत ठेवली होतीं. कारण तीं त्यांना साररूप वाटलीं. दशग्रंथी ब्राह्मण सर्व ग्रंथ पाठ म्हणतील, पण पुरुषसूक्त, देवे वगैरे म्हणणारे सगळेच. सांगण्याचा हेतु असा आहे कीं, वाङ्मय गडगंज मापानें निर्माण झालें, तरी त्यांतलें नवनीत तेवढेंच टिकून राहतें व तें टिकविण्याचा जनता अट्टाहास करीत असते.

## चिरंतन वाङ्मयाचे गुण

जनता जें वाङ्मय टिकविते, तें अनुभवावर आधारलेलें असतें, असेंहि म्हणतां येईल; किंवा त्यामध्यें रंजकता किंवा मानसिक समाधान देण्याचा गुण असतो असें म्हणतां येईल. ‘तुका म्हणे उगी राहावें । जें जें होईल तें तें पहावें’ ह्या ओळी व्यवहार सांगतात. ह्यांतील उपदेश ज्यांना पटला त्यांनीं तो ह्या ओळी सुटसुटीत वाटल्यामुळें ध्यानांत ठेवला व वेळींप्रसंगीं इतरांना तो ऐकविला. त्या ओळींचें लोण अलीकडेपर्यंत चालू झालें. कित्येक ललितग्रंथहि ह्याच कसोटीनें टिकून राहतात. रघुवंशांतील अजविलाप सुंदर आहे. तो अजविलाप एखाद्या विधुराला अधिक पटतो. तोच त्याची प्रशंसा इतरांना करतो; व अशा रीतीनें हें वाङ्मय चिरंतन होण्याच्या मार्गास लागतें.

## काळाची कसोटी

आजकाल विपुल वाङ्मय निर्माण होत आहे. वाचकवर्गहि फार आहे. तशीच इतर श्राव्य ललितवाङ्मयाचीहि मोठ्या प्रमाणावर पैदास आज होत आहे. या सर्वांना आपआपल्यापरी वाचकवर्गही आहे. जाहिरातीवर नियत-

कालिकें जागतात व लेखक लेखनाविरहित इतर धंद्यावर जगतात, ही गोष्ट खरी असली तरी कथा, कादंबऱ्या, लेख जे प्रसिद्ध होतात, किंवा जीं चरित्रें, इतिहास वगैरे पुस्तकें प्रसिद्ध होतात, त्यांनाहि वाचक आहेत. मात्र साहजिकच प्रश्न उपस्थित होतो कीं ह्यांत तुकाराम, शेक्सपीअर अगर कालिदास यांसारखे चिरंजीवित्व कितीकांना आहे ? जुन्या काळीं अनेक पंथ असले तरी त्यांत बलवान् पंथ एखादाच निघे व त्याचेंच वाङ्मय चिरस्थायी होई; याचा अर्थ असा कीं तें जास्तकाळ लोकप्रिय होई. आज आपण असें पहातों, कीं दर दहा वर्षांनीं निराळींच मोहरीं रंगभूमीवर नाचतात. कांहीं साहित्यिक जन्मभर लिहीत असतात खरे, पण तरुण पिढी व विचारीवर्ग एखाद्या नवीनच विचारसरणीच्या मार्गे असतो. पण थोडें खोल गेल्यास मात्र असें दिसतें कीं जुन्या पिढींत जमा झाले त्यांचेहि ग्रंथ वाचणारे त्यांच्या पिढीचे अगर दुसऱ्या पिढीच्या विचाराचे लोक असतात. म्हणून संग्रहालयांतून या दोघांसाठीं ग्रंथांचा संग्रह करावा लागतो. वरवरचें दृश्य सोडल्यास सामाजिक मनांत संघर्षच चाललेला दिसेल. या संघर्षातून तावून सुलाखून निघालेलें सोनें पूर्वकालींच्या ग्रंथाप्रमाणेंच चिरंतन होईल; मात्र ते अल्प पण तेजस्वी असेल. मात्र हें भाग्य कुणाला लाभेल, हें एकटा कालच सांगूं शकेल.

---

# १२. मेघदूतांतील सुभाषितें

## सुभाषितांचें भांडार

संस्कृत काव्यनाटकादि अभिजात ग्रंथांतल्या सुभाषितांचा बिनतोड उपयोग कांहीं विद्वान् लेखक करीत असतात. '**क्षणे क्षणे यन्नवतामुपैति । तदेव रूपं रमणीयतायाः**' या कालीदासोक्तीचा '**प्रतिक्षणिं रम्यता नविन देते रुची**' अशा वेषांत एका विद्वानानें केला आहे. अशा सुभाषितांचें मर्म कळण्यास त्यांचा अर्थ व संदर्भ कळणें आवश्यक असतें. संस्कृतांत सुभाषितांचें भांडारच आहे. त्यांपैकीं फक्त मेघदूत या काव्यांतील सुभाषितांची चर्चा या लेखांत केली आहे.

## अर्थान्तरन्यास

अलंकारशास्त्राच्या दृष्टीनें पाहिल्यास, हीं सुभाषितें म्हणजे अर्थान्तरन्यास किंवा दृष्टान्त या अलंकाराचीं उदाहरणें होत. पण केवळ अलंकारिक दृष्टि न ठेवतां, विद्वान् लेखक आपल्या लेखनांत, व्याख्यानांत किंवा संभाषणांत, त्यांचा उपयोग करतात. म्हणून नमुन्यासाठीं खालीं मेघदूतांतील सुभाषितें देऊन, केवळ मराठी जाणणाऱ्या वाचकांसाठीं त्यांचा मराठी अनुवाद दिला आहे. मूळ मेघदूत मन्दाक्रान्ता वृत्तांत असून, अनुवाद स्थलपरत्वें जुळेल त्या वृत्तांत दिला आहे.

## कालिदासाचें श्रेष्ठ काव्य

मेघदूत हें कालिदासाचें एक श्रेष्ठ काव्य आहे. आपल्या सेवेंतील एका यक्षावर त्याच्या कामुक वृत्तीमुळें, कुबेराची गैरमर्जी झाली. यामुळें पत्नीचा व त्या यक्षाचा एक वर्षपर्यंत वियोग होईल, असा कुबेरानें त्या यक्षाला शाप दिला. पुढें तो यक्ष आपली अलका नगरी सोडून रामगिरी नांवाच्या पर्वतावर येऊन राहिला. त्याच्या शापाची मुदत कार्तिक शुद्ध द्वादशीला संपणार होती. ह्या मुदतींत, त्याला पत्नीचा वियोग असह्य झाला. आषाढ शुद्ध प्रतिपदेला त्या यक्षानें आपल्यासमोर एक मेघ पाहिला. त्या मेघाजवळ त्यानें आपल्या पत्नीला देण्याकरितां निरोप दिला. त्या मेघाला सांगितलेला मार्ग व निरोप हेच ह्या काव्याचे मुख्य विषय होत. हेच विषय कविकुलगुरु कालिदासानें विप्रलंभ शृंगाराच्या बैठकीवर, मोठ्या बहारदार रीतीनें वर्णिले आहेत.

१. यक्षानें मेघाकडे निरोप पाठविला. वास्तविक मेघ म्हणजे निर्जीव वाफेचा गोळा; व जासूद पाहिजे, तो सजीव माणूस पाहिजे. त्याला निरोप पोंचविण्याचीं साधनें अनुकूल पाहिजेत हा सजीव निर्जीवांमधील भेद कामीजनांना कळत नाहीं. कारण ते कामांध झालेले असतात. ही कल्पना कवीनें '**कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु**' यांत आणली आहे. त्याचा मराठी अनुवाद असा होईल. '**कामी जीवां फरक न दिसतो चेतनाचेतनांत**'

२. मेघानें आपला निरोप कळविला पाहिजे, म्हणून यक्षानें त्याची स्तुति केली आहे. तो पुष्कलावर्तक नांवाच्या भव्य कुलांतला आहे, असें त्याला सांगितलें आहे; व मोठ्या माणसांनीं आपली मागणी न जुमानली तरी चालेल, पण अधम लोकांनीं ती पुरविली, तरी तिला महत्त्व नाहीं, असें सांगितलें आहे. हा विचार '**याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा**' यांत आला आहे. याचा

मराठी अनुवाद असा होईल. '**विफल याचना श्रेष्ठाचि बरि, अधमाची नच, सुफल जरी**'

३. यक्षाप्रमाणेंच, त्याची पत्नी दिवस मोजीत आपलें आयुष्य कंठीत असेल, असें त्यानें मेघास सांगितलें आहे. स्त्रियांचीं हृदयें कोमल असतात, तीं वियोगामध्यें नाशच पावतील! पण केवळ आशेच्या धाग्यावरच तीं तगून राहतात. ही कल्पना '**आशाबंधः कुसुमसदृशं प्रायशो ह्यंगनानाम्। सद्यःपाति प्रणयि हृदयं विप्रयोगे रुणद्धि।**' यांत आली आहे. अनुवादः—'**कुसुमसदृशें जीं स्त्रीहृदयें नष्टचि व्हावीं विरहानें। आशातन्तू बळकट म्हणुनी दिवस कण्ठिती कष्टानें**'

४. मेघाला बराच लांबचा मार्ग आक्रमावयाचा आहे. वाटेंत तो वर्षाव करील व आम्रकूट नामक पर्वतावर जाईल. तो पर्वत, वर्षावानें कृश झालेल्या मेघाला आश्रय देईल. पूर्वीची आठवण ठेवून, थोर माणूस कृतज्ञता बुद्धीनें वागतोच वागतो, कारण एखादा क्षुद्र माणूसही विपन्नावस्थेंतील मित्राला आश्रय देतो. कालिदास म्हणतो, '**न क्षुद्रेपि प्रथमसुकृतापेक्षया संश्रयाय। प्राप्ते मित्रे भवति विमुखः किं पुनर्यस्तथोच्चैः॥** अनुवादः—

**कृतोपकारा स्मरुनि क्षुद्रहि देतो आश्रय मित्राला। विन्मुख व्हावा थोर कसा त्या, आश्रय मागूं जो आला॥**

५. पुढें मेघाच्या प्रवासांत त्याला नर्मदा नदी लागेल. त्या नर्मदा नदीचें पाणी पिऊन तो पुष्ट होईल. त्या वेळीं वारा त्याच्याशीं तुलना पाऊं शकणार नाहीं. कारण एखाद्याची संपत्ति जाऊन; तो कंगाल झाला कीं त्याला हीनता येते. पण तोच संपत्तीनें युक्त असला, कीं त्याचा गौरव होतो, ही मुळांतील कल्पना, '**रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय**' या चरणांत आली आहे. तिचा अनुवाद असा होईल, **रिक्तां सर्वा मिळत लघुता, पूर्णता गौरवानें.**

६. मेघाच्या वाटेंत त्याला उज्जयिनी नगर लागेल. तें त्या काळचें ऐश्वर्यसंपन्न नगर होतें. तिथले विलास पाहून, मेघाला तिथेंच थांबावें असें वाटेल. पण त्यानें तसें करूं नये; म्हणून यक्षानें त्याला सांगितलें कीं तूं एक रात्र तिथें मौज पाहा व दुसऱ्या दिवशीं उठून जा; कारण जे लोक मित्राचें कार्य पत्करितात, ते त्या कार्याच्या कामीं आळस करीत नाहींत. ही कल्पना '**मन्दायन्ते न खलु**

**सुहृदामभ्युपेतार्थकृत्याः** ' यात आली आहे. अनुवादः—" **हातीं घेतां अलस न वनती साधिती मित्रकार्य.** "

७. असा बराच प्रवास केल्यावर मेघ हिमालयांत येईल, तिथें वणवा लागून हिमालयाची दुर्दशा झालेली असेल. तिथें मेघानें वर्षाव करून, त्या पर्वताला शांत करावें. कारण दुःखितांच्या दुःखशमनासाठींच श्रीमंतांची संपत्ति असते. कवि म्हणतो, ' **आपन्नार्तिप्रशमनफलाः संपदो ह्युत्तमानाम्** ' मराठी अनुवादः— ' **थोरांची श्री प्रशमन करण्या वाहिली दुःखितांसी.** '

८. असाच प्रवास करून, मेघ यक्षाच्या घरीं जाईल. तें घर त्याला शून्य दिसेल. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें, त्या घरापुढें शंखपद्मांचीं चित्रें दिसतील. पण त्यांत तेज दिसणार नाहीं. उदाहरणार्थ, सूर्यविकासी कमलाची शोभा सूर्यास्तानंतर नसते. कालिदास म्हणतो. ' **सूर्यापाये न खलु कमलं पुष्यति स्वाम् भिख्याम्** ' याचा मराठी अनुवादः ' **अस्ता जातां रवि, न खुलते श्री तशी पंकजाची** '

९. यक्षाच्या घराची खूण पटल्यावर, मेघानें आपल्या भार्येच्या दर्शनार्थ रात्रींच्या वेळीं जावें, असें सुचविलें आहे. घरीं यक्षपत्नी दिसेल. ती भूषण विरहित असेल. ती पुन्हा पुन्हा आपलें अंग बिछान्यावर टाकीत असेल. तिची कींव आणण्यासारखी स्थिति पाहून, मेघाच्या डोळयांतूनहि अश्रु गळतील; कारण दयाळू माणसाचें मन साहजिकच अशा वेळीं द्रवतें. हीच कल्पना ' **प्रायः सर्वो भवति करुणावृत्तिरार्द्रान्तरात्मा** ' अनुवादः—' **चित्ता येते सहज करुणा स्निग्ध कीं चित्त ज्याचें** '

१० यक्षानें, आपल्या पत्नीचे कुशल विचारण्यास मेघास सांगितलें. त्या वेळीं तिच्या समाधानासाठीं पुढील युक्तिवाद सुचविला आहे. गाडीचें चाक फिरत असतें. त्याच्या खालच्या आऱ्यांना क्रमानें वरची स्थिति प्राप्त होते. तशीच यक्षाला प्राप्त झालेली, ही स्थिति जाऊन, उच्चीचे दिवस येतील. कवि म्हणतो, ' **नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण** ' याचा अनुवाद असाः —

' **नीचा लाभे वरचिहि दशा चक्रनेमिक्रमानें** '

११. मेघ, जरी यक्षपत्नीला भेटला व त्यानें कुशल विचारलें, तरी तत्पूर्वी त्यानें त्या बुद्धिवान् स्त्रीला अन्तरीची खूण सांगितली पाहिजे. तशी खूण सांगितल्याशिवाय त्याचा निरोप यक्ष पत्नीला कसा पटावा ? म्हणून, त्या यक्षानें

यक्षपत्नीला अन्तरंगाची खूण पटण्यासाठीं एका स्वप्नाची आठवण दिली आहे; व वियोगानें प्रेम वाढतें, अशी ग्वाही दिली आहे. मुळांतील कल्पना—

**स्नेहानाहुः किमपि विरहे ध्वंसिनस्ते त्वभोगादिष्टे वस्तुन्युपचितरसाः प्रेमराशीभवन्ति.** अनुवादः–**विरहें होतें नष्ट प्रेम हें, बोलत असती जन नित्य। विरहीं वाढे प्रेम आपुलें, येतो अनुभव हा सत्य.**

१२. अशा रीतीनें मेघाला कार्य सांगितल्यावर, तें त्यानें स्वीकारलें कीं नाहीं; हें यक्षानें विचारलें आहे. उत्तराची मात्र अपेक्षा केलेली नाहीं. मेघ हा फार थोर मनाचा आहे. तो आपलें कार्य करणारच. कारण मेघानें, चातकांना पाणी देईन, असें जाहीर अभिवचन कधींच दिलेलें नसतें. वचन न देतांहि तो परोपकार करतो. थोर माणसें अशींच वागतात. कवि म्हणतो, '**प्रत्युक्तं हि प्रणयिषु सतामीप्सितार्थक्रियैव**' मराठी अनुवाद :–**साधु प्रेमिकां वचन न देतां, उपकृत करिती सौजन्यें.**

कालिदासीय सुभाषितांचा हा एक नमुना आहे. 'सुभाषितेन, गीतेन, युवतीनाम् च लीलया। यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः' असें वचन आहे. हीं कालिदासीय सुभाषितें रसिकांना डोलवितीलच. मराठींत तीं रूढ झाल्यास, मराठीच्या अभिजात सौंदर्यांत तीं भर टाकतील, यांत संशय नाहीं.

---

## १४ : दिल्ली तो बहोत दूर है

मराठी भाषेंत प्रत्यहीं पडणारी पुस्तकांची भर पाहिली कीं वाटतें, मराठीचे तिच्या पुत्रांनीं पांग फेडले. एक काळ असा होता कीं, 'भाषा होणार ही असे नष्ट,' असें कंठरवानें सांगणारे व नष्ट झाली–नव्हे, हौंऊ घातली असली-तरी तिच्या 'सुपुत्रानें तिला औषध देऊं नये काय,' असें तिचे लाडके व एकनिष्ठ कवि विचारीत असत. तो काळ आतां बदलला आहे. एखादा गृहस्थ विषमज्वरानें आजारी असला कीं क्षीणप्रकृति होतो. पण त्या आजारांतून उठला कीं एखाद्या वेळीं स्थूलदेहीहि होतो. तशीच मराठी भाषेची अवस्था झाली आहे, असें म्हट-

त्यास, तें वावगें होणार नाहीं. प्रत्यहीं, लघुकथा, गुजगोष्टी, कादंबऱ्या, नवलकथा, चरित्रें, निबंध यांची लयलूट होत आहे. हीं सगळीं पुस्तकें एखाद्यानें वरवर चाळायचीं म्हटलें, तरी शक्य नाहीं. मग अभ्यास करण्याची तर गोष्टच नको,

## शिकंदराचें अश्रुविमोचन

पण मराठीचा स्थूलपणा हा खरा नैसर्गिक आहे कीं तो भासमय आहे, हें पाहणें आवश्यक आहे. किंबहुना तो एक निकडीचा प्रश्न आहे, असें म्हटलें तरी चालेल. ‘ सुजीचें मोठेपण व हळदीचें गोरेपण हीं खरीं नव्हेत ’ अशी एक जानपदांत म्हण आहे. तीच म्हण ही मराठीची स्थूलप्रकृति पाहिली, कीं खरी वाटते. एखादा लेखक चाळीस पुस्तकें लिहून शेक्सपीअरवर ताण करतो. एखादा अष्टपैलू साहित्यिक साहित्याचे असले नसलेले सर्व प्रकार हाताळून साहित्यसम्राट् होतो. एखादा नवमतवादी, साहित्याचे सर्व प्रान्त काबीज करून, शेवटीं बोलपट सृष्टिहि काबीज करतो. आतां लिहायला नवीन प्रकार उरला नाहीं, म्हणून कदाचित् कित्येक सरस्वतीभक्त शिकंदराप्रमाणें आपल्या विजिगीषु वृत्तीचें समाधान अश्रुविमोचनानें करीत असतील ! पण एवढा खटाटोप करूनहि साहित्याचें मूल्य कितपत वाढलें, हा प्रश्न कोणीच विचारांत घेत नाहीं.

## पंधरा आण्यांत खूष

लहानसहान सरस्वतीभक्तांचें आपण सोडून देऊं. जिथें नगाऱ्याची घाई तिथें तुणतुण्याचें कोण ऐकतो ? सरस्वतीदेवीला एकादें फूल वाहणाऱ्या किंवा तिच्यावर एकदांच अभिषेक करणाऱ्या बिंदुस्रावी अल्प प्रतिभाशाली लेखकाचें एक वेळ राहूं द्या; पण ज्यांची प्रतिभा दिनरात्र पर्वतप्राय ग्रंथ निर्माण करीत आहे व ज्यांच्या लेखनामुळें कागद व शाई यांच्यावर महर्घतेचा वरवंटा फिरण्याची वेळ आली आहे, अशा लेखनीधुरंधरांचें तरी चीज कितपत होत आहे ? आज जे प्रतिभाशाली व पुरोगामी असे लेखक आहेत, त्यांच्या कादंबऱ्यांच्या पांचशें प्रति गेल्या तरी गंगेंत घोडें न्हालें, असें प्रकाशक मानतात. ज्या लेखकांचे सांप्रदाय निर्माण होण्याच्या मार्गांत आहेत. ज्यांना गुरु म्हणून मानायला शिष्यगण मस्तक टेंगणें करीत आहे, त्यांच्या कलाकृतींना हा भाव येतो. मग जे असूर्यंपश्या अशा आपल्या गल्लींतून नुकतेच बाहेर पडत आहेत, अशांना आपलीं पुस्तकें घेऊन दारोदार हिंडण्याची पाळी आली तर काय नवल ? स्वतःच पैसे खर्चणारे व केवळ एखाद्या प्रसिद्ध अशा प्रकाशकाच्या आड राहून, जनतारूपी भीष्मावर आपल्या वाग्बाणांचा वर्षाव करणारे शिखंडी साहित्यिक कितीतरी आहेत. कित्येक जण तर

आपल्या लेखाबद्दल एका मासिकांतून बारा वर्षें साहित्यसेवा केल्यानंतर एकदांच कपिलाषष्ठीच्याच योगाप्रमाणें पंधरा आणे मिळाले एवढ्यावर खुष! असे, लेखनांत आपली किंमत होत नाहीं, असें बोलतांना ऐकलें व त्याची बऱ्या साहित्यिकांशीं तुलना केली कीं वाटूं लागतें, 'नवऱ्याला जिथें काट मिळत नाहीं तिथें उपवरानें वरणासाठीं रुसण्यांत काय अर्थ?'

## लेखकाची इच्छा

साहित्यिकांना भरपूर मोबदला मिळाला पाहिजे, हें अनुमान यावरून निघतें, पण त्याच्याकडे मुख्यतः लक्ष वेधावयाचें नसून, दुसऱ्याच एका मुद्याकडे लक्ष वेधणें जरूर वाटतें. साहित्यिक हौसेखातर लिहितात, त्याचप्रमाणें पोटाखातरहि लिहितात; म्हणून त्यांचा अर्थोत्पादन हा हेतु विवाद्य ठरण्यासारखा आहे. पण साहित्यिक जें पांढऱ्यावर काळें करतात, तें वाचण्यासाठीं असतें. लेखक आपण लिहिलेलें आपण न वाचण्याएवढा निष्काळजी व आपणच लिहिलेलें आपणच मल्लिनाथी केल्याशिवाय न समजण्याएवढा निर्बुद्ध असेल, पण तें दुसऱ्यानें वाचूं नये, असें म्हणणारा कल्पान्तींहि आढळणार नाहीं. उलट, जेवढ्या जास्त प्रमाणांत त्याचा लेख लोकांनीं वाचला, तेवढ्या जास्त प्रमाणांत, तो आपले पितर स्वर्गांत उच्चासनावर बसले, असें मानीत असतो. ह्यावरून जें वाङ्मय आज निर्माण होत आहे, तें एवढ्या प्रमाणांत आज लोकांत वाचलें जात नाहीं एवढें खास. मराठी बोलणारांची संख्या सरासरी दोन कोटी मानली व त्यांतले लेखनवाचन करणारे पांचदहा लाख मानले, तरी जितकीं पुस्तकें खपतात, त्यांवरून फारच थोडे लोक खरे ज्ञानपिपासु आहेत, असें म्हणावें लागतें. ग्रंथसंग्रहालयांत कादंबऱ्यांनाच जास्त मागणी असते, ही गोष्ट विचारांत घेतली, कीं ज्ञानप्रसाराच्या दृष्टीनें लिहिलेले ग्रंथ आपलें नियोजित ध्येय साध्य करूं शकत नाहींत, असें कष्टानें म्हणावें लागतें.

## साहित्यांतील वाद

ज्या वेळीं विश्वविद्यालय स्थापन झालें त्या वेळीं ज्ञानाचे दिवे तयार होतील व त्यांचा प्रकाश खेड्यांपाड्यांतील अंधःकार नष्ट करील अशी कित्येकांना आशा वाटत होती. वास्तविक तयार झालेल्या पदवीधरांनीं आपल्या ज्ञानाचें लोण बहुजनसमाजापर्यंत पोंचवायचें म्हटलें असतें, तरी एवढ्यांत सर्व मराठी जनता साक्षर झाली असती. पण एवढ्यांत अशी जादूची कांडी फिरल्याप्रमाणें कांहीं अद्भुत चमत्कार घडल्याशिवाय सरस्वती बहुजनसमाजाच्या घरांत पाणी भरणार नाहीं. ज्ञानाचें पाणी झिरपून खालच्या थराला गेलें नसतांना, मात्र वाङ्मयांत उत्पन्न झालेले वाद

पाहिले कीं ह्या अटीतटीच्या सामन्यांनीं, खालच्या थरांत संस्कृति मुरण्यास आणखी नवे खडक अडथळा करीत आहेत, असें वाटतें. नवमतवाद कीं सनातन धर्म, ध्येयवाद कीं वास्तववाद, वैयक्तिक टीका कीं सामाजिक जबाबदारी, कला कीं नीति, श्लीलता कीं अश्लीलता असे हजारों वाद वर डोकें काढतात, फोफावतात, व लेखक स्वतंत्र गट निर्माण करून आपल्याच भोंवतीं आरती ओंवाळतात. हे वाद साहित्यिकांच्या जिवंतपणाचीं व सळसळणाऱ्या रक्ताचीं प्रतीकें आहेत, एवढी गोष्ट खरी. पण त्यांची दाद सामान्य माणसाला मुळींच नाहीं व त्याचें त्या वादांपासून कांहीं अडतहि नाहीं.

**कांहीं प्रयत्न.**

यावरून भाषेच्या प्रसारासाठीं, तिच्या स्थैर्यासाठीं व तिच्या सातत्यासाठीं कमी प्रयत्न चालले आहेत, असें समजण्याचें कारण नाहीं. सिंधांत मुसलमानांची करडी नजर मराठीवर फिरली, कीं तिथें बृहन्महाराष्ट्रीय धांव घेतातच. गोमंतकीय व कारवारी प्रान्तिक बोलीला स्वतंत्रपणें नोंदवा, असें म्हणूं लागले कीं मध्यमराठीवाले ती मराठीचीच उपभाषा आहे, अशी हाकाटी करतात; मोंगलाईंत निजामानें मराठीवर शस्त्र उगारलें कीं खेड्यांच्या मैदानावर मराठे गडी गोळा होतातच.

पण हे सर्व प्रयत्न नैमित्तिक अतएव प्रासंगिक आहेत हें विसरतां नये. खरे प्रयत्न म्हणजे मराठीचा अभिमान व संस्कृतिप्रियता खालच्या थरांत नेऊन भिडविली पाहिजे. जे वाद आज थोरांचींच डोकीं शिणवितात, त्यांचें ग्रहण करण्याएवढी तरी शक्ति सामान्य जनतेंत आली पाहिजे. नुसती कारवारी ही मराठी बोली आहे, म्हणून नमूद करण्यांत हंशील नाहीं; तर कारवारी व गोव्यांतील लोकांना मराठींतूनच ज्ञान दिलें पाहिजे, त्यांतील वाङ्मयाची त्यांच्यामध्यें अभिरुचि निर्माण केली पाहिजे, तुकारामाचे अभंग महाराष्ट्राच्या रोमारोमांतून भिनले आहेत, तसें—आजचें अगदीं सनातनी नव्हे—तर प्रागतिक वाङ्मय खेड्यांपाड्यांतून चिरस्थायी झालें पाहिजे. वर्तमानपत्रे, आज निघतात व उद्यां मरतात. लेखक आज उत्साहानें पुढें येतात, व उद्यां पुस्तकप्रकाशनापायीं कर्ज झालें म्हणून, अज्ञातवास पत्करतात. तसेंच, नवीन वाद उद्भवतात व विराम पावतात. ही स्थिति पालटली पाहिजे. म्हणूनच मराठीचें शब्दभांडार व ग्रंथभांडार फुगत चाललें असलें तरी ' दिल्ली तो बहोत दूर है ' असेंच म्हणावें लागतें.

मार्च १९४१

———

## १५ : इंदू काळे व सरला भोळे

### रचनेंतील अडचणी

ही कादंबरी लिहितांना लेखकानें एका भयंकर दिव्यांतून पार पडण्याचा विडाच उचललेला दिसतो. पोस्टखात्यानें दर वाढविले आहेत म्हणूनच नव्हे, तर इतर कारणांनींहि पत्रांत दोन अक्षरें वाढविणें हें किती दुष्कर काम आहे, याचा अनुभव प्रत्येक पत्रलेखकाला असेलच. मग एक संपूर्ण कादंबरीच पत्ररूपानें लिहावयाची याला कोणी दिव्य म्हटलें तर त्यांत कांहींच वावगें नाहीं. पात्रांचे विविध दृष्टिकोन मांडणें, हें पत्रद्वारें कांहींसें सोपें जात असलें, म्हणून आत्मकथनपर लेखनापेक्षां पत्ररूप लेखन सोपें, असें म्हणणें चुकीचें ठरेल. पत्ररूपानें कथानक रंगवावयाचें तर कथानकांतील पात्रें व प्रसंग प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर कशीं नाच-वावयाचीं ही मुख्य अडचण भासते. या कादंबरींतील जखीण खिंडींतील प्रसंग खरोखर आकस्मिक आहे. तिथें वीररसाच्या परिपोषाला मामुली रचनेंत बराच वाव आहे. अशाच एका हल्ल्याच्या प्रसंगीं 'गड आला पण सिंह गेला' या कादंबरीचीं आरंभींची बरींच पृष्ठें, हरिभाऊंनीं प्रसंगाच्या वर्णनांत खर्चीं घातलीं आहेत. पण इथें हकीगत पत्रांतच लिहावयाची असल्यामुळें विनायकरावांना आपला हात आखडता घ्यावा लागला आहे; त्यांनीं एका पानांतच त्या प्रसंगाची इतिश्री केली आहे. तसेंच नैसर्गिक दृश्यें व वर्णनें यांना सर्वत्र संक्षेप मिळाला आहे. कथनाचा हा एक विशिष्ट प्रकार अनुसरल्यामुळें कोणती अडचण भासते, याची जाणीवहि अर्थात् लेखकास आहे; 'हुंदके, आंवढे, अश्रुपात, पदरानें डोळे पुसणें, मांडींत डोकें खुपसणें, पाठ थोपटून पदरानें डोळे पुसणें, वगैरे गोष्टी कादंबरींत वर्णन करावयाच्या असतात. त्या पत्रांत लिहून काय उपयोग ?' असें, ते एके ठिकाणीं म्हणतात.

पत्रलेखनप्रकारांतील दुसरी अडचण अशी कीं, पत्रें आठवणींतून लिहावयाचीं असल्यामुळें, हुबेहूब व जीवनसदृश प्रसंग निर्माण करून कथानकाचें गाडें पुढें ढकलण्यास त्यांचा हुकमी उपयोग करतां येत नाहीं. दौलत या कादंबरींत अक्काच्या बाललीलेचा कादंबरीकारानें मोठा खुबीदार उपयोग केला आहे. अविनाशचा फोटो निर्मलेला दाखवीत असतांना केलेल्या वर्णनांत तिचें दादा-वरील प्रेम, अविनाशाची देहयष्टि, निर्मलेच्या मनांत प्रेमांकुराचा उद्भव व त्याची

वाढ, इत्यादि गोष्टींचा उल्लेख कादंबरींत एकसमयावच्छेदानें करतां आला. पण छोटूच्या बाललीलांचें वर्णन पाल्हाळानें करण्याचा मोह टाळून, ' छोटू हा राजा व आम्ही प्रजा ' अशा सूचक भाषेनेंच, तें काम पत्रांत उरकून घ्यावें लागलें आहे. श्यामसुन्दरचें बाल्यवर्णन व छोटुपुराण यांमध्यें फक्त कथनप्रकारामध्यें साम्य दिसतें. त्याचप्रमाणें कथेचें गुह्य, जें कांहीं तरी कार्य, त्यालाहि या रचनेमुळें संक्षेप घ्यावा लागला आहे. पात्रांकडून फक्त वाचन, टीपा तयार करणें, अशीं अगदीं साधीं कार्यें घडविलीं आहेत. सत्याग्रह इत्यादि कांहीं महत्त्वाचीं प्रकरणें फक्त चार दोन ओळींत आवरून घेतलीं आहेत. प्रस्तुत कादंबरींत जें कार्य घडतें, तें बाह्य व दृश्य जगांत घडत नसून, शेक्सपीअरच्या पात्रांप्रमाणें मनोमय व आन्तरजगांत घडतें. त्याच कार्याची प्रतिमा तयार करणें, हें या कादंबरीचें ध्येय आहे.

## आकांक्षा, भावना व विचार

आकांक्षा, भावना व विचार या त्रिकुटांत बाह्य परिस्थितीप्रमाणें काय प्रतिक्रिया घडतात हें दाखविणें, हेंच प्रस्तुत लेखकाचें अंगीकृत कार्य दिसतें. मनाच्या रंग-भूमीवर एखाद्या वेळीं कशा चमत्कृतिपूर्ण घटना निर्माण होतात, हेंहि लेखकानें मधून मधून दाखविलें आहे. पुत्ररत्नाची प्राप्ति ही आर्यांच्या अनेक आकांक्षांपैकीं एक; ' आत्मा वै पुत्रनामासि ' ही त्यांची श्रुति. पण आपल्याला पुत्र होणार ही गोष्ट पत्रद्वारेंहि सांगण्यास आंग्ल-विद्याविभूषित लोकहि कसे बिचकतात, हें या कादंबरींत दोन ठिकाणीं दाखविलें आहे. हीच गोष्ट पतीला कळविण्यासाठीं सरला ' अमावास्येच्या कडेवरील चंद्रकोर ' या रूपकाचा आश्रय घेते ! दोघांनाहि, ज्ञात गोष्ट शब्दरूप करावयाची, म्हणजे सद्भावसंपन्न मनाची कोण धांदल होते पहा ! भाऊराव काळे हा पुरुष असून त्यालासुद्धां ' इति ते वदन्ति ' म्हणून कानावर हात ठेवावे लागले आहेत ! ही परिस्थिति बदलली पाहिजे म्हणून नवमतवाद्यांनीं पाहिजे तर म्हणावें. पण या सत्यकथनांत खरोखरची मौज आहे. वाचकाच्या मनांत इथेंच गुदगुल्या होतात. पृष्ठ ७० वरील कामरहित लडिवाळपणाचा प्रसंगहि असाच मार्मिक आहे.

## नवीं नाणीं

प्रो. जोशी हे तत्त्वज्ञानांत मुरलेले असूनहि त्यांच्या पत्रांची भाषा सोपी, व्यव-हारांतली व हृदयाचा ठाव घेणारी अशीच आहे, हें त्यांस भूषणावह आहे. त्यांची आश्रमहरिणी किंवा रागिणी वाचतांना, भाषेचें रान बरेंच तुडवावें लागतें व नंतर

अर्थ हातीं येतो. परंतु त्रोटक व सुटसुटीत वाक्यें, हा या कादंबरीच्या भाषेचा विशेष आहे. कोट्या व अर्थगांभीर्य, यांचाहि तिच्यावर शृंगार चढविला आहे. एकट्या कृष्णवर्णाला अनुरोधून 'शाईचा खर्च पडणार नाहीं' 'पांढऱ्या दगडावरची काळी रेघ', वगैरे कोट्यांची त्यांनीं खैरात केली आहे. कोटी करण्याचा आलेला प्रसंगच वायां दवडलेला नाहीं. आपल्या भाषेच्या सहजसुंदर व मनोहर देहयष्टीवर प्रोफेसरसाहेबांनीं अर्थगर्भ कोट्यांची अनेक नवीं लेणीं चढविलीं आहेत; तर कित्येक ठिकाणीं जुन्या दागिन्यांनाच उजाळा देऊन, तीं लेवविलेलीं आहेत. "श्रीमन्त आईचे महत्त्वाचे प्रश्न दरिद्र्यांच्या मनोरथाप्रमाणें उत्पन्न होणार व विलय पावणार!" 'अग अग काशी मला कां नेशी' 'तुला आतां एक गोष्ट सांगतों, थोडक्यांत सांगतों, पण लाख रुपयांची आहे' हे सुभाषितांचे व म्हणींचें नवे अवतारच होत! प्रो. जोशी येवढ्यावरच थांबले नसून त्यांनीं 'कंत्राटी लग्न' यासारखे नवे शब्दहि तयार केले आहेत. 'मनुष्य जितका चांगला तितका वाईटहि आहे' 'ईश्वर वस्ताद खरा, पैसा देतो पण अशी मेख मारून ठेवतो' 'शौक कसलाहि असो, तो शेवटीं शोककारक व्हावयाचा' यांसारखीं सुभाषितें म्हणजे त्यांच्या टांकसाळींतील नवीं नाणीं होत!! पत्रांचीं शीर्षकें लिहितांना त्यांनीं तीं छोटीं, सुटसुटीत व अर्थवाहक अशींच निवडलीं आहेत.

## रचना-कौशल्य

रचनेच्या दृष्टीनें जें महत्त्व प्रकरणांना तेंच पत्रांना. प्रकरणांची आंकडेबदल होत असतांना, कथानकाचा ओघ बदलला पाहिजे, पण त्यांत खळ पडतां नये. तसेंच कथानकामध्यें असंबद्ध प्रसंग मध्येंच शिरतां कामा नयेत. पत्रबद्ध-रचनेंत तर हें पथ्य विशेष सांभाळलें पाहिजे. कथानकाचे धागेदोरे पत्ररूपांत विणतांना, त्या पत्रांचा एकमेकाशीं संबंध जेवढा अधिक, तेवढें कादंबरीकाराचें कौशल्य अप्रतिम. प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्या वाचतांना एका प्रकरणांतून दुसरें उत्पन्न होत आहे कीं काय, असा भास होतो, तसा हीं पत्रें वाचतांना होत नाहीं. कित्येक ठिकाणीं सजोड उत्तरप्रत्युत्तरें चांगलीं साधलीं आहेत, नाहीं असें नाहीं. कथानकाच्या प्रवाहांत तीं भर घालतात, पण एकमेकांशीं जणूं काय फटकून वागतात. या तुटकपणाला कांहीं अपवादहि आहेत. सातव्या पत्रांत सरलेनें म्हटलें आहे कीं 'आमचीं मनें असावीं तेवढीं शुद्ध नाहींत.' याला उत्तर विनायकरावांकडून मिळण्यास अर्थात् थोडासा वेळ आहे; पण आठव्या पत्रांतच आप्पांनीं भांडणांची मीमांसा केल्यामुळें भांडणें कां होतात, ही जी

वाचकाची जिज्ञासा ती अप्रत्यक्षपणें लगेच पुरविली गेली आहे. ते म्हणतात, ‘सूनबाईनें सारासार विचार करावा. आधीं घरांत काम करण्यास नोकर चाकर आहेतच, तेव्हां कामाची तक्रार नसावी. दुसरं असं कीं, सरला माहेरवाशीण आहे.’ उत्तरास प्रत्युत्तर या न्यायानें ३२ व ३३ हीं पत्रें देखील अशींच संलग्न झालीं आहेत.

सांखळीच्या दुव्यांप्रमाणें पत्रें संलग्न असलीं पाहिजेत, त्याचप्रमाणें तीं स्वयंपूर्णहि असलीं पाहिजेत. एकाच बैठकींत पुस्तक समग्र संपविणें सर्वांनाच शक्य नसतें; या साठीं मधून मधून समाधानकारक शेवट असलेलीं पत्रें पाहिजेत. लेखकाचीं सगळींच पत्रें या कसोटीला उतरणार नाहींत. तथापि ५ वें पत्र, यांत गॅट डफ् वगैरे राक्षसांचा संहार करण्याचा विनोद असल्यामुळें, स्वयंपूर्ण झालें आहे. त्याचप्रमाणें ५२ वें पत्र ‘ज्ञानाची ऐट होती व पण पदोपदीं अज्ञानाचा अनुभव येत आहे,’ हा नारायणराव पाठकाच्या मनांतील नवीन फरक सांगून संपविलें आहे. यामुळें तें परिणामकारक वठलें आहे. तसेंच दहावें पत्र ‘पतिपत्नींतील गैरसमज ही सामान्य आपत्ति नव्हे’ या सुभाषितानें व १५ वें ‘मी शेवटपर्यंत अविवाहित राहीन’ या काशीच्या निश्चयानें संपविलें असल्यामुळें, हीं दोन्ही पत्रें परिणामकारक वठलीं आहेत. ५९ व्या पत्राचा शेवट मात्र मिळमिळीत आहे. पूर्वभागांतील ‘यतो वाचो निवर्तन्ते’ येथपर्यंत कळसाला नेलेल्या वातावरणामागून ‘मोफत शाळा चालविण्याची’ केवळ हीनच नव्हे पण किंचित् खालची पायरी येते, हें पाहून वाचकाचा थोडासा हिरमोड होतो.

**एकसूत्रता**

एखादें पत्र जसें स्वयंपूर्ण व सुसूत्र असलें पाहिजे, तशीच कादंबरीलाहि साकल्यानें एकसूत्रतेची आवश्यकता असते. स्थळ, काल व कृति यांच्या एकत्वानें कादंबरीला एकसूत्र करण्याचा जुना परिपाठ होता. प्रस्तुत कादंबरीचे कालाच्या दृष्टीनें दोन सुटे विभाग पडतात. १९१९ ते १९२७ हा एक व १९३३ ते ३४ हा दुसरा. वरवर पहाणाराला, जरी हे दोन स्वतंत्र विभाग दिसले, तरी वस्तुतः ते तसे नाहींत. कारण पूर्वी कथानक एका विशिष्ट बिंदूपर्यंत आणल्यानंतर कारावासाच्या अपरिहार्य अडचणीमुळें हा कालखंड पडलेला आहे. कादंबरीचें उद्दिष्ट मानसिक क्रांतिनिदर्शन, हें असल्यामुळें एवढा कालखंड रिकामा सोडावा कीं काय, हा एक प्रश्न येथें उद्भवतो. सहा वर्षांनंतर होणारे बदल एकदम चित्रित केल्यानें आश्चर्य निर्माण होतें व चमत्कृतीचा आभास निर्माण करतां

येतो, हें खरें. पण 'कालासारखें औषध नाहीं' अशी ग्वाही दिल्यानंतर कालक्रमाप्रमाणें पात्रांच्या मनोरचनेंत बदल झाला, यांत नवल तें कसलें ? रसपरिपोषाच्या दृष्टीनेंहि हे दोन भाग कांहींसे 'दुलग' झाले आहेत. पहिल्या थोड्याशा विस्तृत वाटणाऱ्या भागामध्यें करुण व समाधानपूर्ण मंदहास्याचे वाचकाला हेलकावे मिळतात. इंदु–सरला यांच्यामधील कटकटीनें तो किंचित् उदास होतो; तों, लगेच त्यांची कटकट मिटून त्याला समाधान लाभतें. जखीणखिंडींत विनायकरावांवर हल्ला झाल्याबरोबर वाचकाला थोडीशी भीतीची झळ लागते; तों, ते लगेच संकटमुक्त होतात. काशीवर नारायणरावांची अवकृपा झाल्यामुळें केव्हा त्यांची सहानुभूति दुखावते, तर केव्हा पाठकांना उद्वेग वाटून, ते काशीचा अंगीकारहि करतील, अशी आशा वाटते. इंदूची कलालालसा अतृप्त राहून, पतिपत्नींमध्यें बिघाड होईल कीं काय अशी किंचित् शंका येते, तों लगेच पतिपत्नी एकदिल होऊन संसाराचें पहिलें रहस्य उलगडतांना दिसतात. अशा रीतीनें हा पूर्वभाग एखाद्या तारवाप्रमाणें मंद मंद हेलकावे खातो. पण बारकाईनें पाहिल्यास उत्तरोत्तर करुणरसाची छायाच घनदाट होत जाते, असें दिसेल. इन्दू म्हणते, 'इतके दिवस सगळ्यांचेच आनंदांत गेले; पण आतां सगळ्यांनाच आपापल्यापरी काळज्या उत्पन्न झाल्या आहेत. ईश्वराची मर्जी.' शेवटीं तर ईश्वराची गैरमर्जी होऊन 'आकाशांतून कुऱ्हाड कोसळली,' भोळ्यांचीं मुलें गेलीं आणि छळ सोसावा लागला. आरंभीं श्लेष, कोट्या इत्यादिकांची प्रत्येक पत्रांतून रेलचेल उडत असे. मागाहून क्वचित् एखादीच कोटी सांपडते.

## करुणरसाचा परिपाक

कथानकाच्या उत्तरार्धांत तर करुणरसानें कमाल उडविलेली आहे. विनायकराव ध्येयासाठीं मरतात, पण त्यांना छळ सुटत नाहीं. 'भार वाहुनी परार्थ जाहलों रिकामा' हे रेंदाळकरांचे उद्गार त्यांनीं काढले असले, तर ते हृदयाला कढ येऊनच निघाले होते, असें सहृदय वाचक म्हणेल. देशोद्धारासाठीं झटावें पण ज्यांच्यासाठीं तनमनधन वाहावयाचें, त्यांना स्वतःचें हित कळूं नये, उलट त्यांनी अज्ञानानें उपकारकर्त्यांवर उलटून पडावें, यापेक्षां दैवदुर्विलास तो दुसरा कोणता ? नागे–फुरशे हे बिनशेपटीचे प्राणी, जीवसृष्टींतील नाग्या फुरशांना आपल्या छळवादीपणानें मागे टाकतील. सापाची जात धक्का लागला तरच दावा साधते, असें म्हणतात ! 'पण अमृत तेंच विष' असें मानणाऱ्यांना काय नांव द्यावयाचें ? ध्येयवादी माणसाला परिस्थितीशीं झगडावें लागतें व त्यांतच त्याची कसोटी ठरते, ही

गोष्ट निर्विवाद आहे. म्हणून विनायकरावांवर कितीहि लोक उलटून पडले, तर त्याबद्दल एवढी अनुकंपा जागृत होत नाहीं. पण ते मेल्यानंतर जेव्हां शाळेला सुट्टी मिळते; त्या वेळीं पोरें मौज उडवितात, तेव्हां मात्र वाचकाचें धाबें दणाणतें. ‘ ध्येयें म्हणजे दुःखें ’ हाच सिद्धांत यावरून घ्यायचा काय ? असा प्रश्न पडतो. त्यांतच विनायकरावांच्या चिमुकल्यांचा विचार आला म्हणजे, हीच कल्पना दृढ होते. ईश्वराच्या घरीं त्यांनीं कोणतें पाप केलें होतें कीं, त्यांचीं रत्नें अकालीं हरपावीं ? सृष्टीहि तोच सूर काढते—नव्हे बदसूर होते. ‘सृष्टीला आमच्या दुःखाची किंवा संकोचाची जाणीव होती, असें दिसलें नाहीं. कारण कोंबड्यांचें आरवणें, कावळ्यांची कावकाव, कुत्र्यांचें भुंकणें, पूर्वीसारखेंच चाललें होतें......भोळ्यांसारखा महात्मा मृत्युवश झाला, याची जणूं दखलगिरीच नाहीं, अशा भावनेनें लोकांचे व्यवहार चालू झाले.’ सृष्टीचा गाडा अनादि कालापासून चालू आहे; व तो अनन्त युगें असाच ढकलत जाणार. विश्वाच्या अफाट रहाटगाड्याला एखाद्या व्यक्तीच्या भवितव्याचें महत्त्व तें काय असावयाचें ?

## कादंबरीचा विषय

विश्वाचे व्यवहार एकसारखे बदलतात, त्याचप्रमाणें विचार—आचार बदलत असतात; तसेंच व्यक्तीचें शरीर व व्यक्तीचें मन हीं अहर्निश बदलत असतात, हें मात्र ह्या कादंबरींत मोठ्या कौशल्यानें दाखविलें आहे. कादंबरीचा विषयच मनोरचनेचे फेरबदल दाखविणें हा आहे. मनोविहाराचें जें आश्रयस्थान ज्ञान त्यांतच क्रान्ति घडत आहे (पान १०२). विकासवाद अन्तिम प्रश्न सोडवीत नाहीं म्हणूनच अपुरा ठरला, राजकारणांत हिटलर, मुसोलिनी वगैरे धुरीणांचे नवे प्रयोग सुरू झाले; मानसशास्त्रानें आत्म्याची विल्हेवाट लाविली व या विश्वव्यापाराचें जणुं काय सूचक प्रतीक म्हणून ‘ वर्तुल ’ परिघदांचीं चक्रेंहि फिरलीं. जसे कादंबरी-व्यतिरिक्त जगांत फेरबदल झाले, त्याप्रमाणें कादंबरींतील पात्रांच्या मनोव्यापारांतहि बदल झाले. त्याच फरकाचें यथार्थ चित्र रंगविण्यासाठींच या कथेचा अवतार झाला आहे; म्हणून त्या बाबतींत थोडासा विचार करूं.

## कादंबरींतील पात्रें

सरला—विनायक, इन्दु—भाऊ व काशी—नारायण ह्या जोडप्यांचे ( तिहींपैकीं दोनच युग्में विवाहबद्ध आहेत ) अन्योन्य संबंध लेखकानें चित्रित केले आहेत. यापैकीं प्रत्येक जण ध्येयनिष्ठ आहे. ध्येय डोळ्यापुढें ठेवल्यावर, त्याचा मार्ग आक्रमिण्यासाठीं करारी स्वभावाची जरूरी असते. तसला करारीपणाहि प्रत्येकाच्या

ठिकाणीं आहे. या करारी बाण्यांत पाठक व भाऊ काळे, हीं दोनच पात्रें कच्चीं ठरतात. भाऊ व्यवहारी व असमाधानी म्हणून कचा व पाठक ध्येयामध्यें बदल करतो, म्हणून कचा. सरला सीता–सावित्रीसारखी मुळचीच पतिव्रता. तिची पतिभक्ति, मुलें मेलीं व कष्ट सोसावे लागले, यांमुळें दृढच होते. म्हणून तिची पायरी वरच्या दर्जाची लागते. विनायकाचा मात्र उत्तरोत्तर उत्कर्ष होत जातो, व तो 'यतो वाचो निवर्तन्ते' ह्या उच्च आध्यात्मिक उन्नतीला जाऊन पोंचतो. काशीचेंहि पात्र त्याच्याच कोटींतलें आहे. तिचें चित्त एकदा नारायणाच्या ठिकाणीं रममाण होतें, तें कायमचें. मरण पत्करूनहि नारायणापासून ती दूर होत नाहीं. इंदूसुद्धां कलेची भोक्ती असल्यामुळें, पहिल्यांदा म्हसकरांचा सहवास सोडण्याचें धैर्य दाखवीत नाहीं. पण शेवटीं पतिचरणीं लीन होते. खलपात्र म्हसकर, यानें शेवट आत्महत्त्या केली असली, तरी तो नैतिकदृष्ट्या उच्च कोटीचा वाटतो.

वर जीं तीन जोडपीं उल्लेखिलीं आहेत, त्यांचा एकमेकांशीं संबंध बौद्धिक जगांतला आहे. ते व्यावहारिक दृष्टया एकमेकांशीं संबंधच ठेवीत नाहींत, असा भास होतो. पत्रद्वारें आमचा ह्या व्यक्तींचा संबंध येत असल्यामुळें, हीं पात्रें बरोबर फिरायला जातात कीं नाहीं, एकमेकांना चहाला बोलावतात कीं नाहीं, हें समजणें कठीण झालें आहे. पण त्यांचा बौद्धिक संबंध मात्र लेखकानें कसोशीनें साधला आहे. इंदु जेव्हां 'पतिभक्ति कीं कलाप्रेम' यांच्या झगड्यांत सांपडते, त्या वेळीं पत्नीची जबाबदारी काय असते, हें विनायकरावांनीं तिला सांगितलें आहे. 'आपली कलेची भूक शांत करतांना पतीची हेळसांड होत नाहीं ना?' असें म्हणून त्यांनीं तिच्याच, आभाळांतील ढगांच्या दृष्टांताचा उपयोग केला. यामुळें त्यांचें संबंध, जीवन व कला या दृष्टींनीं दृढमूल झाले आहे, ४२ व्या पत्रांतील उपदेश नारायणरावांच्या मनांत नवीन विचार घोळूं लागल्यावर केल्यामुळें थोडासा उशिरां केल्यासारखा वाटतो, पण तोहि विनायकरावांच्या स्वधर्मास अनुसरून असल्यामुळें दोन कथानकें जोडतो. हा विचारप्रवाह एकाच दिशेनें वाहत नसून, २९ व्या पत्रांत नारायणरावांनींहि 'राजकारण व समाजकारण दुलग असावें' असा उपदेश विनायकरावांना सादर केला आहे. काशी ही सरलेच्या पावलावर पाऊल ठेवून, जीवित अनन्यभावानें वल्लभाच्या चरणीं वाहते. म्हणून ह्यांच्यामध्यें जीवन्मुक्त गुरु व मुमुक्षु शिष्य यांच्यासारखें नातें जडलें आहे. भाऊराव व इंदु हीं विनायकरावांवर सल्लामसलती-साठीं नेहमींच अवलंबून असत, म्हणून त्यांचा व या जोडप्याचा संबंध दृढ

झालेला दिसून येतो. अशा तऱ्हेनें आचारविचारांची देवाणघेवाण झाल्यामुळें त्यांचा संबंध जडला आहे. तसेंच केव्हां केव्हां हेतुपुरस्सर तर केव्हां आकस्मिक-रीत्याहि त्यांचे संबंध जुळले आहेत.

## कित्येक कूट प्रश्न

कथानकाचा हा त्रिवेणी संगम जसा रंगविला आहे, त्याच्यापेक्षा किंचित् जास्त काळजी घेऊन ग्रंथकर्त्यानें कथानकाशीं कित्येक कूट प्रश्न गोवून दिले आहेत. रागिणीमध्यें आगंतुकी करणारें, काव्यशास्त्रविनोदाचें त्रिकूट, इथें कथानकाशीं एक-जीव झालें आहे. हीं कूटें म्हणजे एक प्रकारचीं द्वंद्वेंच होत. यांपैकीं पहिलें म्हणजे कला विरुद्ध नीति. कलेच्या नादीं लागून पत्नीधर्माला विमुख व्हावें कीं काय हा प्रश्न इंदूला भंडावून सोडतो! या प्रश्नाचा निकाल पत्नीधर्माच्या बाजूनें झाला आहे. पण याला धरूनच जो 'सांकेतिक नीति व नित्यनीति' हा वाद लेखकानें पुढें आणला आहे, तो फक्त उल्लेख करून सोडून दिला आहे. बिन्दुमाधवाची नैतिक उन्नति, हाच कदाचित् नित्यनीतीचा दाखला असेल. शुद्ध मन व लोकापवाद यांच्यांत तेढ आली तर कोणता मार्ग पत्करावयाचा हा प्रश्न विचारांत घेतलाच आहे. पत्र ९ मध्यें सौ. काळे लोकापवादाला अनुकूल मत देत असली, तरी प्रत्येक पात्र शुद्ध मनाचे संदेश आचरणांत आणीत असतें. यामुळें या वादाचा निकालहि शुद्ध मनाच्यातर्फें झाला आहे. ह्या वादांपेक्षां सुख कशांत असतें, (पान ५८) व समाधान कशानें लाभेल, हा वाद व्यक्तिदृष्ट्या फार महत्त्वाचा दिसतो. कारण शुद्ध मन झालें तरी समाधान देऊं शकतें काय, हा प्रश्न शेवटीं शिल्लक राहातोच. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तर 'ध्येयें म्हणजे दुःखें' हें खरें; पण कादंबरींतील जें मुख्य पात्र विनायकराव त्यांचा विश्वास आध्यात्मिक उन्नतीवरच आहे. 'फायदा आणि तोटा पाह्यला लागलेत कीं जगांत कांहीं उच्च आणि उदात्त असें राहावयाचें नाहीं' असें ते म्हणतात, व त्यांच्या जीविताचा शेवटहि असाच उच्च दर्जाचा झाला आहे. असे हे कूट प्रश्न कथानकाशीं एकजीव करून ते प्रश्नहि कांहींसे उलगडून दाखविण्यांत लेखक बराच यशस्वी झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

जून १९३५

## विविध अर्थ

व्यवहारांत बोलतांना नाट्यगीत या शब्दाचा बरेच वेळां दुरुपयोग केलेला दिसून येतो. कोणत्याहि संभाषणात्मक भावगीतावर नाट्यगीत म्हणून, छाप मारण्याची प्रथा पडत आहे. संभाषण एकतर्फी असून 'स्वगत' या सदरांत मोडणारें असलें, तरीसुद्धां त्याच्या माथीं, नाट्यगीत हा शिक्का मारण्यांत येतो. कित्येक लोक कविवर्य तांबे यांच्या 'डोळे हे जुलमी गडे' यालाच नाट्यगीत समजतात व इतर कित्येक कवितांत नाट्यगुण असूनहि, त्यांना नाट्यगीत हें अभिधान द्यायला कचरतात. वास्तविक 'नाट्यगुण असलेलें भावगीत' असा नाट्यगीत याचा मर्यादित अर्थ न करतां 'नाट्यगुण असलेलें कोणतेंहि लघुगीत' असा या शब्दाचा अर्थ झाला पाहिजे. पण कित्येक टीकाकार याच्याहि पलीकडे जाऊन स्वगत भाषणालाहि नाट्यगीत म्हणून समजतात. या मताचा पुरस्कार करणारे लोक तांब्यांची 'फेरीवाला' ही कविता नाट्यगीत आहे, असें मत ठोकून देतात. फेरीवाला ही कविता नाट्यगीत आहे कीं नाहीं व ती नाट्यगीत या अभिधानास पात्र असल्यास, या विशिष्ट काव्यप्रकाराचे गुण तिच्यांत कितपत उतरले आहेत, हें ठरविण्यापूर्वी नाट्यवस्तूची ओझरती चर्चा करणें क्रमप्राप्त आहे.

## प्रधान घटना

उदाहरण म्हणून, सौभद्र हें नाटक विचारांत घेऊं. अर्जुन–सुभद्रा–विवाह हें या नाटकाचें उद्दिष्ट आहे. अर्जुन व सुभद्रा यांना बोहल्यावर उभीं करून त्यांच्यावर मंत्राक्षता टाकणें नाटककाराला शक्य आहे. पण भरतवाक्याच्या शेवटीं प्रेक्षकांच्या मुखकमलावर जी समाधानाची छटा उमटते, ती नाटकाचा एकांगी शेवट रंगभूमीवर दाखवून होणार नाहीं. अर्जुनावर आलेली तीर्थाटनाची आपत्ति, त्याच्यावर झालेला बलरामाचा रोष, त्याला वाटणारी विवाहाची अशक्यता, व त्या निमित्तानें त्याला करावा लागणारा खटाटोप, यांतच नाटकाचें सारसर्वस्व भरलेलं आहे. अर्जुनाच्या आकांक्षा व त्याला प्रतिपक्षाचा विरोध, यांच्यामध्यें जी सर्व नाटकभर रस्सीखेच चाललेली असते, त्यांतच नाटकाची मख्खी आहे; म्हणून व्यक्ति व परिस्थिति यांमधील झगडा किंवा समरप्रसंग, हें कोणत्याहि

कथेचें मूलभूत अंग ठरतें. तदनुषंगानें या झगड्याचा होणारा शेवट,हाही तेवढ्याच महत्त्वाचा आहे. नाटकाचा शेवट होतां होईल तों परिणामकारी असावा लागतो. प्रस्तुत नाटकांत त्रिदंडी संन्यासानें मिळणारा दुहेरी फायदा व बलरामाच्या भोळसरपणानें एका संन्याशानें केलेली डोळेउघडणी, हीं प्रेक्षकाला विस्मयकारक वाटतात. नाटकाला समरप्रसंग व विस्मयकारक शेवट या दोन गोष्टी प्रधानत्वें लागतात. व्यक्तिदर्शन, संभाषण वगैरे गोष्टींची सजावट, हीहि अर्थात् आवश्यक आहेत. पण ही सजावट, आरंभ व शेवट यांच्या मधला जो कार्यकारणसंबंध त्यांच्याशीं तुलना करतां, गौणच ठरते.

## उत्कृष्ट उदाहरण

नाट्यगीताचें क्षेत्र फार मर्यादित आहे. नाटकाच्या वांट्यास शेदीडशें, किमानपक्षीं सत्तरऐंशीं पानें तरी येतात. तें एकांकी असलें तरी, त्याची मर्यादा वीसपंचवीस पानांच्या खालीं जात नाहीं. पण नाट्यगीताच्या नशिबीं शेंदीडशें ओळी येणें अशक्य. वीस–पंचवीस ओळी त्याच्या वांट्यास आल्या तर त्या गीताचें मोठें भाग्य ! एवढ्या छोट्या पसाऱ्यांत व्यक्तिदर्शनाचा आव एखाद्या धीरगंभीर लेखकानें आणल्यास, त्याच्या विवेकाची धन्य आहे. त्याच्या लेखणींतून बाहेर पडलेल्या, पद्यपंक्तीस जर नाट्यगीत ही पदवी पाहिजे असेल, तर नाटकाच्या कथानकास मूलभूत ठरलेल्या गोष्टी, त्याच्यामध्यें अवश्य आल्या पाहिजेत. इंग्लिश कवि रॉबर्ट ब्राउनिंग् , हा नाट्यगीतांचा अध्वर्यु म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचें 'Incident of the French Camp' हें कवन उत्कृष्ट नाट्यगीत ठरेल. ह्या कवितेंत मरणाच्या दारांत पाऊल टाकणारा वीर, प्रत्यक्ष मृत्यूला बेगुमानपणें वागवितो, व आपल्या शौर्याचा डंका गाजवून मृत्युमुखीं पडतो, एवढेंच वर्णिलें आहे. निरोप पोंचविल्यावर त्याच्या मनाला समाधान वाटून, त्याचा आत्मविश्वास कसा वाढतो, हें प्रश्नोत्तररूपानें सांगितलें आहे. नेपोलियन विचारतो, 'तूं जखमी झाला आहेस ?' तो उत्तर करतो, 'त्यांत कसलें नवल ? मी ठारच झालों आहें !' हें, तो वीर बजावतो ! पण मरण घटकापळानें तरी पुढें लोटावें म्हणून चाललेली धांवपळ, व त्या अखेरच्या घाईनें आलेलें मरण यांतच समर–प्रसंगाची कसोटी उतरते व शेवटच्या विस्मयकारक उत्तरानें गीताची परिसमाप्ति होते. हीच कसोटी 'फेरीवाला' या गीतास लाविली, तर त्याला नाट्यगीत असें म्हणतां येत नाहीं. या कवितेंत विप्रलंभ शृंगाराचा परिपोष झाला आहे, ही गोष्ट

खरी असली, तरी भावनाविशेषत्व हा नाट्यवस्तूचा जीव ठरूं शकत नाहीं. तसेंच या गीताच्या शेवटीं विस्मयकारक अशी कोणतीच गोष्ट घडलेली नाहीं.

### कच-देवयानी

वाङ्मयांतील जुना व नवा हा भेद सोडल्यास, जुन्या वाङ्मयांतहि नाट्यगीताचे उत्कृष्ट नमुने पाहावयाला सांपडतात. मोरोपंतांचें कचदेवयानी हें आख्यान ह्या काव्यप्रकाराचें एक नमुनेदार उदाहरण होऊं शकेल. प्रस्तुत प्रकरण पेटीवर म्हणतां येणार नाहीं, म्हणून त्याला गीत म्हणतां येत नाहीं, अशी जर एखाद्याची काव्य-कल्पना असली तर मात्र तें नाट्यगीत ठरणार नाहीं! देव व दानव यांमधील सापत्नभाव लोकविश्रुत आहे. या सापत्नभावाचें दृश्य स्वरूप म्हणजे, देवदानव-मधले नेहमींचे झगडे. असें असतांनासुद्धां आप्तांचे प्राण रक्षण्यासाठीं कच परकीयांच्या गोटांत शिरतो. येथें आख्यानांतील समरप्रसंगाला सुरुवात होते. असु-रांच्या गोटांत 'मन मोहिलें गुरूचें, गुरुचित्ताहूनि देवयानीचें' हा मार्ग त्याला पत्करावा लागतो. यामुळें एकीकडे विद्याप्राप्ति व आप्तांचें हित व दुसरीकडे प्रियाराधन यांच्या पकडींत तो सांपडतो. इकडे देवदानवांच्या द्वेषाला निराळेंच स्वरूप प्राप्त होऊन, त्याला शुक्राचार्यांच्या उदरांत वास करावा लागतो. तसेंच विद्या-प्राप्तीसाठीं मरणहि पतकरावें लागतें. अशी शेवटीं अट्टाहासानें विद्याप्राप्ति होते खरी, पण देवयानीचें मन नाइलाजानें दुखवावें लागतें. देवयानीला प्राप्त झालेली परिस्थिति कचाशीं सलगी करण्याच्या भोळसरपणामुळें तिला आलली असो किंवा कच हा 'मलिन, कुटिल, नीरस' असा असल्यामुळें आली असो, ती अनपेक्षित आहे खास! म्हणून ही गोष्ट सिद्ध होते कीं, प्रस्तुत आख्यानासहि नाट्यगीत म्हणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं. याचें दुसरें प्रत्यंतर म्हणजे रा. खाडिलकरांचें विद्याहरण होय. प्रस्तुत कथेंत नाट्यबीजें होतीं व त्या बीजांना वृक्षत्व प्राप्त करून देणें शक्य होतें, म्हणूनच या छोट्या आख्यानावर—मग तें मूळ महाभारतावरून घेतलें असो किंवा आर्याभारतावरून घेतलें असो—नाटककारास एका यशस्वी नाटकाची इमारत उभारितां आली.

### आधुनिक उदाहरण

आधुनिक कवितांतहि नाट्यगीताचे बरेच नमुने सांपडतील. गिरीशांची शूर्पणखा हा त्यांपैकीं एक उत्कृष्ट नमुना होय. मायावी वेषधारी शूर्पणखेनें रामाचें धीरोदात्त मन आकर्षण्यासाठीं केलेला प्रयत्न व त्याबद्दल नाक कान कापण्याचें मिळालेलें प्रायश्चित्त हा या पद्याचा विषय आहे. शूर्पणखेला रामाच्या स्वभावाचें आकलन

न झाल्यामुळें कसा विपरीत अनुभव आला, असा या कवितेचा आरंभ व शेवट यांच्यामध्यें कार्यकारण संबंध लावतां येईल. तसेंच हा शेवट अनपेक्षित असल्यामुळें विस्मयकारक व वाचकाला शूर्पणखेविषयीं सहानुभूति नसल्यामुळें समाधानकारक आहे. कोणतीहि कलाकृति हातांतून पलीकडे करतांना, रसिकाला सात्त्विक समाधान लाभलें पाहिजे, तसें या कवितेनें लाभतें; याला कारण आरंभींच्या झगड्यानें प्रक्षुब्ध झालेलें मन व त्याला लाभलेला न्याय्य शेवट हा होय. म्हणून कोणत्याही गेय पद्याला नाट्यगीत, हें अभिधान देतांना त्याचा भावात्मक काव्यगुण पुरेसा नाहीं. त्यांत समरप्रसंग व विस्मयकारक शेवट, हे दोन गुण प्राधान्यानें दिसले पाहिजेत, तरच त्याला नाट्यगीत हें नांव शोभेल.

नोव्हेंबर १९३५

---

## १७ : वक्तृत्वाची उपासना

### वाग्देवीचें अनन्य भूषण

चित्रकार, सरस्वतीचें चित्र संगीताची अधिष्ठात्री म्हणूनच काढीत असले, तरी तिच्या 'वाग्देवी' या अभिधानावरून, ती वक्तृत्वाचीहि अधिदेवता आहे खास. काव्य, चित्र, अभिनय यांहूनहि वाग्देवीचें मोलाचें भूषण वक्तृत्व हेंच ठरतें. लोकोत्तर वक्त्याच्या जिव्हाग्रीं सरस्वती वास करते, असें जें म्हणतात, त्याचेंहि इंगित हेंच. व्यासपीठावरील वक्त्याची मूर्ति, वक्तृत्वानें मंत्रमुग्ध झालेले श्रोते, सभागृहांत उठणारे हास्याचे कल्लोळ किंवा टाळयांचे गडगडाट, या गोष्टी ज्यानें अवलोकिल्या असतील, तो वाग्देवीचें अनन्य भूषण वक्तृत्व हेंच ठरवील. नवमतवादी स्त्रीनें जरी जुन्या अलंकारसंभाराला अर्धचंद्र दिला, तरी ती जशी 'कुड्यांच्या जोडा'चा त्याग करीत नाहीं, तशी सरस्वतीहि, लोकतंत्राच्या या काळांत, आपलें अनन्य भूषण हातावेगळें करील, असें मानणें युक्त होणार नाहीं.

### लोकशाहींतील अमोघ अस्त्र

कारण, लोकशाहीच्या या युगांत, लोकानुरंजनासाठीं वक्तृत्वासारखें दुसरें अमोघ अस्त्र नाहीं. कोणाहि राजकीय पक्षाला, निवडणुका लढवायच्या झाल्या, तर त्या पक्षाचें निर्वाणीचें शस्त्र, वक्तृत्व हेंच ठरतें. आपला कार्यक्रम मतदारांना

पटवून दिल्याशिवाय, ते उमेदवारांना मतें देणार तरी कसे ? हिंदुस्थानसारख्या दोन हजार मैल लांबरुंद देशामध्यें, उद्यां जर सरसहा प्रौढमतदानपद्धति अमलांत आली, तर गांवोगांवच्या मतदारांना जागृत करण्यासाठीं, केवढ्या मोठ्या संख्येनें वक्ते तयार पाहिजेत, त्याची कल्पनाच केलेली बरी. निवडणुका जिंकण्यासाठीं जसे वक्ते पाहिजेत, तसेंच कायदेमंडळांत गेल्यावर तिथेंहि वक्ते पाहिजेत. आपल्याला अनुकूल अशा समुदायापुढें वक्तृत्व गाजविणें एकपरी सोपें, पण ज्या ठिकाणीं प्रतिपक्षी जय्यत तयार असतो, तिथेंच तर वक्तृत्वाची खरी कसोटी ! निवडणुका लढवतांना केलेलीं भाषणें ठसकेबाज व भावनामय असलीं कीं काम भागेल. पण कायदेमंडळांतील भाषणें विद्वत्तापूर्ण, मुद्देसूद व प्रभावी अशींच पाहिजेत. यावरून, आपल्या प्रभावी वक्तृत्वानें प्रतिपक्षावर मात करून यश मिळविण्याकरितां वक्त्यांना, केवढी आटाआट व परिश्रम केले पाहिजेत, त्याची थोडीशी कल्पना येईल.

## प्रतिभेला प्रयत्नाची जोड

कवि, चित्रकार, लेखक, हे जन्मजात कलावन्त असतात व त्यांना यशोपूर्व आटाआट व परिश्रम यांचें वावडें असतें, असें मत ज्यांनीं उराशीं बाळगलें असेल, त्यांना प्रतिभेला प्रयत्नाची जोड नको असते, असेंच वाटेल. वक्तृत्वाचा जन्मजात अंकुर कांहीं मुलांमुलींत दिसून आला कीं, त्याला जोपासनेची जोड ही दिलीच पाहिजे. खाणींतून काढलेला हिरा निःसंशय तेजस्वी असतो; पण त्याचे पैलू पाडल्यावर त्याचें तेज अधिक उज्ज्वल होतें, तीच गोष्ट वक्तृत्वाच्या अभिजात अंकुराची. त्याला परिश्रमांचें भरपूर पाणी दिलें पाहिजे. रंगभूमीवर टाळ्यांवर टाळ्या घेणारा नट ज्याप्रमाणें नाटकाच्या अनेक तालमींतून आपल्या कलेला उजाळा देत असतो, त्याप्रमाणें कसलेला वक्ताहि एकान्तांत, स्वतःच्या घरांत, माळरानांत किंवा दऱ्याखोऱ्यांत, समोरच्या लतावृक्षांना स्त्रीपुरुषांचा संमिश्र समाज कल्पून व्याख्यानें देत असतो. उमेदवारीच्या काळांत अशा तऱ्हेचा चाळा त्यानें आपल्या मनाला लावून घेतलेला असतो, म्हणूनच तो पुढें प्रभावी वक्ता होत असतो. त्या वक्त्यानें आपल्या पूर्ववयांत नामांकित वक्त्यांचीं भाषणें लक्षपूर्वक ऐकलेलीं असतात; त्यानें अनेक वक्त्यांच्या व्याख्यानांचें पृथक्करण केलेलें असतें. एका वक्त्याचा आवाज, शैली, भाषा, अभिनय व विद्वत्ता हीं तो दुसऱ्या वक्त्याच्या त्याच गुणांशीं पडताळून पाहतो. शेवटीं, ग्राह्यांश घेऊन व आपल्या प्रकृतीस मानवतील तेच गुण उचलून, हा नवा वक्ता आपली तयारी झाल्यावर श्रोतृसमुदायापुढें व्याख्यान देण्यास सरसावतो.

## वक्त्यांचे नैकविध प्रकार

वरीलप्रमाणें नवख्या वक्त्यानें निरीक्षण चालविलें, तर त्याला वक्त्यांचे अनेक प्रकार असलेले आढळतील. कित्येक वक्ते राघो भरारी छापाचे असतात; त्यांच्या वक्तृत्वांत भाषेचा फुलोरा व ओघ हींच पाहून घ्यावीं. शिवाजी, नेपोलियन यांसारख्या वीरांचीं उदाहरणें, वीरश्रीचीं वर्णनें, उत्साहाचा अतिरेक व भावनेची उत्कटता, हीं ह्या वक्त्यांच्या बोलण्यांत हटकून असावयाचीं. वक्त्यांचा दुसरा प्रकार म्हणजे हास्याचे मजले उठविणारे वक्ते. असे वक्ते नुसते सभेंत उठून उभे राहिले तरी लोक हंसूं लागतात. अशा वक्त्यांनीं एखादी सामान्य गोष्ट सांगितली तरी तो हास्योत्पादकच ठरते. याशिवाय राहिले ते घरगुती छापाचे वक्ते. त्यांना कलावन्त म्हणण्यापेक्षां गप्पीदास म्हटलें तरी चालेल. ते सभांना एवढे सरावलेले असतात कीं, ते एखाद्या मित्राला नमस्कार करून 'काय दोस्त या, थोडा चहा घ्या.' असें म्हणूनच जणूं काय, गप्पा झोडतात,—नव्हे वक्तृत्व गाजवतात. त्यांच्या वक्तृत्वानें हास्याचे सात मजले उठत नाहींत, कीं श्रोते अस्तन्या सांवरत नाहींत, पण चेहऱ्यावर समाधान दर्शवितात. अशा वक्तृत्वानें श्रोते भावनेनें भारावत नाहींत, पण हांसत खेळत विचारांच्या परिवर्तनांत मात्र सांपडतात, असे वक्त्यांचे अनेक प्रकार आहेत, तसे त्यांचे उपयोगहि पण आहेत.

## विविधरंगी इंद्रधनुष्य

वर दिल्याप्रमाणें चौफेर नजर फेंकली तर वक्त्यांचें अनेकरंगीं इंद्रधनुष्यच तयार झालेलें दिसेल. कित्येक वक्तृत्वोत्तेजक सभांनीं सुरू केलेली चक्री व्याख्यानांची पद्धत ही त्या इंद्रधनुष्याचें नमुनेदार उदाहरण होय. 'संयुक्त राज्यघटना' यासारखा एखादा विषय घेऊन, त्या विषयावर प्रागतिक, राष्ट्रीय, धार्मिक, जातीय अशा निरनिराळया दृष्टींनीं एकाच संस्थेचे अनेक वक्ते बोलतात. हे वक्ते निरनिराळया भूमिका घेऊन राष्ट्रांतील विविध पक्षांचें चित्र एकसमयावच्छेदेंकरून श्रोत्यांच्या अंतःचक्षूंसमोर उभें करतात. इंद्रधनुष्यांतील सातहि रंगांचा परिणाम एकत्रित होऊन इंद्रधनुष्याचें चेतोहर सौंदर्य निर्माण होतें, तसेंच या चक्री—व्याख्यानांनीं लोकशिक्षणाचेंहि कार्य साधतें.

## वक्तृत्वाचें खरें अधिष्ठान

असे वक्तृत्वाचे निरनिराळे प्रकार आहेत. त्यांचे उपयोगहि विविध आहेत. जनसमूहाचें मन वळवायला मैदानी वक्तृत्व हवें, बुद्धिजीवि वर्गाचा

श्रमपरिहार करण्याकरितां हास्याचे फवारे उडविणारें वक्तृत्व हवें, विद्वानांना आपलें मत पटवून देण्याकरितां संथ व तर्कशुद्ध असेंच वक्तृत्व हवें. असे वक्त्यांचे अनेक प्रकार असले, व त्यांचीं कार्यें वेगवेगळीं असलीं, तरी प्रत्येक वक्त्याचें "व्यक्तित्व" हेंच त्याच्या वक्तृत्वकलेचें खरें अधिष्ठान होय. देशभक्ति, कलासक्ति, ज्ञानलालसा, खोल विचार, दीर्घ अनुभव, मार्मिक निरीक्षण, कमावलेला आवाज, भाषाप्रभुत्व, जनमनाचा अंदाज ह्यांपैकीं जे गुण वक्त्यानें कमावलेले असतील त्या प्रमाणांतच त्याचें सभेंत तेज पडेल. म्हणून ज्या माणसाच्या ठिकाणीं अशा गुणांचा विकास झाला असेल व ज्यानें कलेसाठीं सहेतुक परिश्रम घेतले असतील, तोच प्रभावी वक्ता होईल. **—नोव्हेंबर १९४२**

---

## १८ : बोलका ढलपा

### भिल्लाचें आश्चर्य

जुन्या 'कमिटी'च्या पुस्तकांत एक गोष्ट आहे. ती बोलक्या ढलप्याची गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. मराठी तिसरींतील त्या काळच्या विद्यार्थ्यांनीं अनेक वेळ अवलोकिली असेल, ती गोष्ट मुलांच्या मनावर बिंबावी म्हणून तिला चित्रही आहे. मी ती गोष्ट वाचतांना मला त्या गोष्टीचा उद्देश कांहींच कळत नसे, मात्र तें चित्र मोठें गमतीचें वाटे. ढलपा बोलतो कसा, ह्याचेंच त्या भिल्लाला आश्चर्य वाटून, तो गांवांतून ढलपा दाखवीत हिंडला! असें तें चित्र होतें.

गोष्ट अत्युक्त असो, सत्यकथा असो वा कपोलकल्पित असो; राहून राहून एक कल्पना मात्र मनांत येते. ढलपा बोलतो कसा? हें पाहून, जसें त्या भिल्लाला आश्चर्य वाटलें, तसेंच त्याला आपल्यालाहि ही बोलके ढलपे करण्याची कला यावी, असें वाटलें नाहीं. ढलप्यावर जर उभ्याआडव्या चार रेघोट्या ओढल्या तर तो बोलूं शकतो, आपलें ह्द्गत सांगतो व माणसाचा कार्यभाग सुकर करतो; पण जो बोलका भिल्ल आहे, तो मात्र ढलप्याहून जास्त निर्बुद्ध झालेला दिसतो. असे अनेक ढलपे आज आपल्या हिंदुस्थानांत आहेत. ते बोलके होण्याची वाट पाहत आहेत.

### मुखर ढलपे

हिंदुस्थानांत तेहतीस कोटी देव आहेत. म्हणून आमच्या धर्माला नांवें ठेवणारे लोक आहेत. ज्यांना देवांच्या अस्तित्वाची कल्पना पटत नाहीं, त्यांनीं हिंदुस्था-

नांतील जनतेलाच देव म्हणण्याची नवीन शक्कल काढली. हे देव आतां तेहतीस कोटींवरून चाळीस कोटींवर गेले, व असेच आणखीहि वाढत जातील. दुर्भिक्षानें व महर्घतेनें यांतले कितीहि बळी घेतले तरी ही कोटींची संख्या कांहीं कमी होणार नाहीं. पण हे बहुतेक सगळे मुके ढलपेच आहेत. ह्यांतले कांहीं बोलके आहेत; पण बाकी सगळे न बोलूं शकणारे ढलपेच राहिले आहेत.

## अमोघ शक्ति

वास्तविक ज्ञान ही एक शक्ति आहे. देवानें जो मानवदेह निर्माण केला तो शस्त्र व यंत्र यांशिवायच केला. मात्र त्यानें एवढी खबरदारी घेतली कीं त्याला हातपाय दिले, एवढेंच नव्हे तर त्याच्या धडावर एक डोकेंहि ठेवून दिलें. त्यांत पिवळट करड्या रंगाचा मेंदू नांवाचा पदार्थ ठेवून दिला; व एवढ्याच छोट्याशा सामुग्रीनिशी त्याला निसर्गाच्या ऐसपैस मैदानावर सोडून दिलें; पण तो कसला स्वस्थ बसायला ? त्यानें पाहिलें कीं दिवसा सूर्य आहे पण रात्रीं काळोख. त्यानें दिवा शोधला. साधा दिवा नव्हे ! जी विद्युल्लताबाई कंसासारख्या बलवत्तर माणसाच्या हातांतून निसटली, तीच विद्युल्लता त्यानें 'पायांची दासी' केली. माणसानें पाहिलें कीं देवानें पक्षपात केला आहे. पक्षांना पंख दिले आहेत. व आपल्याला नाहींत; त्यानें ठरविलें कीं हा पक्षपात कां, ह्याची दाद स्वर्गापर्यंत भरारी मारून प्रत्यक्ष ईश्वराकडूनच घ्यायची. झालें अशा रीतीनें विमान तयार ! सांगावयाचें काय कीं माणसानें ज्ञानाच्या बळावर कर्तुंमकर्तुंम् अशी शक्ति मिळविली.

तें ज्ञान हरएकाच्या आटोक्यांत आणणें, हें तर आपलें पवित्र कर्तव्य आहे. अनेक लोक जागृतीच्या गप्पा मारतांना आढळतात. बंगालचे लोक उपासमारीनें मरतात; पण बंड कां करीत नाहींत, असें ते विचारतात. भुकेनें मरणारांत आर्ततेची डरकाळी फोडण्यास व बंडासारखा प्रचंड वणवा पेटण्यास केवढी संघटना लागते, याची या लोकांना कल्पनाच नाहीं. पेंढारी लोकांच्या वेळचें सरकार व आजचें सरकार यांत महदंतर आहे. १८५७ सालचीहि स्थिति वेगळी. जनतेनें बंड करावें कीं नाहीं हा आमचा मुद्दा नाहीं. आमचा मुद्दा असा आहे कीं संघटना करण्यास जें प्रचाराचें साधन लागतें त्याला ज्ञानाची, लेखनाची, वाचनाची वगैरे प्राथमिक आवश्यकता आहे. जनता शहाणी झाली पाहिजे, तिला समजलें पाहिजें, तिला उत्सुकता पाहिजे. म्हणजेच सोप्या भाषेंत सांगावयाचें, म्हणजे जनता साक्षर झाली पाहिजे. तहान लागल्यावर विहीर खणण्यापेक्षा पाणी ही जीवनोपयोगी वस्तू आहे, आपला मळा त्यानें शिंपतां आला नाहीं, तरी त्या विहिरीचें

पाणी वाटसरू, जनावरें वगैरे कोणीहि पिऊन प्राणधारणा करतील. म्हणून ज्या ज्या ठिकाणीं अनुकूलता असेल, त्या त्या ठिकाणीं विहीर खणून ठेवलीच पाहिजे.

## डोळे असून आंधळे

हें ज्ञानप्रसाराचें काम सोपें नाहीं. माणूस गरजेसाठीं जें करतो, तें केवळ हौसेसाठीं करीत नाहीं. प्रस्तुत लेखकाला एकदा एका खेड्यांत जाण्याचा योग आला. तिथें त्यानें एक निरक्षर माणूस पाहिला. त्याला भरपूर सवड होती. तसा तो निर्व्यसनी होता. खेड्यांत आठवड्यांतून एखादेंच वर्तमानपत्र. त्यांतून लढाईच्या चुरचुरीत बातम्या येत असत. तें वर्तमानपत्र वर्गणीदाराकडे केव्हां येत असे, याची दखलगिरी घेऊन, तो निरक्षर मनुष्य त्या वर्गणीदाराकडे अवश्य जात असे. त्याच्याकडून लढाईचें सर्व वृत्त वाचून घेत असे व मिटक्या मारीत ऐकत असे. लेखकाला वाटलें कीं याला जर साक्षर केलें तर याचें काम भागेल, हा स्वतःच वाचील, याचें परावलंबित्व जाईल. पंधराबावीस दिवसांत अक्षर–ओळख करून देऊन, वाचनाची तयारी करून देण्याची हमीहि त्यानें घेतली. पण त्या निरक्षराचा अभिमान आड आला. एवढ्या मोठ्या माणसानें शिकायला सुरवात केली, तर कालचीं नुकतींच शाळेंत जाऊन श्रीगणेशा गिरविणारीं पोरें काय म्हणतील ! झालें ! अगदीं माळ्याच्या बाजूला व बंदुकीच्या माऱ्यांत दिसणारें सावज हुकलें ! अभिमान, आळस, अडाणीपणा वगैरे आणखी किती तरी कारणांमुळें प्रौढ लोक ह्या एका निरक्षरासारखे कायमचेच ‘ डोळे असून आंधळे ’ राहिले आहेत. सरसहा प्रौढमतदान हेंच ज्यांचें ध्येय असेल, त्यांनाच जनतेच्या शिक्षणाची काळजी वाटेल कायद्यानें अठरा वर्षांचा झाल्यावर कांहीं नैसर्गिक अपवाद सोडून प्रत्येकाला मतदान करण्याचा हक्क आहे; असें ठरलें, कीं मतदारांना शिक्षित बनविण्याच्या मार्गाला आपोआप लोक लागतील. असा सार्वत्रिक मतदानाचा पुरस्कार करणारी मंडळी याचा विचार करूं लागली, कीं त्यांना आपोआपच पटेल कीं, सार्वत्रिक मतदानाचें महत्त्व कायद्याच्या चौकटींत आज बसो कीं, युगांतरानें बसो, त्याच्यासाठीं तयारी मात्र आजपासून पाहिजे. असें म्हटलें कीं हिंदुस्थानांतील जी जी व्यक्ति वयांत आली असेल, ती ती साक्षर व लिहितां वाचतां येणारी व थोडीशी तरी बहुश्रुत असली पाहिजे, हें कांहीं निराळें सांगावयास नको.

## प्रौढांसाठीं मजकूर

आज ग्रामीण जीवनावर आधारलेल्या कादंबऱ्या लेखक लिहीत आहेत. एखाद्या लेखकाच्या कादंबऱ्यांत भरपूर लालित्य आहे; पण त्याच्या कादंबरीत खेडवळ वातावरण नाहीं, तर त्याच्या कादंबऱ्यांना नाकें मुरडणारे लोक आहेत. जणूं काय

समाजसत्तावादाशिवाय किंवा शेतकरीकामकरी ह्यांच्या जीवनाशिवाय लेखनयोग्य असें जीवनच नाहीं. दुसरे असेंहि म्हणणारे आहेत कीं, भाषा सोपी बनवा. ती जनतेची झाली पाहिजे. अशा नांवाखालीं स्वतःच्या अशुद्ध लेखनाचें व संस्कृतानभिज्ञतेचें समर्थन करणारे लोक आहेत. भावनांचे आविष्कार, ध्येयाची पूर्ती, क्रांतीच्या ऊर्मी या बड्याबड्या गोष्टींच्या थापा देणाऱ्यांपैकीं कित्येकांनीं, जे नुकतेच शिकले आहेत व जे आपलें ज्ञान टिकवूं पाहतात अशांसाठीं कितीसे शब्द खर्ची घातले आहेत ? आजच्या महर्घतेच्या काळांतहि जिल्ह्यागणिक पत्रें आहेत. मुंबई-खारख्या शहरांतून तर वाचून संपणार नाहींत एवढीं नियतकालिकें आहेत; विशेषतः जिल्ह्याच्या मुखपत्रांतून किंवा मोठ्या शहरांतील दैनिकांतून आठवड्याच्या कांहीं प्रौढसाक्षरांसाठीं कांहीं मजकूर अवश्य देऊन, ही समाजोपयोगी चळवळ जिवंत ठेवली पाहिजे, नव्हे तिला जास्त जोम आणला पाहिजे. आपल्या खेड्यांपाड्यांतील जनतेचा अक्षर–अज्ञान हा मोठाच शत्रु आहे. हा शत्रु स्वराज्य मिळविण्याच्या आड तर येतोच, पण स्वराज्य विळविल्यावरहि तें चालविण्यास व स्थिर पक्ष निर्माण करण्यास ज्ञान–प्रसार व ज्ञान–ग्रहण हींच साधनें प्रभावी ठरणार आहेत.

जून १९४४

---

## १९ : नवीं क्षितिजें

### साहित्याचें अमर्याद क्षेत्र

साहित्याची चर्चा करणें, साहित्याचा आस्वाद घेणें, साहित्य निर्माण करणें ह्या गोष्टी माणुसकीच्या निदर्शक असल्याबद्दलची कव्युक्ति आपण पाहिली आहे. कवींचीच ती उक्ति असल्यामुळें, तींत काव्याची प्रशंसाच असेलच. स्वतःबद्दल अभिमान असणें, याला जर माकड अपवाद नाहीं, तर त्याचा वंशज कसा असेल ? ‘ काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ’ हें आप्तवाक्य पण तेंच सांगतें. येथवर सर्व कांहीं ठीक आहे. साहित्यनिर्मिती ही बाब बुद्धिवंत व प्रतिभावन्त अशांचें राखीव कुरण म्हणून ठेवून दिली, तरी साहित्याचा परामर्ष घेऊं इच्छिणाराला कांहीं सौंदर्यस्थळें म्हणून दाखवायला हवीं. कारण साहित्याचें क्षेत्र हें अमर्याद आहे. मुंबई शहर पाहावयास आलेल्या नवख्या पाहुण्यास बसचें सर्व दिवसाच्या फिरतीचें तिकीट काढून देऊन भागणार नाहीं. त्याला हॅंगिंग् गार्डन्, राणीचा बाग, म्युझियम, माधवबाग अशीं निरनिराळया दृष्टीनीं प्रेक्षणीय असलेलीं

अनुक्र. 22ee3 ... वि: ... क्रमांक 9926 ... नों दि:

स्थळें अगोदर दाखविलीं पाहिजेत. मुंबईचा कायमचाच रहिवाशी झाल्यावर मात्र त्याला प्रेक्षणीय व अप्रेक्षणीय असा कांहीं विधिनिषेध नको. कारण तो मग या अफाट शहराचा एक घटक बनतो; तो दैनंदिन जीवनांत मग भागही घेऊं लागतो व आनंदही लुटतो; नाट्यमहोत्सवाचीं तिकिटेंहि विकत घेतो; व नाटकें पाहून आनंदहि उपभोगतो;.पण एवढी स्थिति येण्यापूर्वी चोखंदळपणें साहित्याचा परामर्ष घेणें कसें बिकट आहे पाहा.

## मायभाषेचा पारंपरिक ठेवा

केवळ साहित्याचा आस्वाद घ्यावयाचा व आपला रिकामा वेळ सत्कारणीं लावायचा, असें एखाद्यानें ठरविलें तरी त्याला आपलें आयुष्य पुरणार नाहीं. ज्ञानेश्वरांपासून रामजोशांपर्यंत, सर्वांचा परामर्ष घ्यावयाचा म्हटलें, तर तें एक ट्याला शक्य नाहीं. आज आपण चर्चेच्या दृष्टीनें सर्व वाङ्मयाचा परामर्ष घेण्याची कल्पना पुढें मांडली असली, तरी वाङ्मय निर्माण करणारांची किंवा वाङ्मयांतील पंथप्रवर्तकांची कल्पना मात्र तशी नसते. रामदासी वाङ्मयाचे कार्यकर्ते प्रचारक जेव्हां आपणांस भेटतात, तेव्हां ते असें सांगतात कीं दासबोधाचींच पारायणें करा. पूर्वकालीं अशीच स्थिति होती. परंपरेनें आलेलें अक्षर वाङ्मय पूज्य मानणें, तें जिव्हाग्रावर नाचविणें व तें पुढच्या पिढीच्या हवाली करून, तें चिरंजीवित्वाच्या मार्गाला लावणें हाच तत्पंथियांचा क्रम असे. आज आपण पंथाच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीयतेच्या संधिकालांत वावरूं लागलों आहोंत. आपलें क्षेत्र विशाल झालें आहे. कर्मधर्मसंयोगानें, परिस्थितीनें किंवा पितृपरंपरेनें एकाच पंथांत आपण नाहीं; तर उलट आपण अनेक पंथांत आहोंत, व सर्वच पंथ आपणांस अभ्यसनीय, वाचनीय व चिंतनीय आहेत.

## आंग्लभाषेची भुलभुलावणी

पंथाची मर्यादा सुटून आपण मराठी भाषेच्या एकाच विस्तृत रंगणांत असतों तर तें ठीक होतें. पण त्यापेक्षांहि आपलें क्षेत्र विस्तृत आहे. आंग्लाईचा अंमल स्थिर झाल्यावर १८५४ च्या सुमारास संस्कृत विद्येचें संवर्धन करावें कीं आंग्ल-विद्येचें, हा जो एक वाद निघाला त्यांत आंग्लविद्येच्या बाजूनें मत पडून, तिची सरशी झाली, आणि भाषांतर व मूळ ग्रंथ अशा रीतीनें आंग्ल ग्रंथभांडार आपणांस मोकळें झालें. बायबलपासून किप्लिंगपर्यंत किंवा शेक्सपीअरपासून शॉपर्यंत काव्यें, नाटकें, प्रबंध, इतिहास काय वाटेल तें आपण अभ्यासावें; कशाची म्हणून उणीव पडणार नाहीं. ग्रंथ तर मोजून संपणार नाहींत; मग वाचण्याची व

अभ्यासाची गोष्टच नको! यावरून साहित्याशीं परिचय करून घेण्याचें काम किती दुर्घट झालेलें आहे तें कळेल!

## आजीबाई, शेजारणी व नातलग

याशिवाय आपलीच परंपरा शोधायला गेलों तर आपली आजीबाई आपल्यावर हक्क सांगतेच; परंपरेनें ब्राह्मणवर्गावर ती आपला हक्क सांगतेच; पण इतरहि जर आपल्या भाषेची उत्पत्ती, ग्रंथाची उत्पत्ति, तत्त्वज्ञानाची उत्पत्ति याचा विचार करूं लागले कीं त्यांना संस्कृत शिवाय आधार नाहीं. आपण शाळेंत संस्कृत शिकलों म्हणून आपल्या हातीं विचारांचा अमूल्य ठेवा आला, असें महात्मा गांधी यानीं नमूद करून ठेवलें आहे. गीता हा किती लोकांना प्रमाणग्रंथ वाटतो हें पाहिलें कीं संस्कृतसाहित्याची निराळी शिफारस नकोच. उद्यां राष्ट्रांत एकच भाषा होणार या दृष्टीनें हिंदी ही अभ्यसनीयच आहे. समजा आपण गार्डीत एखाद्या संयुक्तप्रान्तीय बान्धवाला भेटलों तर आपणांस हिंदींतील ग्रंथरत्नांवर चार शब्द बोलतां आलेच पाहिजेत. ज्यांनीं जगत्ख्याति मिळविली त्या रविन्द्रनाथांच्या ग्रंथाची निदान नांवें तरी आपणांस माहीत हवींच. ही झाली आजीबाई, शेजारणी व नातलग अशा भाषांतील ग्रंथाची गोष्ट. नवा प्रयोग यशस्वी करून दाखविणाऱ्या रशियाचें वाङ्मय आणि जुनी लोकशाही कायम टिकवूं पाहाणाऱ्या अमेरिकेच्या साहित्याची जानपछान थोडीतरी पाहिजे.

## प्रांशुलभ्य फळ व उद्बाहु वामन

असे अनेक विचार डोळ्यांसमोरून गेले व निरनिराळ्या लोकांचा आपल्या आवडत्या वाङ्मयाला अग्रस्थान मिळावें म्हणून चाललेला अट्टाहास पाहिला कीं, यांतून कोणतें ग्राह्य मानावें व कोणतें त्याज्य मानावें, याचा सकृद्दर्शनीं मोठा प्रश्न पडतो. रशियन वाङ्मयांतील 'आई' ही कादंबरी वाचावी कीं 'नो पसारन्' वाचावें. शकुन्तला बोलपटाचा रजत महोत्सव होतो म्हणून 'शाकुन्तला'चा अभ्यास करावा कीं 'श्रावणांतील खेडें' ही चीनचें जीवन दाखविणारी कादंबरी वाचावी? हा प्रश्न वामनपंडितांच्या एका श्लोकार्धानें मात्र सुटण्यासारखा वाटतो. वामनपंडित म्हणतो, 'आकाश अन्त न कळोनिहि अन्तरिक्षीं आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी' त्याचप्रमाणें साहित्याचें क्षेत्र हें अमर्याद असलें व आपली शक्ति अल्प असली तरी ह्या साहित्याच्या अन्तरिक्षांत भरारी मारून कोणतीं नवीं क्षितिजें दृष्टिक्षेत्रांत येतात हें पाहणें हितावहच ठरतें.

# बहुभाषाकोविद ठाकूर

## उपेक्षित मानकरी

महाराष्ट्रांत बुद्धीचें दुर्भिक्ष नाहीं; पण त्या बुद्धीचें चिरंतन स्मारक करून, पुढीलांस शहाणे करून सोडण्याचें मात्र दुर्भिक्ष आहे. कै. श्रीपाद बाबाजी ठाकूर यांचें चरित्र, म्हणजे वरील विधानांचें एक ठळक उदाहरण होय. आंग्लविद्येच्या अगदीं प्रथमच्या काळांत ठाकूर हे चमकून गेले. पण त्यांच्या चरित्राची स्मृति मात्र आज नाहीं. ते पहिले आय्. सी. एस्. होते. तरी पण त्यांच्या चरित्राकडे दुर्लक्ष झालेलें आहे. एक काळ असा होता कीं बी. ए. झालेल्या माणसाची मिरवणूक निघत असे. आजहि देशाभिमान विसरून, आय. सी. एस. होणें, हें बुद्धीचें जाज्वल्य लक्षण मानतात. असें असूनसुद्धा कै. ठाकूर यांच्यासारख्या बुद्धिवान व कर्तबगार आणि अनेक भाषाकोविद अशा माणसाच्या कुलवृत्तान्ताची व कार्याची फारच थोडी माहिती उपलब्ध व्हावी, हें आश्चर्य होय.

## पंधरा भाषांत विद्वान्

कै. ठाकूर यांना १५ भाषा चांगल्या येत होत्या. इंग्रजी, संस्कृत, ग्रीक, लॅटिन, हिब्रू, फारशी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश, पाली, अरबी, कानडी, गुजराथी व मराठी ह्या त्या भाषा होत. एकट्या परकी भाषेवर प्रभुत्व गाजवावयाचें म्हणजे सामान्य माणसाला किती सायास करावे लागतात, तें पाहिल्यास कै. श्रीपादरावांची बुद्धीमत्ता सहज ध्यानांत येईल. मुंबई विश्वविद्यालयाची बी. ए. ची परीक्षा उतरल्यावर ते इंग्लंडला गेले व तेथे आय्. सी. एस्. व बार–ॲट लॉ या दोन्ही परीक्षा चांगल्या तऱ्हेनें उत्तीर्ण झाले. आय्. सी. एस्. च्या वेळची एक गोष्ट उपलब्ध आहे. तीवरून त्यांची स्मरणशक्ति किती प्रखर व ग्रहणशील होती, हें कळून येईल.

## तीव्र स्मरणशक्ति

१८७० च्या सुमाराची गोष्ट. श्रीपादरावांना सिव्हिलियनच्या परीक्षेस बसावयाचें होतें. श्रीपादरावांना बुद्धीची जरी अष्टपैलू देणगी होती, तरी सततोद्योगाचें व त्यांचें सूत जमत नसे. परीक्षेच्या आदल्या दिवशीं ते अगदीं निश्चित होते. बाकीचे विद्यार्थी अभ्यासांत गर्क झाले होते; पण श्रीपादरावांचें मन बुद्धिबळाच्या डावांत गुंग झालें होतें. बुद्धिबळांचा डाव संपल्यावर त्यांचें मन ताळ्यावर आलें.

आपणहि मित्रांप्रमाणें परीक्षेची तयारी केली पाहिजे, असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांच्या हातार्शी वेब्सटरचा कोश पडला होता. तो त्यांनीं उघडला, आणि त्यांतले, उत्तम कोशाचीं लक्षणें कोणतीं, याबद्दलचे विचार त्यांनीं वाचले, नुसते नजरेखालून घातले म्हणा ना! पण कर्मधर्मसंयोगानें तोच प्रश्न आला, व श्रीपदरावांनीं त्या प्रश्नाचें मुद्देसूद उत्तर दिलें. वरवर अवलोकन करूनहि कै. ठाकूर हे एखादी गोष्ट कशी स्मरणांत ठेवीत, याचें हें उत्तम उदाहरण होय.

प्रथम प्रथम ते आचारानें जुन्या वळणाचे होते. इग्लंडांत जाऊनहि त्यांनीं केशकर्तनाची व रचनेची नवीन पद्धत उचलली नव्हती. आहारानेंहि संपूर्ण शाकाहारी होते. पण पुढे त्यांना सर तारकानाथ पलित हे मिळाले. तारकानाथ हे श्रीपादरावांना तत्त्वज्ञानी, मार्गदर्शक व मित्र ह्या तिन्ही नात्यांचा संयोग झाल्याप्रमाणें वाटत. तारकानाथांच्या सहवासानें त्यांनीं वेषभूषेंत फरक केला व आहारांतहि मांसाचा समावेश केला. असा फेरबदल झाल्याबद्दल मित्रमंडळी त्यांची नेहमी थट्टा करीत असत. पण श्रीपादराव मोठ्यानें हंसून त्या थट्टेचें स्वागत करीत, व एकदा जोडलेली मैत्री तोडीत नसत.

## अकालीं निधन

त्यांचा जन्म मुंबईत इ. स. १८४७ मध्यें झाला. त्यांचे वडील एका छापखान्यांत नोकरीवर होते. त्यामुळें त्यांचा बी. ए. पर्यंतचा अभ्यास मोठ्या जिकिरीनें झाला. बी. ए. झाल्यावर ते डेप्युटी इन्स्पेक्टर झाले. सन १८६८ मध्यें मंगळदास नथूभाई ट्रॅव्हेलिंग शिष्यवृत्ति संपादून, ते विलायतेस गेले. विलायतेहून आल्यावर त्यांनीं असिस्टंट कलेक्टर, मॅजिस्ट्रेट, सेशन्स जज्ज वगैरे हुद्द्यांचीं कामें निःपक्षपातीपणानें बजावलीं; व वयाच्या ४०व्या वर्षीं ते कैलासवासी झाले. त्यांनीं एक संस्कृत कोश कयार करण्यास घेतला होता व एक स्वतंत्र वर्तमानपत्र काढून लोकजागृति करावी, असाहि त्यांचा मनोदय होता. पण अकालीं निधन पावल्यामुळें, त्यांचे हे मनोदय सत्यसृष्टींत उतरले नाहींत. ते आणखी कांहीं वर्षें जगले असते, तर त्यांनीं पुष्कळ लोकसेवा केली असती खास; पण अकालीं कालवश झाल्यामुळें त्यांच्यासारखीं बुद्धिवान रत्नें महाराष्ट्र निर्माण करूं शकतो ह्याचीहि स्मृति आज राहिलेली नाहीं.

—जुन १९३६

22203

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रं. क्र. ८२४४
मुंबई शाखा

REFBK-0009288